अल्पावधीत
लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला
वाहिलेले
दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत

एप्रिल,२०१५
किंमत १५ रुपये

## आमची वाचनीय पुस्तके






**‘प्लेइंग इट माय वे’**
**सचिन तेंडुलकर** याच्या
**आत्मचरित्राचा मराठी अनुवाद**
**‘मेहता पब्लिशिंग हाऊस’**तर्फे
रसिक वाचकांसाठी
लवकरच उपलब्ध.

“ ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’तर्फे प्रकाशित आणि वीणा देव यांनी लिहलेल्या ‘स्वान्सीतील दिवस’ या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा पुणे येथे मान्यवरांच्या उपस्थितीत झाला. यावेळी वीणा देव यांच्यासह डॉ. द. भी. कुलकर्णी, डॉ. अरुणा ढेरे आदी उपस्थित होते. ”



# मेहता मराठी ग्रंथजगत

। एप्रिल २०१५ । वर्ष पंधरावे । अंक चौथा ।

मांडणी-अक्षरजुळणी

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २२४/२२५

E-mail : info@mehtapublishinghouse.com

संपादक
**सुनील मेहता**

कार्यकारी संपादक
**शंकर सारडा**

अंकाची किंमत **१५ रु.**

वर्गणी
**मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.**

प्रसिद्धी
**दरमहा ११ तारखेस**

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| संवाद | ४ |
| संपादकीय | ६ |
| साहित्यवार्ता | १० |
| अभिजात | ३७ |
| पुरस्कार | ४० |
| पुस्तक परिचय | |
| जिच्या हाती पाळण्याची दोरी | ४६ |
| अविचल | ६२ |
| श्रद्धांजली | ८२ |
| इंग्रजी पुस्तक परिचय | ८८ |
| बालनगरी | ९४ |

**डिजिटल अंकाची वर्गणी : तीन वर्षांची ३००रु., पाच वर्षांची ४००रु.**

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संवाद.....



'अक्षय्य तृतीया', महत्त्वाच्या साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभ मुहूर्त. श्रीकृष्णाने युधिष्ठिराला सांगितले होते की, 'वैशाख शुद्ध तृतीयेस केलेले दान व हवन क्षयाला जात नाही' म्हणून हिला 'अक्षय्य तृतीया' असे म्हटले जाते.  आपल्या पूर्वजांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी या दिवशी पितरांचे स्मरण करून त्यांच्या प्रतिमेचे पूजन करतात.

त्यामुळे देव आणि पितर यांना उद्देशून या तिथीस जे कर्म केले जाते ते सर्व अक्षय (अविनाशी) होते. या दिवशी सुरू केलेल्या कोणत्याही शुभ कार्याचे फळ 'अक्षय' (न संपणारे) असे मिळते.

याच दिवशी त्रेतायुगाचा प्रारंभ झाला. या दिवसाने एका कलहकालाचा अंत आणि दुसऱ्या युगाच्या सत्ययुगाचा प्रारंभ, अशी संधी साधलेली असल्यामुळे संपूर्ण दिवस शुभ मानला जातो, म्हणूनच 'अक्षय्य तृतीया' या संपूर्ण दिवसाला 'मुहूर्त' म्हणतात. अक्षय्य तृतीया या तिथीवरच हयग्रीव अवतार, नरनारायण प्रगटीकरण आणि परशुराम अवतार झाले.

'अक्षय्य तृतीयेला' ब्रम्हा व श्रीविष्णू यांच्या मिश्र लहरी उच्च देवतांच्या लोकांतून, म्हणजे सगुण लोकांतून पृथ्वीवर येतात त्यामुळे पृथ्वीवरील सात्विकता १० टक्क्यांने वाढते अशी कल्पना आहे.

पावसाळा तोंडावर घेऊन येणाऱ्या या 'अक्षय्य तृतीयेच्या' मुहूर्तावर शेतकरी जमिनीतल्या मृत्तिकेची पूजा करणे, मशागत करणे, बियाणे पेरणे, नवीन फळबागा, वनस्पतींची लागवड करणे अशी अनेक शुभ कार्ये करतात. जेणे करून संपूर्ण मानव जातीला पोसणाऱ्या या मृत्तिकेतील धन, धान्याचा कधीही क्षय होऊ नये.

'अक्षय्य तृतीया' या दिवसाचे महत्त्व असे आहे की, या दिवशी भुकेल्याला अन्न, तहानलेल्याला पाणी, वस्त्रहीन व्यक्तिला वस्त्र याप्रकारे दानधर्म केल्यास पुण्य गाठीशी जमा होऊन मोक्षाचा मार्ग खुला होतो. जन्म-मरणाच्या फेऱ्यातून माणसाची सुटका होऊ शकते.

'अक्षय्य तृतीया' हा कृतज्ञता व्यक्त करण्याचाही दिवस आहे. कृतज्ञता पृथ्वी, आग, तेज, वायू व आकाश यांविषयी कारण यांमुळेच मनुष्य देहाला चैतन्य प्राप्त होते. कृतज्ञता आपल्या पितरांविषयी, कारण त्यांच्यामुळेच आपल्याला मनुष्य देहाचे दान मिळालेले आहे.

मेहता मराठी ग्रंथजगत परिवारातील प्रत्येकाला 'अक्षय्य तृतीयेच्या' शुभेच्छा! तुम्हा सर्वांच्या आयुष्यात अखंड, अक्षय सुख, समृद्धी नांदो!

अशा या शुभमुहूर्तावर आपणही एक शुभ कार्य हाती घ्यावं असे आम्हासं वाटते, जेणे करून आपला हा संवाद असाच अक्षय राहावा.

आपण केलेले लेखन, एखादे पुस्तक वाचल्या नंतरची आपली प्रतिक्रिया, आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींवरची तुमची मतं किंवा केवळ स्वान्त सुखाय: म्हणून केलेले लेखन तुम्ही आम्हाला इ-मेलद्वारे पाठवू शकता.

mmgj@mehtapublishinghouse.com

निवडक लेखांचा अंकात समावेश करण्यात येईल, तसेच उत्तम लेखासाठी पारितोषिक म्हणून एका वेळच्या पुस्तक खरेदीवर ४०% सवलत देण्यात येईल.

तुमच्या पत्रोत्तराच्या अपेक्षेत,
मेहता मराठी ग्रंथजगत




# ई-बुकचे नवे पैलू

ई - बुक्समुळे एकूण ग्रंथव्यवहारात इसवी सन २०१४ मध्ये कितपत फरक पडला याची आकडेवारी आता जाहीर होऊ लागली आहे. भारताच्या दृष्टीने किंवा मराठीसारख्या प्रादेशिक भाषांच्या दृष्टीने या आकडेवारीला अजून फारसे महत्त्व नाही. कारण आपल्याकडे ग्रंथव्यवहाराची एकूणच व्याप्ती फार मर्यादित आहे ; आणि त्यात शैक्षणिक पुस्तकांची उलाढाल ९० टक्के असते. धार्मिक पुस्तके पाचसात टक्के असतात. कथाकादंबऱ्या-ललित लेखन-रंजनपर वाङ्‌मय त्याखाली येते. भारतात २८ सरकारमान्य भाषा असल्या तरी ज्यात ललित साहित्य प्रकाशित होते, वितरण व्यवस्था असते, लेखनाकडे व्यवसाय म्हणून पाहिले जाते, अशा भाषा कमीच आहेत. पुस्तके ही विकत घेऊन वाचायची असतात हे अनेक भाषांतील वाचकांना ठाऊकच नसते. पुस्तकांची जाहिरात करणे, मार्केटिंग करणे, पुस्तकांचा संग्रह करणे वगैरे त्यांना अनावश्यक वाटते आणि ते करणे त्यांना अनेकदा परवडतही नाही. क्रॉसवर्डसारखी ग्रंथप्रदर्शने, ग्रंथदालने बघायला मिळणे त्यांना दुरापास्त वाटतात; वाचक ग्राहक लेखक यांना एकत्र आणून काही कार्यक्रम करणे, ग्रंथमहोत्सव भरवणे हा त्यांच्या दृष्टीने फालतू व्याप ताप असतो. मराठी भाषेत अशा उपक्रमांची सध्या रेलचेल असते; तसे इतर भाषांबाबत फारसे दिसत नाही. जागतिकीकरणामुळे आता एकूणच वातावरण वेगळे वळण घेत आहे आणि अनुवाद प्रक्रियेला नवी गती लाभत आहे. त्याचबरोबर मुद्रित पुस्तकांच्या जोडीने डिजिटल ई बुक्स यांचीही उपलब्धता व मागणी वाढत आहे. ई बुक्सचा उत्पादनखर्च सीमित असतो आणि वितरण वाहतूक खर्च अल्प असल्याने या पुढच्या काळात त्यांचे महत्त्व रोखणे शक्य

होणार नाही. वाचकवर्गाबाबतची सध्याची आपली भूमिकाही बदलणे अटळ ठरणार आहे.  ग्रंथालयांच्या व्यवस्थापनाही बदल होत राहणार आहे. ज्ञानाची गरज ही आपल्या सर्वांच्या, समाजघटकांच्या प्रगतीला आवश्यक ठरणार आहे. ई बुक्स ही मोबाईल, आयपॅड, आयपॉड, संगणक अशा विविध गॅजेटवर वाचता येतील; त्यासाठी किंडल, सोनी वगैरे डेडिकेटेड वाचनयंत्राची गरज  त्यासाठी नाही. त्यामुळे आपण आपल्या मोबाइलवरच हजार पाचशे पुस्तकांचे  ग्रंथालय बरोबर घेऊनच रात्रंदिवस वावरणार आहोत. ई बुकने आपल्या एकूणच ज्ञान व माहितीच्या, करमणुकीच्या गरजा भागवणारे सोयीस्कर पर्याय आपल्या हाती सदासर्वदा सज्ज असणार आहेत. गेल्या सातआठ वर्षात ॲमेझॉनने किंडल बाजारात आणल्यापासून त्यात सुधारणा घडवून आणून लक्षावधी वाचकांना कागदावर मुद्रित पुस्तकांच्या कचाट्यातून बाहेर काढले आहे. फ्रॉम पेज टू पिक्सल, पेपर टू स्क्रीन ही झेप विलक्षण आहे.

ई बुक्सच्या विक्रीबाबत ॲमेझॉन कुठलीही आकडेवारी जाहीर करण्याचे आरंभी टाळत असे. नील्सनने त्याबाबत आपल्या यंत्रणांमार्फत प्रयत्न चालू ठेवले. २०१२ मधील सर्वाधिक विक्री झालेल्या पहिल्या ५० पुस्तकांचे (मुद्रित आणि ई बुक) आकडे आता प्रकट केले आहेत (हॅरी पॉटर वगळून) पहिल्या ५० ई बुक्सपैकी ६५ दशलक्ष पुस्तकांच्या विक्रीतून २० कोटी युरोचे उत्पन्न झाले. सोनीने ॲमेझॉनच्या विक्रीला चालना मिळावी म्हणून २० पेन्स या अत्यल्प दरात ई बुक उपलब्ध केली. ई बुक्सना पुढील काळात चांगली मागणी असणार याविषयी शंका नाही. मुद्रित पुस्तकांच्या तुलनेत ई बुक्सचे  पारडे नेहमीच जड असणार.

अमेरिका-इंग्लंडमधील प्रकाशक संघटनांचे अंदाजही या निष्कर्षाला पुष्टी देणारे आहेत.

अमेरिकेतील ‘असोसिएशन ऑफ अमेरिकन पब्लिशर्स’ या पुस्तक प्रकाशकांच्या महासंघाने नुकतीच २०१४ या वर्षातील ग्रंथव्यवहाराबाबतची आकडेवारी जाहीर केली आहे. २०१४ मध्ये प्रकाशकांच्या उत्पन्नात ४.९ टक्के वाढ झाली आणि ई बुक्सच्या विक्रीत आधीच्या वर्षापेक्षा १.५८ अब्जांची भर पडली. पेपरबॅक्सच्या उठावात २३ टक्के वाढ झाली तर हार्डबॅकच्या विक्रीत ८.२ टक्के घट झाली.

इंग्लंडमध्ये डिजिटल पुस्तकांची विक्री १७० ते १८० दशलक्ष

युरोच्या घरात गेली. त्यापैकी १४ दशलक्ष युरो कमाई ललितेतर साहित्याच्या विक्रीतून झाली. १७०-१८० दशलक्ष युरोंच्या डिजिटल विक्रीचे प्रमाण छापील व डिजिटल अशा दोन्हींच्या संदर्भात ५ ते ६ टक्के पडते. इंग्लंडमधील प्रकाशकांना पुस्तकांच्या विक्रीतून १.२५ अब्ज युरोची कमाई झाली. एकूण विक्रीच्या संदर्भात ही निर्यात ४० टक्के आहे.

२००८ पासून डिजिटल पुस्तकांची विक्री सुरू झाली. त्यानंतरच्या तीन वर्षात एकट्या पेंग्विनने ५ कोटी ई बुक्स डाउनलोड केली. पेंग्विनच्या ई बुक्सच्या विक्रीत दरवर्षी ११० ते १३० दशलक्ष युरोंची वाढ होत आहे. पियरसनकडेही पेंग्विनची मालकी असून तिची वार्षिक उलाढाल सहा अब्ज युरोच्या जवळपास आहे. अमेरिका, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया या देशात पियरसनची ७५० विक्रीकेंद्रे या काळात बंद पडली तरीही उत्पन्नात फारशी घट झालेली नाही. पियरसनचा उत्तर अमेरिकेतील विभाग प्रामुख्याने शैक्षणिक पुस्तकांची निर्मिती व वितरण करतो. सत्तरावर देशात पेंग्विनची पाठ्यपुस्तके वापरली जातात.

मराठीसारख्या भाषेत ई बुक्सचा जम बसण्यास वेळ लागणार. वाचकग्राहक संख्याही मर्यादित असणार. परंतु जागतिकीकरणाच्या लाटेत टिकून राहण्यासाठी मराठीला इंग्रजी पुस्तकांचीही जोड देऊन या व्यवसायाला अधिक सर्वसमावेशक करण्यात आपले कल्याण आहे. तशा तांत्रिक बाबीकडे लक्ष देणे गरजेचे आहे.



जॉन सुदरलँड या समीक्षकाने ई बुकच्या भविष्याबाबत व्यक्त केलेले मत काळजीपूर्वक लक्षात घेणे हितकारक ठरेल.

The e-book has daunting potential. In the very near future it will, for example, allow sound tracks as in movie or voice over. Illustrations can be added. Fan fiction liberties can be taken. Above all, annotation can be appended or inserted. If ( as in William Gibson's 2008 novel spook country) the action opens in the Mondarian Hotel, on Los Angels" Sunset strip, that fine establishment can be flicked in, visually. This kind of annotation is already being done, on the web to Gibson's fiction by fans. In the future it will be packed alongside the text itself. The e-book of the near future, it is safe to say, will need as much instruction and tuition in using it as driving an automobile, it will revolutionize.

आजची युवा पिढी ई बुकच्या प्रभावाखाली वाढणार आहे. मुद्रित पुस्तकाच्या प्रभावाखाली नाही. म्हणूनच प्रकाशन व्यवसायाच्या बदलणाऱ्या स्वरूपाच्या स्वागतासाठी आपण मानसिकदृष्ट्या तयार असायला हवे.





# साहित्य वार्ता

## ‘स्वान्सीतील दिवस’चे प्रकाशन

‘ललित लेखनाचे मर्म नेमक्या शब्दांत सांगता येत नाही. त्यासाठी लेखकाचे मन संवेदनशील आणि व्यक्तिमत्त्व संपन्न असावे लागते,’ असे मत ज्येष्ठ लेखिका डॉ. अरुणा ढेरे यांनी मांडले.

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या वतीने डॉ. वीणा देव यांनी लिहिलेल्या ‘स्वान्सीतील दिवस’ या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. ढेरे यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी या वेळी उपस्थित होते.

वीणाताई म्हणाल्या, ‘इंग्लंडच्या वेल्स परगण्यातील स्वान्सी शहरातील अनुभव या पुस्तकात मांडण्यात आले आहेत. हे लेखन स्वानुभवावरच आधारित आहे. लेखकाची मुलगी असल्याचे दडपण कधीच नव्हते. नाजूक, तरल भावनांचे मनस्वी पद्धतीने केलेले लेखन या पुस्तकात आहे.’

अरुणा ढेरे म्हणाल्या, ‘झेंडे घेऊन हल्ले- प्रतिहल्ले, जाळपोळ हे चित्र डोळ्यासमोर असताना स्वान्सीतील अस्मितेचे देव यांनी केलेले चित्रण वेगळ्या पद्धतीचे आहे. त्यामुळेच ते उठून दिसते. ललित लेखन म्हणजे काय हे स्पष्ट करणे कठीण आहे. कारण ते अनुभवातून उतरलेले असते. हा अनुभव तरल, संवेदनशील असतो. त्याला धक्का लागू द्यायचा नसतो.’

‘स्वान्सीतील दिवस हे पुस्तक वाचायचे, पाहायचे आणि अनुभवायचे आहे. कलावंताचे मन एकांतात रमते. स्वान्सीतील एकांताचा अनुभव देव यांनी पुस्तकातून वाचकांना दिला आहे. आत्मपर लेखन हा अवघड साहित्य प्रकार आहे,’ असे मत कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

## ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’चे इंग्रजी पुस्तक प्रकाशनात पदार्पण

मराठी प्रकाशन विश्वातील अग्रगण्य संस्था मेहता पब्लिशिंग हाऊसने

आता इंग्रजी भाषेतील पुस्तक प्रकाशनातही पदार्पण केले आहे. आफ्रिका खंडातील वाळवंटातून तब्बल १२ हजार किलोमीटरचा प्रवास पायी करणाऱ्या ऑस्ट्रेलियन लेखिका पॉला कॉन्स्टंट यांनी त्यांच्या प्रवासातील अनुभवांचे वर्णन करणारी स्लो जर्नी साऊथ आणि सहारा ही पुस्तके लिहली आहेत. या दोन इंग्रजी पुस्तकांचे प्रकाशन नवी दिल्ली, मुंबई, जयपूर तसेच पुणे या ठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

स्लो जर्नी साऊथ आणि सहारा ही पुस्तके भौगोलिक तसेच शारीरिक सीमा ओलांडून घेतलेल्या आत्मशोधाच्या प्रवासाचे वर्णन करतात. आपले दैनंदिन सामान्य जीवन सोडून आयुष्याचे नेमके ध्येय शोधण्यासाठी एखादी व्यक्ती घराबाहेर पडते. त्यावेळी त्या व्यक्तीला त्याचे जीवन बदलून टाकू शकणारे अनुभव येत असतात. आपले कुटुंब, नातेसंबंध, मित्रमैत्रिणी घरातील सर्व सोईसुविधा सोडून पॉला कॉन्स्टंट यांनी आत्मशोधाचा प्रवास सुरू केला होता.

पॉला या मूळच्या शिक्षिका. परंतु नेहमीच्या कामापेक्षा काही तरी वेगळं करुन दाखवण्याची उर्मी त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. यासाठीच त्यांनी पायी चालून विश्वभ्रमण करण्याचा निर्णय घेतला. हे अंतर होतं तब्बल १२ हजार किलोमीटरचं. त्यातही ७ हजार किलोमीटर अंतर त्यांना सहारा वाळवंटातून पार करावे लागणार होते. पती गॅरी यांच्यासोबत त्यांनी हा प्रवास सुरु केला. मात्र काही दिवसांतच गॅरीने पॉलाची साथ सोडली आणि त्याचवेळी त्यांच्यातील वैवाहिक नात्याचाही अंत झाला. मात्र पॉला यांनी अजिबात डगमगून न जाता आपला उर्वरीत प्रवास पूर्ण केला. ऑगस्ट २००४ मध्ये पॉलाने लंडनपासून आपला जगप्रवास सुरु केला. या प्रवासादरम्यान त्यांनी इंग्लंडसह, फ्रान्स, स्पेन, पोर्तुगाल, मोरोक्को, माली, नायजेरिया आदी देशांची जमीन पालथी घातली. वाळवंटातून ७ हजार किलोमीटर अंतर पार केल्यानंतर मे २००७ मध्ये पॉलाचा जगप्रवास संपला.

पुणे येथे आयोजित प्रकाशन सोहळ्यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना पॉला कॉन्स्टंट म्हणाल्या की, या पुस्तकांच्या माध्यमातून माझे वाळवंटातील प्रवासाचे अनुभव तुम्हाला सांगताना तो प्रत्येक दिवस पुन्हा जिवंत झाल्यासारखे वाटत राहते. हा प्रवास माझ्यासाठी नवी प्रेरणा देणारा आणि माझ्यातील सहनशक्तीचा अंत पाहणारा ठरला. इतका मोठा प्रवास करण्याचा निर्णय मी घेतला असला तरी त्यासाठी कोणतीही विशेष तयारी

केली नव्हती. वास्तविक अशा प्रवासासासाठी मोठी मानसिक आणि शारीरिक तंदुरुस्ती आवश्यक असते. मी अनेकवेळा यासाठी प्रशिक्षण घेण्याचा विचार केला होता. मात्र अखेरपर्यत त्यासाठी शास्त्रशुध्द प्रशिक्षण घेताच आले नाही. खरं तर त्यामुळेच मला प्रवासाचा प्रत्यक्ष थरार अनुभवता आला. अर्थात त्यामुळे अनेक अडचणींनाही मला सामोरे जावे लागले. नायजेरियातील गृहयुद्धामुळे मला प्रवास थांबवावाही लागला होता.

सहारा वाळवंटात अनेक ठिकाणी जिप्सी लोकांच्या वसाहती आहेत. या लोकांकडून पर्यटकांचे चांगल्या प्रकारे आदरातिथ्य करण्यात येत असल्यामुळ त्यांच्यासोबत राहणे हा एक अविस्मरणीय असाच अनुभव होता. १२ हजार किलोमीटरच प्रवास पूर्ण झाल्यानंतर आपले संपूर्ण आयुष्यच बदलून गेले आहे. माझ्यात एक प्रचंड आत्मविश्वास निर्माण झाला आहे. राजस्थानातील कच्छचे वाळवंट सर करणे हे आपले पुढील ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले.

मेहता पब्लिशिंग हाऊसचे सुनील मेहता म्हणाले, असामान्य लेखिका असणाऱ्या पॉला कॉन्स्टंट यांच्या पुस्तकांच्या माध्यमातून आमच्या संस्थेचा इंग्रजी भाषेतील प्रकाशन व्यवसायात प्रवेश होत असल्याचा अतिशय आनंद होत आहे. त्यांच्या लिखाणातून साहस पर्यटनाला नवी चालना मिळू शकेल. ही दोन्ही पुस्तके युवा वर्गाला साहसाची नवी प्रेरणा देणारीच आहेत. भविष्यातही इंग्रजी भाषेतील दर्जेदार साहित्या वाचकांपर्यंत पोहचवण्याचा आम्ही प्रयत्न करीत राहू.

अनुराधा गोयल यांनी पॉला कॉन्स्टंट व सुचेता कडेठाणकर यांच्याशी चर्चात्मक संवाद साधला. सुचेता कडेठाणकर यांनीही आपल्या प्रवासातील अनुभव सांगून उपस्थितांना रोमांचित केले.

मुंबई येथील वेलिंगकर इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंटमध्ये झालेल्या प्रकाशन सोहळ्यात एव्हरेस्टवीर रूपेश खोपडे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनीही आपल्या साहस मोहिमेतील अनुभव सांगितले. जयपूर येथे झालेल्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी वाळवंटातील सहलींचे आयोजक अनिकेत बिस्सा, पर्यटनविषयक लेखिका धर्मेंद्र कंवर, गायक रविंद्र उपाध्याय, कमल किशोर आदी उपस्थित होते.

प्रकाशन सोहळ्यावेळी पॉला कॉन्स्टंट यांनी स्लाईड शो, छायाचित्रे आणि नकाशांच्या माध्यमातून उपस्थितांना आपले प्रवासवर्णन सांगितले. पॉला यांनी स्वाक्षरी केलेली पुस्तकांची प्रत खरेदी करण्यासाठी प्रत्येक

ठिकाणी वाचकांची झुंबड उडत होती. यावेळी अनेक वाचकांनी पॉला यांच्याशी थेट संवाद साधून त्यांची पुस्तके तसेच प्रवासातील अनुभवांविषयी माहिती घेतली. तरुण वर्गासह ज्येष्ठ नागरिकांनीही पॉला यांच्या प्रवास वर्णनाबाबत अधिक जाणून घेण्याची संधी दवडली नाही. शेकडो वाचकांनी स्लो जर्नी साऊथ आणि सहारा या पुस्तकांच्या प्रति खरेदी केल्या.

## 'जडणघडण' ची दशकपूर्ती

''वक्ता उभा कसा राहतो, तो बोलतो कसा, त्याचा अभ्यास कसा आहे हे जरूर पाहा. जे जे चांगले आहे ते ते इतरांकडून घ्या; पण आपला विषय तळमळीने, अंत:करणपूर्वक मांडा. त्याला अभ्यासाची जोड द्या. मात्र, वक्तृत्वाचे नाटक होऊ देऊ नका,'' असा सल्ला शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी नव्या पिढीला दिला.

बाबासाहेबांच्या वक्तृत्वाला ६० वर्षे झाली. त्या निमित्ताने त्यांचा डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते सत्कार केला गेला. 'चाणक्य मंडल'चे प्रमुख अविनाश धर्माधिकारी यांनाही यावेळी 'सर्वोत्कृष्ट वक्ता पुरस्कार' प्रदान केला. त्यांच्यासह डॉ. विजय भटकर, 'एमकेसीएल'चे व्यवस्थापकीय संचालक विवेक सावंत यांनी वेगवेगळे अनुभव सांगत 'वक्तृत्वाची मैफल' रंगवली.

बाबासाहेब म्हणाले, ''वक्त्याचे डोळे, हात यांची हालचाल अगदी सहज असावी, त्यात नाटकीपणा येऊ नये. त्याने मुरलीधरासारखे उभे राहू नये. त्याचे वक्तृत्व ऐकताना इतरांना वास्तवाचा आभास व्हावा; त्यासाठी आधी अभ्यास हवा. बोलणे हा वक्तृत्वाचा एक भाग आहे. मला तर उत्तम संगीत, दर्जेदार लेखन यातही वक्तृत्व दिसते.''

डॉ. भटकर म्हणाले, ''दर्जेदार शालेय शिक्षण देणे ही काळाची गरज आहे, त्यातूनच भारताची पुढची वाटचाल ठरणार आहे.''

धर्माधिकारी म्हणाले, ''नव्या पिढीवर विश्वास आहे; पण त्यांना संस्कार कमी पडत आहेत. हे चित्र बदलायला हवे.'' सावंत म्हणाले, ''शाळा, महाविद्यालये हीच संस्काराची केंद्रे नाहीत. वेगवेगळ्या टप्प्यावर मिळणारे संस्कार आपण घ्यायला हवेत, तरच व्यक्तिमत्त्व फुलेल.'' 'जडण-घडण'चे डॉ. सागर देशपांडे व स्मिता देशपांडे उपस्थित होते.

''एकशे वीस कोटी भारतीयांच्या चेहऱ्यावर हास्य हे माझे स्वप्न आहे. हे चित्र सत्यात उतरवणे म्हणजे नवा भारत निर्माण करणे होय. पण सध्याची

सामाजिक स्थिती पाहिली तर हे चित्र लगेच सत्यात उतरेल असे नाही, त्यासाठी आपणा सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. कष्टाळू, शेतकरी, बुद्धिमान वैज्ञानिक, संवेदनशील उद्योजक, सक्षम प्रशासन, राजकीय इच्छाशक्ती आणि ज्ञानाधिष्ठित समाज यातूनच समृद्ध भारत निर्माण होऊ शकतो,'' असे डॉ. माशेलकर यांनी सांगितले.

## 'नारायणपेठी' बोलीचे सर्वेक्षण

दर दहा कोसावर भाषा बदलते असे म्हटले जाते. या पद्धतीने नानाविध बोलींनी मराठी भाषा समृद्ध झाली आहे. पुण्यातील शनिवार-नारायण आणि सदाशिव या पेठांमध्ये बोलली जाणारी भाषा शुद्ध असे मानले जात होते. त्यामुळे नारायण पेठी म्हणजे प्रमाण भाषा हे जितके खरे आहे तितकेच नारायण पेठी या नावाची स्वतंत्र एक बोलीही आहे.

भारतभर विखुरल्या गेलेल्या स्वकुळ साळी म्हणजेच विणकर समाजाच्या 'नारायण पेठी' या बोली भाषेच्या सर्वेक्षणाचे काम सुरू झाले आहे.

हातमागावर कापड विणून साडी, सतरंजी, चादर, पितांबर यांची निर्मिती करणारा अशी स्वकुळ साळी समाजाची ओळख आहे. पुणे, मुंबई, सोलापूर, इचलकरंजी, पैठण, येवला, नाशिक, अहमदाबाद, नवसारी, सुरत, आदोनी, बंगळुरू, हुबळी, बेळगाव, उज्जैन, इंदूर अशा बाजारपेठेच्या ठिकाणी या समाजाची वस्ती आहे. साहजिकच हे लोक वास्तव्यास असलेल्या राज्याची राजभाषा उत्तम प्रकारे बोलतात. आंध्र प्रदेशातील नारायण पेठ (जि. मेहबूबनगर) या गावी मोठ्या प्रमाणावर वास्तव्यास असलेले विणकर समाजाचे लोक नारायण पेठी ही मराठी प्रमाण बोली आजही बोलतात. देशाच्या अन्य राज्यांत उपजीविकेसाठी स्थलांतरित झालेले लोक त्या राज्यांमध्ये आपापल्या उंबऱ्याच्या आत हीच नारायण पेठी बोली बोलतात. तर, या गावातून नोकरी-व्यवसायासाठी अन्य ठिकाणी गेलेले लोकही घरामध्ये याच बोलीचा वापर करतात. सध्या ही बोली बोलता येणाऱ्या काही मोजक्या ज्येष्ठ व्यक्ती उरल्या आहेत. त्यामुळे त्या ज्येष्ठांच्या अस्तानंतर ही बोली लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. या नारायण पेठी बोलीचे भाषक सर्वेक्षण करून त्याचे दस्तऐवजीकरण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले आहेत.

वास्तविक नारायण पेठी बोली मराठीशी संबंधित आहे. ही बोलण्यास

सहज सुलभ, ऐकण्यास गोड आणि मवाळ आहे. हैदराबाद येथील उस्मानिया विद्यापीठाचे माजी मराठी विभागप्रमुख श्रीधर रंगनाथ कुलकर्णी यांच्या 'तेलंगणातील मराठा समाज-भाषा आणि संस्कृती' या संशोधन प्रबंधामध्ये स्वत:ची बोली असलेल्या अनेक जमाती तेलंगणामध्ये आढळून आल्या असून त्यामध्ये स्वकुळ साळी या जातीचा उल्लेख करण्यात आला आहे. हातमागावर विणकाम करणे हाच व्यवसाय असल्याने हा समाज शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आहे. त्यामुळे या बोलीची लिपी देवनागरी असली, तरी या बोलीतील लिखित साहित्य आणि दस्तऐवज उपलब्ध

## महाभारत येणार दुर्योधनाच्या नजरेतून

महाभारत या महाकाव्यावर जगभरात संशोधन होत असून, ते वेगवेगळ्या पद्धतीने वाचक – दर्शकांसमोर उभे केले जात आहे. त्यातीलच एक प्रयोग म्हणून ब्रिटनमधील एका भारतीय शिक्षणतज्ज्ञाने ट्विटरवरून दुर्योधनाच्या नजरेतून महाभारत सांगण्याचा संकल्प केला आहे.

बूनमाउथ विद्यापीठातील व्याख्याते आणि पत्रकार चिंदू श्रीधरन यांनी २००९ मध्ये महाभारत डिजिटल पद्धतीने सांगितले होते. ही कथा ते चार वर्षे सांगत होते. 'एपिक रिटोल्ड' नावाने ती पहिली ट्विटर कादंबरी प्रसिद्ध झाली. 'एपिक रिटोल्ड लिहिताना मी दुर्योधनाकडे वेगळ्या नजरेने पाहू लागलो. एपिक रिटोल्डमध्ये भीमाच्या नजरेतून लिहिले आहे. आता दुर्योधनाच्या नजरेतून लेखन केले आहे,' असे श्रीधरन म्हणाले.

## गुगल भारतातही पुरविणार बलून इंटरनेट

अतिशय दुर्गम भागातही इंटरनेट उपलब्ध करून देण्यासाठी गुगलने बलून इंटरनेट सुविधा सुरू केली आहे. यापूर्वी न्यूझीलंडमध्ये प्रायोगिक तत्त्वावर यशस्वी झालेला हा उपक्रम आता भारतातही येऊ घातला आहे. साधारण वर्षभरात ही सुविधा भारतातही उपलब्ध होईल.

मोबाईल क्रांतीबरोबर आता इंटरनेट सुविधा आवश्यक गरज बनत आहे. शहरी भागातच नव्हे; तर ग्रामीण भागातही इंटरनेटची मागणी वेगाने वाढतेय. याचाच विचार करून गुगलने भारतीय बाजारपेठेसाठी सकारात्मक पाऊल उचलल्याचे दिसत आहे. 'प्रोजेक्ट लून' असे नाव असलेल्या या प्रकल्पाच्या माध्यमातून अतिशय दुर्गम भागात उच्च दर्जाची आणि विशेष म्हणजे वाजवी दरात इंटरनेट सुविधा सुमारे पन्नास लाख लोकांना दिली जात

आहे. ज्यांच्याकडे इंटरनेट सुविधा नाही, त्यांच्यासाठी ही सेवा म्हणजे अनोखी पर्वणी ठरणार आहे. बलूनच्या माध्यमातून इंटरनेट उपलब्ध करून देण्यासाठी जगभरातील काही देश आणि टेलिकॉम कंपन्यांशी चर्चा सुरू आहे, यात भारताचाही समावेश आहे. 'प्रोजेक्ट लून'मध्ये इंटरनेट सुविधा देणारा बलून सुमारे २० किमीच्या क्षेत्रात वाऱ्याच्या दिशेनुसार फिरणार आहे. त्यामुळे संबंधित भूक्षेत्रावरील मोबाइलधारक इंटरनेट सेवा मिळवून जगाशी जोडले जाणार आहेत. न्यूझीलंडमध्ये अशा प्रकारचे ३० बलून वापरून छोट्या छोट्या गटांना इंटरनेटद्वारे जोडण्यात आलेले आहे.

इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी टॉवर उभारणी आणि वायरींगसाठी मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. या नव्या बलून टेक्नॉलॉजीमध्ये हा खर्च कमी करणे किंवा रोखणे शक्य होईल, असा विश्वास गुगलच्या सूत्रांनी व्यक्त केला आहे.

## 'ॲपल' जगातील सर्वांत धनाढ्य कंपनी

ॲपल कंपनीचे शेअर बाजारातील भांडवल ७०० अब्ज डॉलर्सवर पोचले असून, जगात सर्वांत जास्त भांडवल असणारी ही पहिली कंपनी ठरली आहे. ॲपल कंपनीचे भांडवल भारतीय चलनात ४२ लाख कोटी रुपये एवढे असून हे प्रमाण भारतीय अर्थव्यवस्थेच्या एक तृतीयांश इतके आहे. ॲपल कंपनीच्या इतिहासातील सर्वांत मोठा नफा या तिमाहीत झाला आहे. शेअर बाजाराच्या आकडेवारीनुसार ॲपल कंपनीच्या शेअरची किंमत १२२ डॉलर्स होती. ॲपल कंपनीने शेअर बाजारात आजतागायत २३,६३९ टक्के परतावा मिळवून दिला आहे.

ॲपलने २७ डिसेंबर रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात ७४.५ दशलक्ष आयफोनची विक्री केली. काही तज्ज्ञांनी फक्त ७० दशलक्ष आयफोन विक्रीचा अंदाज वर्तविला होता. गेल्या वर्षी कंपनीचे उत्पन्न ५७.६ अब्ज डॉलर्स होते. या वर्षी ते ७४.६ अब्ज डॉलर्सवर पोचले आहे. कंपनीला या तिमाहीत १८ अब्ज डॉलर्सचा नफा झाला आहे. कोणत्याही सार्वजनिक कंपनीच्या इतिहासातील हा सर्वांत मोठा नफा आहे. आता ॲपल इंककडे १७८ अब्ज डॉलर्सचा रोख निधी जमा आहे. तज्ज्ञांच्या मते, इतक्या रोख रकमेत ॲपल आयबीएमसारख्या कंपनीला विकत घेऊ शकते.

सौरऊर्जा निर्मितीच्या क्षेत्रामध्येही ॲपल प्रवेश करणार असून, यासाठी 'फर्स्टसोलर' या कंपनीसोबत करार केला जाणार आहे.

कॅलिफोर्नियामध्ये स्वतंत्र प्रकल्प उभारण्यासाठी ‘ॲपल’ तब्बल ८५० दशलक्ष अमेरिकी डॉलर्सची गुंतवणूक करणार असल्याची माहिती कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी टीम कुक यांनी दिली. कुक यांच्या घोषणेनंतर शेअर मार्केटमधील ‘फर्स्ट सोलर’च्या रोख्यांची किंमत पाचपटींनी वाढली.

## जयपूर साहित्यजत्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

जयपूर येथे आयोजित साहित्यजत्रेला प्रतिवर्षाप्रमाणे उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. साहित्यजत्रेच्या चार दिवसांत सुमारे २ लाख ४५ हजार साहित्यप्रेमींनी येथे झालेल्या पुस्तक प्रदर्शनास भेट दिली. विशेष म्हणजे यामध्ये गेल्या वर्षाच्या तुलनेत ४० टक्के अधिक विद्यार्थ्यांचा समावेश होता.

जयपूर साहित्यजत्रेला लाभलेला अलोट प्रतिसाद पाहून साहित्याचा महाकुंभ मेळा असे त्याचे वर्णन केले गेले. साहित्यिक नमिता गोखले म्हणाल्या की, जयपूर साहित्यजत्रेत जगभरातील सत्तरहून अधिक भाषांमधील साहित्य आणि साहित्यिक सहभागी झाले होते. फ्रेंच राजदूत निकोलस इडीयर म्हणाले की, जयपूर साहित्यजत्रा केवळ पुस्तकांसंबंधी नव्हती तर येथे निरनिराळ्या प्रकारच्या कल्पनांचा संगम पहायला मिळत असतो. माजी केंद्रीय मंत्री शशी थरूर, भाजपच्या दिल्लीतील नेत्या शाजिया इल्मी यांच्यासह अनेक राजकीय मंडळींनी जयपूर साहित्यजत्रेमध्ये दाखवलेली उपस्थिती भारतीय राजकारणातील बदलते प्रवाह दर्शवत होती. सार्क देशांमधील राजकीय आणि सामाजिक परिस्थितीबाबत विचारविनिमय करण्यासाठी आयोजित चर्चासत्रात हनीफ कुरेशी, जी. पार्थसारथी, खुर्शिद महम्मद कसूरी, अहमद रशिद, रोमेश गुनाशेखदा आदींनी आपली मते व्यक्त केली. इन्फोसिसचे नारायण मूर्ती, सुधा मूर्ती, रोहन मूर्ती यांनीही सर्व उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले होते. रोहन मूर्ती यांनी यावेळी ५ दशलक्ष डॉलर्सच्या भाषांतर प्रकल्पाची माहिती दिली.

यावर्षीच्या जयपूर साहित्यजत्रा आयोजकांमध्ये ४२ प्रमुख ट्रस्ट, संस्था, व्यावसायिक भागीदार आणि कंपन्यांचा समावेश होता. पुस्तक-प्रेमींकडून सुमारे १० हजार पुस्तकांची खरेदी करण्यात आली. ॲमेझॉन.कॉमचा पुस्तक विक्री स्टॉल यावर्षी सर्वांच्या आकर्षणाचे केंद्र बनला होता.

## इनाना क्रेग मोर्स

इनाना ही अमेरिकन सरकारच्या 'फुलब्राईट फेलोशिप' अंतर्गत पुण्यात संशोधनासाठी डेक्कन कॉलेजच्या भाषा विभागात दाखल झाली आहे.

'महिला सबलीकरण आणि राजकारणातील त्यांचा सहभाग' या विषयावर संशोधन करणारी 'इनाना क्रेग मोर्स' ही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सध्या मराठीचे ही धडे गिरवत आहे.

इनाना म्हणाली, ''महाराष्ट्राची संस्कृती आणि इतिहास मला खूप आवडले आहे. त्याबद्दल उपलब्ध पुस्तके वाचायची आहेत. मराठीतील महिला साहित्यिकांची पुस्तके वाचायची आहेत. मला नवीन लोकांना भेटायला आणि त्यांच्यासोबत बोलायला खूप आवडते. इथे मला रिक्षावाले, भाजीवाले, चहावाले यांच्यासोबतही बोलायचे आहे. त्यासाठी मला मराठी येणे गरजेचे आहे.''

इनाना आता मराठी लिहायला शिकत आहे. ती छान मराठी बोलते. गौरी देशपांडे यांचे 'आहे हे असं आहे' हे पुस्तक तिने नुकतेच वाचले आहे. इतर मराठी लेखकांची आत्मचरित्रे तिला वाचायची आहेत. मराठी ही खूप सुंदर आणि अद्वितीय भाषा आहे, अशी इनानाची भावना आहे.

## मोबाइल पेमेंटमध्ये 'गुगल'चीही एंट्री

तुमच्याकडे अँड्रॉइडवर चालणारा स्मार्टफोन असल्यास यापुढे शॉपिंगसाठी जाताना पाकिट, रोख रक्कम, डेबिट अथवा क्रेडिट कार्ड जवळ बाळगण्याची गरज भासणार नाही. कारण सर्चइंजिन क्षेत्रात आणि इंटरनेट विश्वास आघाडीवर असणाऱ्या 'गुगल'तर्फे लवकरच 'अँड्रॉइड पे' ही मोबाइल पेमेंट सिस्टीम सुरू करण्यात येणार आहे. कंपनीचे वरिष्ठ अधिकारी सुंदर पिचाई यांनी बार्सिलोनात आयोजित मोबाइल कॉन्फरन्समध्ये या विषयीची घोषणा केली. पिचाई यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही सुविधा गुगल वॉलेटसारखी अॅपबेस नसून, कंपनीतर्फे पुरविण्यात येणाऱ्या अँड्रॉइड पॅकेजचा एक भाग असेल. हल्ली रोखीने व्यवहार करण्यापेक्षा ऑनलाइन पेमेंट किंवा कार्ड स्वाइप करण्याचे प्रमाण वाढत चालले आहे, हे लक्षात घेऊन 'गुगल' ने ही सोय केली आहे.

'गुगल'ची प्रमुख स्पर्धक कंपनी असणाऱ्या 'ॲपल'ने काही महिन्यांपूर्वीच 'ॲपल पे' सेवा करू केली. या शिवाय काही दिवसांपूर्वीच

'सॅमसंग' नेही नव्यानेच सादर करण्यात आलेल्या 'गॅलेक्सी ६' मध्ये मोबाइल पेमेंटची सुविधा करून दिली. सध्या ही सुविधा अमेरिका आणि कोरियामध्येच उपलब्ध केली आहे. 'गुगल', 'ॲपल' आणि 'सॅमसंग'सारख्या कंपन्या ऑनलाइन पेमेंटच्या क्षेत्रात उतरल्यामुळे या क्षेत्रातील स्पर्धा तीव्र होईल, असे दिसते. 'गुगल पे' सेवा वापरणाऱ्यांनी कोणत्याही प्रकारचे कार्ड वापरण्याची गरजच नसल्याचे पिचाई यांनी स्पष्ट केले. केवळ स्मार्टफोनच्या आधारे कोणत्याही दुकानातून पाहिजे ती वस्तू खरेदी करण्याचे स्वातंत्र्य यूजरना मिळणार आहे.

'गुगल वॉलेट' आणि 'गुगल पे' यांच्यातील फरक सांगताना पिचाई म्हणाले की, 'कोणत्याही वेब डेव्हलपरला गुगल पेचा वापर करणे अतिशय सुलभ होईल, अशी त्याची रचना करण्यात आली आहे. त्यामुळे कुणीही या माध्यमातून वायरलेस पेमेंटचे फायदे मिळवू शकेल.' सध्या बाजारात उपलब्ध असणाऱ्या अन्य मोबाईल पेमेंट सेवांच्या तुलनेत 'गुगल'ची ही सुविधा सरस ठरेल असा पिचाईंचा दावा आहे. ही सुविधा कधी सुरू होणार, हे नंतर जाहीर होईल.

## उर्दू शायरीची मराठी सखी

उर्दू भाषेतून अतिशय साधेपणाने सुंदर भाव व्यक्त करण्याची पद्धत आहे. या भाषेची नजाकत आणि नाजूकता खरोखरीच भावण्यासारखी असते. शब्दांच्याही पलीकडचा अर्थ सांगण्याची ताकद या भाषेमध्ये असल्याने, आपल्या मनात भावनांच्या अनेक छटा निर्माण होतात. हेच खरे त्या भाषेचे सौंदर्य आहे, अशी भावना महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विवेक सावंत यांनी व्यक्त केली.

मंजिरी धामणकर यांनी लिहिलेल्या 'आश्ना : उर्दू शायरीची मराठी सखी' या पुस्तकाचे ई-बुक प्रकाशन बुकगंगातर्फे करण्यात आले. तसेच या कार्यक्रमात आश्नाच्या ब्रेल रूपांतरित आवृत्तीचे प्रकाशन निवांत अंध विकासालयातील विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी मंजिरी धामणकर, मंजिरी जोशी व अनुराधा मराठे यांनी लोकप्रिय गीत गजलांचा कार्यक्रम सादर केला.

छापील पुस्तके आणि ई-पुस्तके हातात हात घालून पुढे जात असून, ही दोन्ही माध्यमे एकमेकांना समृद्ध करण्याचे काम करत आहेत. मात्र त्यामुळे छापील पुस्तके भविष्यात निर्माण होणार नाहीत असे म्हणणे योग्य ठरणार

नाही, असे सावंत म्हणाले.

## संमेलनात अभिजात भाषेची घोषणा करा

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा प्रयत्न सरकारी पातळीवर सुरू आहे. याबाबतची अंतिम घोषणा सरकारने घुमान येथे होणाऱ्या ८८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात करावी, अशी मागणी पुण्यातील शीख बांधवांनी केली आहे. तसे पत्रही सरकारला पाठविले आहे. तर दुसरीकडे या घोषणेसाठी संमेलनाचा 'मुहूर्त' काढण्याच्या सरकारच्या हालचाली सुरू झाल्याचे सूत्रांनी सांगितले.

महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांतून या मागणीचे पत्र पाठविण्याची तयारी आम्ही करत आहोत. केंद्र सरकार सकारात्मक प्रतिसाद देईल, असा विश्वास आहे. अभिजात भाषेची घोषणा संमेलनात झाली तर तो ऐतिहासिक क्षण राहील, असे आमदार चारण सिंग सप्रा म्हणाले.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठी काही वर्षांपासून प्रयत्न सुरू आहेत. यासाठी अभिजात भाषा समितीने तयार केलेल्या अहवालाचा 'साहित्य अकादमी'ने अभ्यास केला. त्यानंतर या अहवालाला मान्यता देऊन तो केंद्र सरकारकडे परत पाठवला. गृह मंत्रालयासह इतर महत्त्वाच्या खात्यांनी मंजुरी दिल्यावर त्याला अंतिम मान्यता मिळेल.

साहित्य संमेलनाच्या उद्घाटन समारंभास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, पंजाबचे मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल यांच्यासह केंद्र व राज्यातील अनेक बडे नेते उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत ही घोषणा व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, पुण्यातील शीख धर्मातील प्रमुख कार्यकर्ते संतसिंग मोखा म्हणाले, ''मराठी भाषेचा पंजाबमध्ये मोठ्या प्रमाणात सोहळा होत आहे. वेगवेगळ्या कारणांमुळे आपल्याला त्याची आठवण राहीलच. त्यातील एक कारण मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देणे, हे एक ठरावे. यासाठी आम्ही आवश्यक तो पाठपुरावा करत आहोत.''

## दुर्मिळ इटालियन पुस्तके अमेरिकेत सापडली

इटलीमधून चोरीला गेलेली सुमारे चारशे वर्षांपूर्वीची अतिशय दुर्मिळ दोन इटालियन पुस्तके सॅन फ्रॅन्सिस्कोमध्ये सापडली आहेत. 'स्टर्पियम हिस्टोरिया' आणि 'रारीअर्म प्लँटारम हिस्टोरिया ॲनो १६०१' अशी या

पुस्तकांची नावे आहेत. इटलीच्या 'हिस्टॉरिकल नॅशनल लायब्ररी ऑफ ॲग्रिकल्चर'मधून चोरीला गेलेली ही पुस्तके इटलीच्या दुर्मिळ वस्तूंच्या विक्रेत्याला विकण्यात आली. तेथून ती सॅन फ्रॅन्सिस्कोला आली व तेथील एका ग्राहकाने ही पुस्तके सीमाशुल्क व स्थलांतर विभागाला दिली. त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.

## पुस्तकांचे गाव हा प्रकल्प मंत्री तावडे राबवणार

मराठी भाषा विभाग व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी राजभाषा दिनानिमित्त 'विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांना आणि श्री. पु. भागवत पुरस्कार 'केशव भिकाजी ढवळे प्रकाशन संस्था' यांना देण्यात आला.

त्या वेळी राज्याचे सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे यांनी पुस्तकांच्या गावाचा संकल्प बोलून दाखवला. 'महाराष्ट्रामध्ये पुस्तकाचे गाव निर्माण करावे, अशी माझी इच्छा आहे. हे गाव कायमस्वरूपी असावे आणि तेथे मराठी लेखकांची विविध विषयांवरील पुस्तके ठेवण्यात यावीत,' असे ते म्हणाले. 'या गावाला भेट देण्यासाठी फक्त महाराष्ट्रातूनच नव्हे, तर अन्य राज्यांतून वाचकांनी यावे व या गावात वाचनानंद भरभरून लुटावा अशी अपेक्षा आहे,' अशी पुस्तीही त्यांनी जोडली.

'या गावामध्ये लेखक-प्रकाशक यांचे परिसंवाद आयोजित करण्यात येतील, पुस्तकवाचन करता येईल, मराठी भाषा आणि पुस्तके या विषयावर चर्चासत्रे होतील आणि त्यामुळे मराठी साहित्य प्रत्येक वाचकापर्यंत पोहोचेल,' अशा शब्दांत तावडे यांनी पुस्तकांच्या गावाची संकल्पना मांडली.

## श्री नामदेव साहित्य संमेलन

''मराठी भाषेचे सामर्थ्य लोकांनी ओळखायला पाहिजे. सर्व जगाला अभिमान वाटावा असे साहित्य आपल्या संतांनी तयार करून ठेवले आहे. संत हेच मानवाला जीवनाची दिशा दाखवतात,'' असे मत पहिल्या विश्वसंत श्री नामदेव महाराज साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर तांदळे यांनी व्यक्त केले.

शिंपी इम्पॅक्ट ऑर्गनायझेशन महाराष्ट्र राज्य शाखेतर्फे दोन दिवसांचे पहिले विश्वसंत श्री नामदेव महाराज साहित्य संमेलन घेण्यात आले. प्रमुख

पाहुणे म्हणून वैज्ञानिक विकास महामंडळ अध्यक्ष उल्हास पवार आणि माईर्स एमआयटी शिक्षणसंस्थेचे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड उपस्थित होते.

## दिग्गजांना आवडणारी पुस्तके 'फेसबुक'वर

वेगवेगळ्या क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींना पाहताना त्यांची जडणघडण कशी झाली, हा प्रश्न मनात येतो. याला अनेक दिग्गजांनी आजवर एकच उत्तर दिले आहे, ते म्हणजे पुस्तक. वेगवेगळी पुस्तके वाचायला मिळाली म्हणून मी आज इथवर पोचलो, असे अनेक मान्यवर सांगतात. हे मान्यवर नेमके काय वाचतात, त्यांना कुठली पुस्तके आवडतात, कोणता लेखक भावतो... याचा वेध अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या फेसबुक पेजवर सध्या घेतला जात आहे.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर, वात्रटिकाकार रामदास फुटाणे, अभिनेते मोहन जोशी, साहित्यिक डॉ. द.भि. कुलकर्णी, डॉ. अच्युत गोडबोले यांच्यापासून कवी चंद्रशेखर गोखले, गायक राहुल देशपांडे, शौनक अभिषेकी अशा अनेक मान्यवरांना कोणती पुस्तके आवडतात, हे या पेजवर पाहायला मिळत आहे. इतर मान्यवरांना भावणाऱ्या पुस्तकांची यादीही लवकरच या पेजवर येईल. नेमकी कोणती पुस्तके वाचावीत, दिग्गज कसे घडले, हे ही यातून समजत आहे.

## महिला चित्रपट महोत्सव

स्त्री कित्येक शतकापूर्वीची असो किंवा आधुनिक असो, ती कोणत्याही क्षेत्रातील असो, संघर्ष हा तिला अटळच असतो. माझाही प्रवास असाच होता. पुण्यात अत्यंत उत्तम स्त्री कलाकार आहेत; पण मी केवळ एक कार्यकर्ती आहे, असे मनोगत ज्येष्ठ नृत्यांगना प्रभा मराठे यांनी व्यक्त केलं.

महिला दिनानिमित्त 'आयम,' 'आशय' आणि 'राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय' यांच्या वतीने आयोजित केलेल्या 'इन सर्च ऑफ दि आर्टिस्ट माइंड' या सहाव्या आंतरराष्ट्रीय महिला फिल्म फेस्टिव्हलला यावेळी प्रसिद्ध गायिका आरती अंकलीकर, फिल्म इन्स्टिट्यूटचे संचालक डी. जे. नारायण, 'एनएफआ'चे संचालक प्रकाश मगदूम, आशय फिल्म क्लबचे सतीश जकातदार, 'आयम'चे मनस्विनी प्रभुणे, वीरेंद्र चित्राव आदी मान्यवर उपस्थित होते.

मराठे म्हणाल्या, 'सिनेमा क्षेत्रात स्त्रीत्व या विषयावर पत्रकारांनी

महोत्सव भरविणे हेच खूप प्रेरणादायी आहे. पत्रकार आपल्या कलेची व्यवस्थित दखल घेतील की नाही, याची भीती आम्हाला सतत वाटत असते; पण माझ्या बाबतीत पत्रकारांनी नेहमीच साथ दिली आहे.'

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी 'बेगम अख्तर' यांच्यावरील माहितीपट आणि त्यानंतर 'सरदारी बेगम' हा श्याम बेनेगल दिग्दर्शित सिनेमा दाखवण्यात आला. दुसऱ्या दिवशी प्रसिद्ध चित्रकार अमृता शेरगिल तसेच गंगूबाई हनगल यांच्या जीवनप्रवासाचा वेध घेणारे माहितीपट सादर झाले. 'द फेमिनाइन इन सिनेमा' ही संकल्पना संध्या गोखले यांनी अधिक स्पष्ट केली. स्वीडन आणि बेल्जियमसह जगभरात निर्माण झालेल्या महिलांचे प्रेरणादायी सिनेमे या निमित्ताने पुणेकरांना पाहायला मिळाले. तिसऱ्या दिवशी दुपारच्या सत्रात पत्रकार मानसी सप्रे यांनी लिहिलेल्या 'पुणे मर्डर क्रॉनिकल' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते झाले.

## अर्वाचीन मराठी शब्दकोश

इंग्रजी शब्दांचे मराठी अर्थ सांगणारे बरेच शब्दकोश उपलब्ध आहेत. मात्र, मराठी शब्दांचे इंग्रजीतून अर्थ सांगणारा शब्दकोश गेल्या १५० वर्षांत तयार झालेला नाही. ज्येष्ठ भाषातज्ज्ञ डॉ. रमेश धोंगडे ही उणीव भरून काढण्यासाठी 'अर्वाचीन मराठी इंग्रजी शब्दकोश' तयार करीत आहेत.

ब्रिटिश अधिकारी जेम्स मोल्सवर्थ यांनी मराठी भाषेवर प्रभुत्व मिळवून पहिल्यांदाच मराठी इंग्रजी शब्दकोश केला होता. सर्वसामान्यांना कळेल असा अर्थ तसेच शब्दाचा उच्चार, क्रियापदांच्या वापराचे स्पष्टीकरण शब्द-कोशाच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न आहे.

हा कोश सिद्ध होण्यासाठी तीन ते चार वर्षे लागणार असल्याचेही डॉ. धोंगडे यांनी स्पष्ट केले.

मराठी शब्दांचा अर्थ सर्वांना समजेल अशा इंग्रजीतून देतानाच मराठीत रूढ झालेले इंटरेस्ट, फंडा, टीव्ही, फोन, मोबाइल, थिएटर, सिनेमा, पिक्चर, कटलेट, आइस्क्रीम अशा इंग्रजी शब्दांचाही समावेश आहे. जागतिकीकरणानंतर इंग्रजीशी संपर्क वाढल्यामुळे हे शब्द आता मराठीच झाल्यासारखे आहेत. त्यामुळे त्यांच्या वापराचे स्पष्टीकरण दिले जाणार आहे. एका शब्दाचे बरेच अर्थ असल्याने शब्दाचा खरा अर्थ काय, इतर अर्थ काय, तो शब्द अर्थानुसार कसा वापरायचा याचीही माहिती दिली जाणार आहे.

'मराठी ज्ञानभाषा व्हावी अशी मागणी केली जाते. मात्र, भाषेचा विचार

शास्त्रीय पद्धतीने केला जात नाही. भाषा हे संपर्काचे माध्यम आहे. त्यामुळे भाषेमध्ये आपपरभाव असू नये. शब्दांच्या देवाणघेवाणीतून भाषा समृद्ध होते,' असे डॉ. धोंगडे म्हणाले.

## जेफ्री आर्चर - पुणे भेट

'जेफ्री आर्चर' हे नाव आणि त्यांचे लेखन किती गर्दी खेचू शकते, याचा अनुभव नुकताच पुण्याने घेतला. लघुकथा, कादंबरीतून वाचकांना आपलेसे करणारे लेखक जेफ्री आर्चर 'मायटियर दॅन दि स्वोर्ड' या पुस्तकाच्या प्रमोशनसाठी पुण्यात आले असता, औंध येथील 'क्रॉसवर्ड'मध्ये चाहत्यांनी तुडुंब गर्दी केली होती.

हा कार्यक्रम झाला. शब्दांतून आर्चर यांनी चाहत्यांना जिंकलेच आहे, मात्र त्यांचे दिलखुलास व्यक्तिमत्त्वही किती भुरळ घालू शकते, हे या कार्यक्रमातून पुन्हा अधोरेखित झाले. 'नॉट अ पेनी मोअर- नॉट अ पेनी लेस', 'केन अँड एबल' ही बेस्टसेलर पुस्तके आकाराला येण्याची कथा, त्यांतील पात्रांचा जन्म याची थोडक्यात कहाणी त्यांनी सांगितली.

''कथा-कादंबरी लिहिणे ही कला शिकून येत नाही, तर ती ईश्वराची देणगी आहे आणि तिला कठोर मेहनतीने आणखी चकाकी द्यायची असते. यशस्वी होण्यासाठी कोणताही शॉर्टकट नसतो,'' अशा शब्दांत त्यांनी नव्या पिढीला संदेश दिला.

''सध्या ई-बुकचा जमाना आहे; मात्र माझ्या अनुभवानुसार वाचकांना पुस्तक स्वरूपातच वाचन आवडते. म्हणूनच भारतात माझी सर्वांत जास्त पुस्तके विकली जातात,'' असे आर्चर म्हणाले.

मुंबईतील विमानतळावरील एक किस्सा त्यांनी या वेळी सांगितला. कारमध्ये बसले असताना त्यांच्या खिडकीवर एका बारा-तेरा वर्षांच्या मुलाने टकटक केले. त्याच्याजवळ इंग्रजी-हिंदी पुस्तकांची मोठी थप्पी होती. आर्चर यांना त्याने विचारले, 'डू यू वॉंट जेफ्री आर्चर्स लेटेस्ट बुक?' यावर त्यांनी मिश्कीलपणे उत्तर दिले, 'आयएम द लेटेस्ट जेफ्री' या उत्तराबद्दल त्या मुलाच्या चेहऱ्यावर भाव उमटेपर्यंत आर्चर यांची कार तिथून निघून गेली होती.

आर्चर हे भारतीय लेखकांपैकी आर.के. नारायण यांचे मोठे चाहते आहेत. त्यांचे लिखाण ते सातत्याने वाचतात. त्यांना नोबेल मिळावे अशी इच्छाही त्यांनी या वेळी व्यक्त केली.

लिहिलेल्या कथा आणि कादंबरीचा सिनेमा व्हावा, असे कोणत्या लेखकाला वाटत नाही? आर्चर यांचा हिंदी सिनेमाबाबतचा अनुभव मात्र वेगळा आहे. 'एखाद्या कथेवर आधारित बॉलिवूड सिनेमा का नाही,' असे विचारताच ते जरासे रागावलेच! रीतसर परवानगी घेऊन कथेवर सिनेमा करण्याला त्यांची ना नाही; मात्र जगद्विख्यात अशा 'केन अँड एबल'ची कथा 'खुद्दार'साठी न सांगता वापरली जाते, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

तब्बल ९७ देशांत जेफ्री आर्चर यांची पुस्तकं वाचली जातात. जवळपास ३७ भाषांमध्ये ज्यांची पुस्तकं अनुवादित झालेली आहेत. त्यांनी वयाच्या बत्तिसाव्या वर्षी पुस्तकलेखन सुरू केलं आणि आज पंचाहत्तरीच्या उंबरठ्यावर असतानाही ते अव्याहतपणे लिहित आहेत... आणि सगळ्यांत महत्त्वाचं म्हणजे त्यांच्या विविध पुस्तकांच्या विकल्या गेलेल्या प्रतींची संख्या अडीच कोटींपेक्षाही जास्त आहे. 'मायटियर दॅन द स्वोर्ड' या नव्या पुस्तकाच्या निमित्ताने ते २ मार्च रोजी पुण्यात आले होते. चेहऱ्यावरच्या सुरकुत्या आणि कपाळावरचा खास 'ब्रिटिश' आठ्यांमधूनही अखंडित वाहणाऱ्या उत्साहाच्या झऱ्याप्रमाणे निळ्या डोळ्यांच्या या 'बेस्टसेलर' लेखकाने 'फॅन्स'शी मनमोकळा संवाद साधला.

लघुकथा कादंबरीपेक्षा तुलनेने चटकन होते हे खरं. अचूक निरीक्षणं आणि लोकांमध्ये सतत मिसळणं यातून मला लघुकथा मिळत गेल्या. आपल्या प्रत्येकातच एक लघुकथा दडलेली असते. एकदा ती शोधता आली की झालं.

मला कोणत्याही क्षणी, मनात आलेल्या कोणत्याही विषयावर गोष्ट तयार करता येते, ती सांगता येते, हे मी माझं भाग्य समजतो, 'गॉड्स गिफ्ट'! त्यामागे कोणतंही खास असं तंत्र नाही. मनात आलेलं कागदावर उतरवलं की माझी 'स्टोरी' तयार होते. मला स्वत:ला लेखक वगैरे म्हणण्यापेक्षा 'स्टोरीटेलर' म्हणूनच माझी ओळख ठेवावीशी वाटते.

भारतात अजून ई-बुक्सची लाट तेवढीशी येऊन धडकलेली नाही, हे बरंच आहे. हातात धरून शांतपणे वाचता येणाऱ्या पुस्तकांची मजा 'ई-बुक'मध्ये कुठून येणार? भारतीय लोक अजून या तंत्रज्ञानाशी तुलनेने फटकून आहेत, हे जुन्या काळाशी नाळ धरून ठेवणारं आहे. इतर देशांत मात्र हळूहळू कागदी पुस्तकांचं क्षेत्र संकोचायला लागलंय हे खरं.

भारतीय लेखक आर. के. नारायण हे माझे आवडते लेखक - एक सुंदर गोष्ट सांगणारा निवेदक (स्टोरीटेलर) आणि एक अप्रतिम लेखक यांचं

सुरेख मिश्रण होते. आर. के. यांच्या गोष्टी, कथा वाचताना गुंतून जायला व्हायचं. खरंतर त्यांना नोबेल पारितोषिक मिळायला हवे होते.

खूप टॅलेंटेड आणि भल्या लोकांचा देश आहे हा. मुख्य म्हणजे भरपूर वाचणारे लोक मला भारतात दिसून आले. इथली नवी पिढी नव्या महत्त्वाकांक्षांनी अक्षरश: मुसमुसलेली आहे. महिलांचा विविध क्षेत्रांतला वावरही वाढतोय. येत्या २० वर्षांत महिला अधिक सबल झालेल्या असतील, असं मला वाटतं. माझ्या पुढच्या पुस्तकात भारताबद्दल, विशेषत: मुंबईविषयी वाचायला मिळेल तुम्हाला. (आणि हो - भारतीय लोक जेव्हा मला माझी पुस्तकं वाचून ई-मेल करतात ना, तेव्हा त्यात 'या पुस्तकात अमकं तमकं असं असायला हवं होतं' असं आवर्जून लिहून कळवतात, ते मला आवडतं.

लक्षात ठेवा कोणतंही क्षेत्र निवडा... पण यशासाठी खडतर कष्ट घ्यावेच लागतात. मोठं व्हायचं असेल, तर त्यासाठी कोणताही शॉर्टकट नाही आणि लिहिण्याबद्दल म्हणाल, तर जे आवडेल त्याच्याविषयी प्रामाणिकपणे आणि मनापासून लिहायला लागा. अगदी शंभर शब्दांची गोष्ट असली तरी हरकत नाही... पण लिहा तर खरं!

## 'एनएसडी'च्या धर्तीवर 'एमएसडी'

'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाच्या धर्तीवर गोरेगाव येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीत 'महाराष्ट्र स्कूल ऑफ' ड्रामा' (एमएसडी) ही संस्था उभारण्यात येणार आहे. येथे एकावेळी २५० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे,' अशी माहिती राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे यांनी दिली.

राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे 'नटवर्य' प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ अभिनेते श्रीकांत मोघे यांना ज्येष्ठ नाट्यकर्मी अरुण काकडे यांच्या हस्ते आणि 'संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार' कीर्ती शिलेदार यांना ज्येष्ठ गायक रामदास कामत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी पुण्याचे पालकमंत्री गिरीश बापट, महापौर दत्तात्रेय धनकवडे, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक अजय आंबेकर, आमदार विजय काळे, प्रभाकर पणशीकर यांच्या पत्नी विजया पणशीकर आणि संजय भोकरे  उपस्थित होते. या वेळी ज्येष्ठ कलाकारांना दिल्या जाणाऱ्या अनुदानाचे ऑनलाइन हस्तांतरण करण्याच्या उपक्रमाचे उद्‌घाटन तावडे यांच्या हस्ते झाले.

दिल्लीचे 'एनएसडी' पाहिले तेव्हा महाराष्ट्रातही असे एक केंद्र व्हावे, अशी इच्छा निर्माण झाली होती. आघाडी सरकारच्या काळात दादासाहेब फाळके चित्रनगरीचे नूतनीकरण करण्याचे काम सुरू झाले. त्यानंतर आम्ही सत्तेत आलो, योगायोगाने माझ्याकडे सांस्कृतिक खात्याची जबाबदारी आली. तेव्हा मी फाळके चित्रनगरीचा कायापालट करताना तेथे महाराष्ट्र स्कूल ऑफ ड्रामा उभारण्याचा निर्णय घेतला. हे काम सार्वजनिक व खासगी क्षेत्राच्या सहभागातून (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) सुरू आहे,' असे तावडे यांनी सांगितले. तावडे यांच्याकडे सांस्कृतिक खाते आल्यापासून याच्याशी संबंधित निर्णय तातडीने घेतले जात असून भविष्यात कायम राहील असे बापट या वेळी म्हणाले.

## सामरिकशास्त्रातील विविध पैलूंची माहिती

भारत व आशियाच्या सामरिकशास्त्राविषयी अभ्यास करणाऱ्या इन्स्टिटय़ूट ऑफ डिफेन्स स्टडीज अँड ॲनलिसिस या संस्थेची www.idsa.in ही वेबसाइट आहे. सामरिकशास्त्रातील विविध पैलूंवर संबंधित विषयातील तज्ज्ञांनी लिहिलेले शोधनिबंध या वेबसाइटवर उपलब्ध आहेत. याबरोबरच या विषयांवर होणारी व्याख्याने, चर्चासत्रे यांचे ऑडिओ, व्हिडिओही या वेबसाइटवर अपलोड करण्यात येतात. या संस्थेतर्फे प्रसिद्ध होणारी नियतकालिके व पुस्तके इत्यादींची यादीही वेबसाइटवर आहे. संस्थेचे सदस्यत्वही या वेबसाइटवरून घेता येऊ शकते.

## वाचनकौशल्य जोपासा.... माइंड मॅपिंग

कल्पनाचित्र व मार्गदर्शक शब्दांच्या मदतीने संपूर्ण लेखाचा माइंड मॅप तयार करा. मुख्य विचार व कळीचे शब्द आकृतीच्या स्वरूपात दाखविण्याचा प्रयत्न करा. संपूर्ण वाक्ये किंवा तपशील मात्र 'माइंड मॅप'मध्ये दर्शवू नका. वाचत असलेल्या साहित्य प्रकारानुसार तक्ता, ... फॅमिली ट्री, ट्री डायग्राम असे योग्य आकृतिबंध वापरा. उदा. एखाद्या विषयाची साधकबाधक चर्चा वाचताना त्यातील विविध पात्रांची एकमेकांशी असलेली नाती, त्यांनी केलेली वेषांतरे, त्यातून उद्‌भवलेले गैरसमज 'ट्री डायग्राम'च्या स्वरूपात मांडले तर ते गुंतागुंतीचे वाटणार नाही.

आपण वाचणार असलेल्या साहित्याचे पूर्वावलोकन करा अर्थात प्रीव्ह्यू घ्या. आपण काय वाचणार आहोत याची एक साधारण कल्पना

अगोदरच मनात ठेवा. उदा. लेखाचे शीर्षक वाचा. पहिल्या व शेवटच्या परिच्छेदावरून नजर फिरवा. लेखासोबत दिलेली छायाचित्रे, नकाशे किंवा तक्ते लक्षपूर्वक पहा. यावरून लेखाच्या मुख्य विषयाचा अंदाज करता येईल.

**कल्पनाचित्र बनवा :** वाक्ये वाचताना मनात त्यांचे कल्पनाचित्र उभे करण्याचा प्रयत्न करा. सर्व तपशील तुम्हाला व्यवस्थित समजले असतील तर हे चित्र पूर्ण व सुस्पष्ट असेल. चित्र धुसर असल्यास ते अधिक सुस्पष्ट करण्याचा प्रयत्न करा. कथा किंवा घटनाक्रम वाचताना तर चक्क काल्पनिक चित्रपट तयार करा. यामुळे वाचन नीरस किवां कंटाळवाणे न होता जिवंत व चित्तवेधक होते. वाचताना अशा वाचलेल्या गोष्टी अधिक काळ लक्षात राहतात.

**मार्गदर्शक शब्द :** वैचारिक लेख वाचणे अनेकदा कथा वाचण्यापेक्षा अधिक कठीण वाटते. कारण कथेमध्ये स्पष्ट घटनाक्रम असतो आणि पुढे काय घडेल या विषयी वाचकाला उत्कंठा असते. थोड्या वेगळ्या दृष्टीने वाचल्यास लक्षात येईल की, वैज्ञानिक लेखांमध्येही विचारांची मांडणी विशिष्ट क्रमाने केलेली असते. हा क्रम समजून घेणे सोपे होऊन जाते. यासाठी मार्गदर्शक शब्दांकडे बारीक लक्ष द्या. Firstly secondly यासारखे शब्द क्रमवार विचार दर्शवतात. Consequently, as result therefore कार्यकारणभाव दाखवतात तर on the contrary conversely विरुद्ध विचार सूचित करतात.

**पूर्वज्ञान :** प्रीव्ह्यू केल्यानंतर त्या विषयासंबंधी आवश्यकता असल्यास थोडी प्राथमिक माहिती शोधा. उदा. स्थानिक कर म्हणजे काय याची माहिती नसताना त्या कराबद्दलची मतमतांतरे जोखणारा लेख वाचणे अतिशय कठीण वाटेल. कथा/कादंबरी वाचण्यापूर्वी तिच्या पार्श्वभूमीची ओळख करून घ्या.

या लेखातून आपल्याला काय अपेक्षित आहे, त्यानुसार प्रश्नांची यादी तयार करा

उदा. एखाद्या घटनेचे वृत्त वाचताना Wh-Questions (Who, What, When, Where, Why, How) लक्षात घ्या.

प्रत्यक्ष लेख वाचताना नुसतेच शब्द किंवा वाक्ये न वाचता या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी वाचा.

वाचलेल्या लेखाचा एका परिच्छेदात सारांश लिहा. लेखातील मूळ मुद्दे थोडक्यात लिहिता आले तर वाचन यशस्वी झाले असे समजता येईल.

शक्य असल्यास आपल्याला हा लेख आवडला का? त्यातील विचार मते पटली का हेसुद्धा दोन-तीन वाक्यांत लिहून काढा. म्हणजे लेखाचे एक प्रकारे छोटेखानी परीक्षण तयार होईल.

**ग्रुप रीडिंग :** वाचन कंटाळवाणे होण्याचे पहिले मुख्य कारण म्हणजे वाचकाचे औदासीन्य वाढवणारा दृष्टिकोन. वाचताना आपण नुसतेच लेखकाचे विचार ऐकत आहोत असे समजू नका तर आपण लेखकाशी प्रत्यक्ष संवाद साधत आहोत, प्रश्न विचारत आहोत व चर्चा करत आहोत अशी कल्पना करा. वाचनप्रक्रियेत सक्रिय सहभागी झालो किंवा सहभागात्मक दृष्टिकोन ठेवला तर वाचन कधीच जड किंवा कंटाळवाणे वाटत नाही. वाचन हे एकट्याने, एके ठिकाणी बसून करायचे असते अशा समजुतीमुळेही ते कंटाळवाणे वाटत नाही. वाचन हे एकट्याने, एके ठिकाणी बसून करायचे असते अशा समजुतीमुळेही ते कंटाळवाणे वाटते. समविचारी मित्र-मैत्रिणी किंवा सहकारी असले तर गटाने केलेले वाचन रंजक बनते. प्रत्येकाने आळीपाळीने मोठ्याने वाचलेले इतरांनी ऐकायचे असे या 'ग्रूप रीडिंग'चे स्वरूप असते. विविध मते ऐकून, चर्चा करून साहित्य अधिक चांगले समजून घेता येते व मोठ्याने वाचलेले इतरांनी ऐकायचे असे या 'ग्रूप रीडिंग'चे स्वरूप असते. विविध मते ऐकून, चर्चा करून साहित्य अधिक चांगले समजून घेता येते व मोठ्याने वाचन केल्याचे इतर फायदेही मिळतात. उच्चार सुधारतात व आत्मविश्वासही वाढतो. एके ठिकाणी जमून वाचन करणे शक्य नसल्यास बुक क्लब तयार करता येईल. ब्लॉग्ज व स्पेशल मीडियाचा वापर करून असा बुक क्लब ऑनलाइनही चालवत येईल. यशस्वी विद्यार्थी व प्रभावी व्यावसायिक होण्याच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग पद्धतीने वाचनाचा नियमित सराव तुमच्यासाठी निश्चितच उपयोगी ठरेल.

## फेसबुकवर 'मोफत इंटरनेट'

मोबाइल कंपन्यांनी ग्राहकांना विनाशुल्क इंटरनेट देणे सुरू केले तर, या कंपन्यांना 'दानधर्मा'लाच लागावे लागेल, असे एअरटेलचे प्रमुख सुनील मित्तल यांनी फेसबुकचा कर्ताधर्ता मार्क झुकेरबर्गलाच ठणकावले आहे.

'फेसबुक'वरून काही विशिष्ट वेबसाइट पाहण्यासाठी इंटरनेटचे शुल्क द्यावे लागत नाही. फेसबुकने तयार केलेला हा प्लॅन मोबाइल कंपन्यांच्या भागीदारीनेच करण्यात आलेला आहे. वास्तविक, मित्तल यांची 'एअरटेल आफ्रिका' ही कंपनीदेखील भागीदार आहे. भारतात मात्र एअरटेलची

प्रतिस्पर्धक कंपनी रिलायन्स कम्युनिकेशन आणि फेसबुक यांनी भागीदारी केली आहे. मोफत इंटरनेटची सेवा दिली तर अनेक नवे ग्राहक मिळू शकतील आणि या क्षेत्राचा विस्तार होईल, अशी या प्लॅनमागची कल्पना आहे.

बार्सिलोनामध्ये सुरू असलेल्या 'मोबाइल वर्ल्ड काँग्रेस'मध्ये मित्तल यांनी झुकरबर्ग यांची भेट घेऊन मोफत इंटरनेटच्या विरोधात मत मांडले. झुकरबर्ग यांची संकल्पना चांगली असली तरी मोबाइल सेवा पुरवठादार कंपन्यांना स्वत:ला तगवायचे असेल तर उत्पन्न मिळवावे लागेल आणि त्यासाठी सेवांवर शुल्क आकारावेच लागेल, असे आपण स्पष्ट केल्याचे मित्तल यांनी पत्रकारांना सांगितले.

'फेसबुक'मुळे इंटरनेटचा विस्तार होणार हे खरे आहे. पण, मोबाइल कंपन्यांना शुल्क आकारण्याशिवाय गत्यंतर नाही. आता 'एमएमएस'चा वापरही झपाट्याने कमी झालेला आहे. कॉलिंगचा वापरही कमी होत आहे. मग मोबाइल कंपन्यांनी उत्पन्नासाठी काय करायचे? ही बाब फेसबुकलाही माहिती आहे, असे मित्तल म्हणाले. डाटा (इंटरनेट) मोफतच द्यायचा असेल तर सगळा प्रकल्पच परोपकार म्हणून करावा. सरकारनेही स्पेक्ट्रमचा वापर मोफत करावा मग नेटवर्क मोफत वापरता येईल, पण, हे काहीही मोफत होणार नाही हे वास्तव आहे. शिवाय, शुल्क इतके कमी आहे की मोबाइल सेवापुरवठादार कंपन्या खूप नफाही कमावत  नाहीत, असा युक्तिवाद मित्तल यांनी केला.

सध्या स्पेक्ट्रम लिलावाची प्रक्रिया देशात सुरू असून त्याद्वारे सरकारला १.१ लाख कोटी रुपये मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या लिलावात स्पेक्ट्रमचा किमान दरही सरकारने वाढवला आहे. स्पेक्ट्रममुळे मोबाइल कंपन्यांनी विविध सेवा शुल्कांत वाढ केली आहे. त्यात आणखी वाढहोण्याची शक्यता आहे.

व्हॉट्स ॲप, स्काइप, व्हावर यासारख्या संवाद साधण्याच्या विविध सेवांमुळे मोबाइल सेवा पुरवठादार कंपन्यांच्या उत्पन्नावर परिणाम होऊ लागला आहे. अर्थात, या सेवांमुळे मोबाइल सेवा क्षेत्रांचा विस्तार होऊ लागलेला आहे. टेलिफोन ऑपरेटर, सोशल मीडिया आणि ओव्हर द टॉप प्लेअरर्सचा एकमेकांना फायदा होतो. पण, नियामक संसद आणि राजकीय नेतृत्वाने नेटवर्क क्षेत्रातील गुंतवणुकीचा योग्य पद्धतीने विचार करण्याची गरज आहे. मोबाइल सेवा पुरवठादार कंपन्यांचे मोठा नफा खिशात

टाकण्याचे दिवस संपलेले आहेत. डिसेंबरमध्ये एअरटेलने इंटरनेट सेवांसाठी स्वतंत्र शुल्क आकारण्याची घोषणा केली होती, मात्र त्याला झालेल्या प्रचंड विरोधामुळे हा प्लॅन मागे घ्यावा लागला होता.

## ब्लॉगरची हत्या

अविजित राय या तरुण ब्लॉगरला ढाका शहरात भर चौकात इस्लामी कट्टरपंथीयांनी धारदार शस्त्रांनी वार करून ठार केले. रॉय यांचा गुन्हा त्यांच्या लेखी अक्षम्य होता. रॉय एक ब्लॉग चालवत असत. मुक्तो मोनो म्हणजे मुक्त मन नावाचा. त्यात ते व त्यांच्यासारखे अनेक तरुण-तरुणी धर्म, रुढी, परंपरा, संस्कृती यांवर मुक्तपणे विचार व्यक्त करत असत. रॉय यांना जगभरातील एकंदरच धार्मिक कट्टरवादाची कमालीची चीड होती. स्वर्ग आणि नरक या कल्पना धार्मिक आचारसंहितेत मनुष्याला बंदिस्त करून टाकतात, असे त्यांचे म्हणणे होते. यासाठी आइन्स्टाईनपासून ते जॉर्ज बर्नार्ड शॉपर्यंत अनेक विद्वानांची उदाहरणे ते आपल्या ब्लॉगवरून देत असत. अशा पद्धतीची टीका ही जगभरात कायम होत आली आहे. ती योग्य की अयोग्य, हा विषय बाजूला ठेवला तरी अशी टीका करण्याचा मूलभूत अधिकार जगातील प्रत्येक मनुष्याला आहे की नाही, हा प्रश्न अशा हत्यांमुळे अधोरेखित होतो. शार्ली हेब्दोवरील हल्ल्यांप्रसंगीही काही जणांनी त्यात काढण्यात आलेल्या पैगंबरांच्या व्यंगचित्रांविषयी आक्षेप घेतले होते. असे आक्षेप असणे गैरही नाही. मात्र, आक्षेप आहेत म्हणून ते व्यंगचित्र काढणाऱ्या चित्रकाराला किंवा ब्लॉगवर लिहिणाऱ्या लेखकाला मारून टाकणे, हे मानवी संस्कृतीला शोभत नाही.

सौदी अरेबियाच्या पैशांवर जगभरात पोसल्या गेलेल्या वहाबी इस्लामने जगभरातील उदारमतवादी इस्लामी परंपरांना नष्ट करण्याचा चंगच बांधला आहे. इस्लामच्या पाच प्रमुख तत्त्वापैकी आस्तिकतेचे जे तत्त्व आहे, त्याच्या विरोधात उघड भूमिका घेणाऱ्या बुद्धिवंतांना अशा हिंसक प्रतिक्रियांना कायमच सामोरे जावे लागते. त्यामुळेच भारतासारख्या देशात आजही मुस्लिम कट्टरमतवादाच्या विरोधात असलेले मुस्लिम बुद्धिवंतदेखील हमीद दलवाईंच्या नास्तिक मांडणीपासून दूर राहण्याचाच प्रयत्न करतात. रॉय धर्मविरोधात तीव्र शब्दांत टीका करीत असत. रेझा असलान यांच्यासारख्या विख्यात इस्लामी इतिहासाच्या अभ्यासकालाही त्यांच्या टीकेतून सुटता आले नव्हते.

रॉय यांना त्यांच्या ब्लॉगबाबत धमक्या येत असूनही अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी ते सॉक्रेटिस, लॉर्का, पाश, दारियो फो यांच्याप्रमाणे शहीद झाले. एकीकडे बांगलादेशात हे होत असताना आपल्या तामिळनाडूत मुरुगेसन या लेखकाच्या घरात तब्बल २५ गुंड घुसले आणि त्यांनी मुरुगेसन यांना दगड-काठ्यांनी बेदम मारहाण केली. एकंदरच हा भारतीय उपखंड वैचारिकदृष्ट्या असहिष्णू होणे हे भयावह आहे.

## भिन्न चवींबाबत डॉ. बागलेर यांचे मसालेदार संशोधन

तिखट, गोड, आंबट, तुरट... अशा भिन्न चवींच्या मसाल्यांपासून तोंडाला पाणी सुटेल अशा प्रकारे बनणाऱ्या चवदार भारतीय पाककृतींनी एका आंतरराष्ट्रीय समजुतीला धक्का दिला असून, याबाबत विविध खाद्यपदार्थांमधील रेणूंचा माहितीसाठा तयार करून त्याचा शास्त्रीय अभ्यास एका मराठी शास्त्रज्ञाने केला आहे.

समान चवीच्या घटकपदार्थांमुळे खाद्यपदार्थांचा रुचकरपणा वाढतो, असा समज पाश्चात्य जगतात आहे. 'पॉझिटिव्ह फूड पेअरिंग' अशी संज्ञाही त्यासाठी वापरली जाते. खाद्यपदार्थांमधील मूळ रेणू शोधून त्याचे वर्गीकरण करून पाककृतीतील 'फूड पेअरिंग' स्पष्ट केले जाते. भारतीय खाद्यपदार्थांबाबत अशा प्रकारे रेणू शोधून, त्यांचे वर्गीकरण करून विविध पाककृतींमधील या रेणूंचे प्रमाण तपासण्याचे संशोधन डॉ. गणेश बागलेर, अनुपम जैन आणि राखी एन.के. या संशोधकांनी केले आहे. पाश्चात्य पाककृतींमधील घटकांच्या नेमके उलटे चित्र भारतीय पाककृतींमध्ये आढळत असल्याने त्यांनी त्याला 'निगेटिव्ह फूड पेअरिंग' अशी संज्ञा दिली आहे. भारतीय पाककृतीही चवदार असल्याने याबाबतच्या शास्त्रीय संकल्पनेला धक्का मिळाल्याचे मानले जाते आहे. पुणे विद्यापीठातून भौतिकशास्त्रात एमएस्सी केलेले डॉ. बागलेर मूळचे सोलापूरचे असून, सध्या जोधपूर येथील 'इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' मध्ये प्राध्यापक आहेत.

'भारतीय पाककलेचा इतिहास अतिशय प्राचीन आहे. आपल्याकडील पाककृतींतील घटक पदार्थांची संख्याही अधिक असते. भारतीय पाककृतींत कमालीचे वैविध्य आहे. पाककृतींतील घटकांबरोबरच प्रादेशिक वैविध्यही याला कारणीभूत आहे. या पदार्थांमधील रेणू शोधून त्यांबाबतचा माहितीसाठा करण्याबाबतचा प्रकल्प हाती घेण्याची कल्पना 'कॉम्प्लेक्स नेटवर्क्स'चा कोर्स शिकविताना आली.' असे डॉ. बागलेर यांनी सांगितले.

महाराष्ट्रीयन, गुजराती, पंजाबी, बंगाली, मोगलाई, राजस्थानी, जैन आणि दक्षिण भारतीय या प्रकारच्या खाद्यपदार्थांमध्ये वापरल्या जाणाऱ्या विविध मसालेदार पदार्थांचा अभ्यास डॉ. बागलेर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केला. एकूण १९४ घटकांचे त्यांनी पंधरा प्रकारांत वर्गीकरण केले. त्यांमध्ये चव असणारे ११७० रेणू असल्याचे त्यांना आढळले. एकाच पाककृतीत समान चवीचे रेणू किती आणि भिन्न चवीचे रेणू किती हे त्यांनी तपासले. भारतीय पाककृती मूलत: भिन्न चवींवर आधारलेली असल्याने याकडे 'निगेटिव्ह फूड पेअरिंग'चे उदाहरण म्हणून पाहता येईल, असे डॉ. बागलेर यांनी नमूद केले.

भारतीय पाककृतींची चव प्रामुख्याने मसाल्यांमुळेच ठरते. लाल मिरची, मिरे, दालचिनी, लवंग, आले, लसूण, चिंच यांबरोबरच कोथिंबीर, गरम मसाला असे अनेक पदार्थ भारतीय पाककृतींत असतात. या पदार्थांच्या प्रमाणावर चवीतील फरक ठरतो. समुदाय, प्रदेश, भाषा यानुसार मसाल्यांचे प्रमाण बदलते आणि त्यामुळे चवही बदलत जाते. याबाबत या सर्व पदार्थांच्या रेणूंचा अभ्यास डॉ. गणेश बागलेर यांच्या संघाने केला.

## व्हॉट्सअ‍ॅप डेस्कटॉपवर कसे घ्याल?

व्हॉट्सअ‍ॅपची सुविधा आता डेस्कटॉपवरही झाली आहे. तसेच, मोबाइलवरून चॅटिंग करण्यापेक्षा कम्प्युटर आणि लॅपटॉपवरून चॅटिंग करण्याला अधिक प्राधान्य मिळत असल्याचे दिसून येते.

ही नवी फीचर्स केवळ अँड्रॉइड, विंडोज फोन आणि ब्लॅकबेरी १० या ऑपरेटिंग सिस्टिमवरच उपलब्ध आहेत.

यासाठी कम्प्युटर आणि मोबाइल इंटरनेटशी जोडणे महत्त्वाचे आहे. कारण ही सेवा तुमच्या फोनमध्ये असणाऱ्या व्हॉट्सअ‍ॅपची कॉपी डेस्कटॉपवर उपलब्ध करून देते. त्यामुळेच मोबाइल आणि कम्प्युटर ही दोन्ही उपकरणे एकाच वेळी इंटरनेटशी जोडली जाणे आवश्यक आहे. याचा अर्थ असा नाही की मोबाइल इंटरनेटचे बिल कमी येणार आहे.

तुमच्या मोबाइलवर व्हॉट्सअ‍ॅपचे २.१.४९८ किंवा त्यापुढील व्हर्जन असण्याची गरज आहे. आपले व्हर्जन लेटेस्ट आहे अथवा नाही याची खात्री अँड्रॉइड फोनद्वारे केली जाऊ शकते. व्हॉट्सअ‍ॅपवर हे करून पाहा... Menu>Settings>Help>About इथे जाऊन तुम्हाला कळेल की तुम्ही व्हॉट्सअ‍ॅपचे कोणते व्हर्जन वापरत आहात.

डेस्कटॉपवर व्हॉट्सॲप सुरू करण्यासाठी कम्प्युटर/लॅपटॉपवर गुगल क्रोम असण्याची गरज आहे. नसेल तर
www.google.com./chrome/brower/desktop इथून डाउनलोड करता येईल.

आता गुगल क्रोममध्ये web.whatsapp.com वर जा. समोरच एक QR कोड दिसेल. व्हॉट्सॲपवर Menu>Setting>WhatApp web वर जाऊन व्हॉट्सॲप वेबवर क्लिक करा. समोर जो कॅमेरा म्हणून पर्याय येईल, त्याद्वारे QR कोड स्कॅन करा. मोबाइलच्या कॅमेऱ्याच्या मदतीने कम्प्युटर स्क्रीन आला तरीही QR कोड स्कॅन करता येईल.

हा कोड स्कॅन केल्यानंतर तुमच्या समोरील कम्प्युटरवर मोबाइलप्रमाणे व्हॉट्सॲपचे सर्व मेसेज दिसतील. व्हॉट्सॲपच्या लेटेस्ट ॲपवरही whatsapp web चा पर्याय दिला नाही तर व्हॉट्सॲप अनइन्स्टॉल करून पुन्हा व्हॉट्सॲप इन्स्टॉल करावे लागेल. दुसऱ्या वेळी व्हॉट्सॲप इन्स्टॉल करताना जुने मेसेज रिस्टोअर करण्याविषयी विचारले जाईल. तेथे हो म्हणा. आता तुम्ही तुमच्या मित्रांना कम्प्युटरमधून व्हिडिओ, मेसेज आणि फोटो पाठवू शकता... तेही मोबाइलसारखेच.

## स्मार्टफोनमुळे एकाकीपणा वाढतो

स्मार्टफोन वापरण्याच्या फायद्यांबरोबरच अनेक तोटेही समोर येऊ लागले असून, त्याविषयी विविध देशांत संशोधन सुरू आहे. अमेरिकेतील ओहियो प्रांतातील केन्ट विद्यापीठाने केलेल्या एका सर्वेक्षणानुसार, एखादी व्यक्ती दिवसभरात मिळणारा मोकळा वेळ स्मार्टफोनवर घालवत असल्यास ती अधिक एकाकी होते. हा वेळ दहा तासांवर असल्यास एकाकीपणा दिवसेंदिवस वाढत जातो. या सर्वेक्षणासाठी विद्यापीठातील ४५४ विद्यार्थ्यांचे निरीक्षण करण्यात आले. सर्व गट करून त्यांना वेगवेगळ्या प्रकारचे स्मार्टफोन देण्यात आले. स्मार्टफोनचा कमी वापर करणारे बहिर्मुख व्यक्तिमत्त्वाचे, तर अधिक वापर करणारे अंतर्मुख होते. सर्व सहभागी स्मार्टफोन सुमारे दहा तास वापरत असल्याचे आढळले. सतत मोबाईल फोनशी संपर्कात राहिल्याने मोकळ्या वेळेचा पुरेपूर आनंद तुम्ही घेऊ शकत नाही.

ऑनलाइन वाचकांसाठी सुवर्णसंधी

# मेहता मराठी ग्रंथजगत

## Digital Edition

DIGITAL EDITION

'मेहता मराठी ग्रंथजगत'चा अंक
आता डिजीटल स्वरूपात

- इलेक्ट्रॉनिक स्वरूपात असल्यामुळे हवा तिथे पाहू शकता.
- तुमच्या मोबाईलवरही वाचू शकता.
- वाचण्यासाठी मेहता पब्लिशिंग हाऊस अॅप मार्केटमध्ये मोफत उपलब्ध.

आमच्या पुस्तकांवर वर्गणीदारांसाठी सवलत — तीन वर्षांना २५% | पाच वर्षांना ३०%

वर्गणी — ३ वर्षांची वर्गणी ₹३०० | ५ वर्षांची वर्गणी ₹४००

वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टद्वारा
खालील पत्त्यावर पाठवावी.

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

# वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

## बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे
पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड,
टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६
शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क,
कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६
शॉप नं. - जी/१५, प्रोझन मॉल, चिखल ठाणा, एमआयडीसी,
औरंगाबाद - ४३१००६.

अधिक माहितीसाठी संपर्क

www.wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse




## गीतकार शान्ता शेळके

असेन मी, नसेन मी, तरी असेल गीत हे
फुलाफुलांत येथल्या उद्या हसेल गीत हे
अबोल राहुनी स्वत: अबोध सर्व सांगते
उन्हे जळात हालती, तिथे दिसेल गीत हे...

शान्ताबाईंनी आपल्या एकूणच कवितेच्या ह्या भावगर्भ रमलखुणा मांडून रसिक काव्यप्रेमींना आश्वासन दिले होते की, त्यांचे काव्यअस्तित्व चिरंतन असेल. व. पु. काळे ह्यांनी म्हटले होते की, ''शान्ताबाई, तुमच्या तोच चंद्रमा नभात ह्या गीतानं आमच्या आयुष्यात कृष्णपक्षातली रात्र उरलीच नाही.''

पुण्याच्या हुजूरपागेत शिकत असतानाच शान्ताबाईंना मराठी कवितेने भुरळ घातली. शालेय वयात त्यांना गणेश हरी पाटील ह्यांच्या 'रानजाई' ह्या कवितासंग्रहाने झपाटले. त्यांच्या कविता लेखनाला सुरुवात झाली. कोल्हापूरच्या 'महाद्वार' मासिकातून त्यांच्या पहिल्यावहिल्या कविता छापल्या गेल्या. 'सख्या ज्ञानदेवा' या कवितेत आपल्या काव्याची भूमिका त्यांनी मांडली आहे.

तुझ्या पावलांची सख्या धूळ घेते
टिळा लाविते आदरे मस्तकी
तुझी ज्ञानदेवी मराठीत बोले
मराठी वसो तीच माझ्या मुखी...

त्यांचा 'वर्षा' हा काव्यसंग्रह १९४७ साली प्रसिद्ध झाला. त्याच काळात त्यांच्या कथासुद्धा प्रकाशित होत होत्या. कादंबरी, अनुवाद, ललितलेख, समीक्षा हे ही चालू होते. इंग्रजी अभिजात साहित्याचे रूपांतरही त्यांनी केले.



आळंदी येथे झालेल्या एकोणसत्तराव्या साहित्य संमेलनाच्या त्या अध्यक्षा झाल्या. त्या संमेलनाचे उद्‌घाटन करताना स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांनी म्हटले की, ''या वर्षी शान्ताबाई संमेलनाध्यक्षा आहेत– हा त्यांच्या आयुष्यातला आनंदाचा आणि भाग्याचा क्षण आहे. आमच्या दोघींची मैत्री फार निकटची आणि जिव्हाळ्याची आहे.

त्यांच्याशी गप्पा हा एक रसाळ अनुभव आहे. माझी ही साधी, सरळ आणि निगर्वी मैत्रीण, संमेलनाध्यक्षा झाली त्यामुळे आमच्या सर्व घरालाच आनंद झाला आहे.''

शान्ताबाई म्हणजे संस्कृत आणि मराठी साहित्याचा चालता बोलता संदर्भग्रंथ. अफाट स्मरणशक्तीचे त्यांना वरदान प्राप्त झालेले होते. आयुष्यभर त्यांनी केवळ लेखनच केले. ललित लेखन आणि कविता हे त्यांचे प्राणविश्व होते.

गुलजार ह्यांनी आपला 'त्रिवेणी' हा संग्रह शान्ताबाईंना अर्पण केला होता.

शान्ताबाई -  
आप सरस्वती की तरह ही मिली।  
और सरस्वती की तरह ही गुम हो गयी।  
ये 'त्रिवेणी'  
आप ही को अर्पित कर रहा हूँ।

'त्रिवेणी'चा अनुवाद शान्ताबाईंनींच केला होता. शान्ताबाईंच्या निवडक कवितांचे संकलन करून 'किनारे मनाचे' हा कवितासंग्रह प्रा. डॉ. प्रभा गणोरकर यांनी साक्षेपी प्रस्तावनेसह सिद्ध केला. त्या कवितासंग्रहाची अर्पणपत्रिका शान्ताबाईंनीच लिहिली होती.

कविता-
या सुंदर आणि चैतन्यमय सखीला स्नेहपूर्वक अर्पण.
तिने मला सतत सहवास, आनंद आणि सांत्वन दिले.

पन्नास-पंचावन वर्षं कवितेच्या सान्निध्यात आपले एकूणच अस्तित्व जोजवत ठेवले. 'किनारे मनाचे'मध्ये शान्ताबाईंनी म्हटले आहे की, ''वर्षा हा माझा पहिला कवितासंग्रह एकोणिसशे सत्तेचाळीस साली प्रसिद्ध झाला. तेव्हापासून मी कविता लिहिते आहे. या काळात इतर अनेक साहित्यप्रकार मी हाताळले; पण या साऱ्यांमध्ये माझे अत्यंत जिव्हाळ्याचे आणि अतूट नाते केवळ कवितेशीच राहिले.''

'संध्येची पिवळी मलूल किरणे'मध्ये म्हटले आहे की,

आहे निर्जन माळ दूरवर हा जाऊनिया पोचला
माझे नेतिल पाय तोवर असे आहेच जाणे मला
एकाकी पथ आक्रमीत पुढती मी चालते सारखी
नेते पाउलवाट दूर
मजला जी तीच माझी सखी...

'समग्र शान्ताबाई' ग्रंथरूपात प्रसिद्ध होणे ही खरे तर काळाची गरज आहे. विसाव्या शतकातले जे महत्त्वाचे कवी आहेत त्यात शान्ता शेळके यांची एकूणच कविता ध्रुव ताऱ्यासारखी स्थित आहे.

एकविसाव्या शतकात शान्ताबाईंची समग्र कविता दीपस्तंभ ठरेल. शाश्वत आणि आश्वासक मराठी कवितेचा भरजरी पदर म्हणजे शान्ताबाईंची कविता, हे मात्र निश्चित...

**वामन देशपांडे**
९३२४६१५०७७



# पुरस्कार

## द. मा. मिरासदार यांना विंदा करंदीकर पुरस्कार प्रदान

"आयुष्यभर ग्रामीण जीवनावर लेखन करताना त्यातील विनोदावर भर दिला. हा माझा पुरस्कार नसून मराठी विनोदाला मिळालेला पुरस्कार आहे," असे भावपूर्ण उद्‌गार ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांनी काढले. विंदा करंदीकरांसारख्या ज्येष्ठ कवीच्या नावाचा पुरस्कार मला मिळाला हा आनंद मोठा आहे, असे ते म्हणाले. राज्य सरकारतर्फे दिला जाणारा कविवर्य विंदा करंदीकर पुरस्कार स्वीकारताना त्यांनी मिरासदारी शैलीत करंदीकर यांचे काही किस्से ऐकवले.

ज्येष्ठ साहित्यिक नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. पाच लाख रोख, मानपत्र व मानचिन्ह असा हा पुरस्कार आहे. या वेळी सांस्कृतिक कार्य मंत्री विनोद तावडे, समीक्षक गंगाधर पाटील उपस्थित होते.

केशव भिकाजी ढवळे प्रकाशनाचे बाळकृष्ण गणेश ढवळे यांचे जन्मशताब्दी वर्ष सध्या सुरू आहे. या वर्षात ढवळे प्रकाशनाला उत्कृष्ट प्रकाशनाचा पुरस्कार मिळणे ही अभिमानाची गोष्ट आहे. असे अंजनेय ढवळे म्हणाले. ज्येष्ठ प्रकाशक रामदास भटकळ यांच्या हस्ते श्री. पु. भागवत उत्कृष्ट प्रकाशन पुरस्कार त्यांनी स्वीकारला. तीन लाख रोख, मानपत्र व मानचिन्ह असा हा पुरस्कार आहे.

मराठी भाषा भवन बांधण्यापासून मराठीला अभिजात दर्जा मिळवून देण्यापर्यंत नागरिकांच्या अनेक अपेक्षा आहेत. अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देतानांच मराठी साहित्य भारतातील अन्य भाषांत व जागतिक भाषांतही जावे, यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे सांस्कृतिक कार्य मंत्री विनोद तावडे म्हणाले.

## प्रभात पुरस्कार सोहळा

''छत्रपती शिवाजी महाराज यांनी 'आपण जिंकू शकतो' हा आत्मविश्वास इथल्या मावळ्यांमध्ये व प्रजेत निर्माण केला. परकीय आक्रमणामुळे निर्माण झालेल्या अंधकाराच्या अशक्यप्राय आव्हानापासून देशाला सोडविण्याचे काम शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वामुळेच शक्य झाले,'' असे मत गोविंददेव गिरी महाराज यांनी व्यक्त केले.

शिवजयंतीनिमित्त 'प्रभात पुरस्कार' सैनिक मित्र परिवाराचे संस्थापक अध्यक्ष अशोक मेहेंदळे यांना देण्यात आला. विश्व हिंदू परिषदेचे अखिल भारतीय सहसत्संग प्रमुख दादा वेदक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यवाह महेश करपे, अतुलशास्त्री भगरे, मंडळाचे अध्यक्ष किशोर चव्हाण, शमा मेहेंदळे उपस्थित होते. गोविंददेव गिरी म्हणाले, ''रामायण व महाभारतातील चांगल्या गुणांचे एकत्रित रूप म्हणजेच शिवाजी महाराज होय. त्यांना जिजाऊंनी घडविले, तर शहाजी महाराज यांनी त्यांच्या मनात स्वराज्याची ऊर्मी निर्माण केली. आपल्या वडिलांच्या अंत:करणातील हीच ऊर्मी शिवाजी महाराजांनी आपल्या कर्तृत्वाद्वारे प्रत्यक्षात साकारली.''

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अरुण साधू यांना 'जनस्थान' प्रदान

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त व्हावा यासाठी शासन दरबारी प्रयत्न सुरू असले तरी ती जगण्याची, उदरनिर्वाहाची भाषा होण्यासाठी लोकांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. ती प्रतिभा आपल्याकडे आहे. त्या प्रतिभेमागे शासन खंबीरपणे उभे राहील. मुंबईविषयी मराठी भाषिकांमध्ये चिंतेचे वातावरण असले तरी मुंबई महाराष्ट्राचीच आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. नाशिक येथील कालिदास कलामंदिरात कुसुमाग्रज प्रतिष्ठान जनस्थान पुरस्कार फडणवीस यांच्या हस्ते साहित्यिक अरुण साधू यांना प्रदान केला गेला. पुरस्काराचे स्वरूप एक लाख रुपये, मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल असे आहे.

यावेळी फडणवीस यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होत असताना जगात कोणत्या भाषा स्वीकारल्या गेल्या याचा विचार होण्याची गरज व्यक्त केली. रोजगार उपलब्ध करून देणारी भाषा आक्रमक होऊ शकत नसली तरी ती जगण्याची भाषा होण्यासाठी सर्वस्तरावर प्रयत्न होणे आवश्यक आहे, असे फडणवीस यांनी नमूद केले. सत्काराला उत्तर देताना

अरुण साधू यांनी, विदर्भातील असली तरी विदर्भवादी नाही, असा चिमटाही मुख्यमंत्र्यांना काढला.

## डॉ. इर्लेकर पुरस्कार

''जागतिकरणामुळे मानवी व्यवहार, कुटुंब, नातीगोती संकुचित झाली. असून, संवेदनाही हरपल्या आहेत. जगण्या-मरण्याच्या स्पर्धेत मराठी साहित्य कुठे आहे. असा प्रश्न पडतो. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेपासून मराठी साहित्य अजूनही खूप लांब आहे. माणुसकीचे रोपण आता व्हायला हवे. त्यासाठी वास्तववार भाष्य करत भविष्याच्या वेध घेणाऱ्या आणि त्याचा अर्थ लावणाऱ्या लेखक आणि त्यांच्या कलाकृतींची खरी गरज आहे,'' असे मत उत्तम कांबळे यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेत आयोजित पुरस्कार वितरण कार्यक्रमात व्यक्त केले. कवयित्री नीलम माणगावे यांना आणि 'कविताघर प्रकाशना'चे मनोहर सोनावणे यांना 'कवी कुसुमाग्रज पुरस्कार' देण्यात आला. कवयित्री बालिका बिटले यांना 'डॉ. सुहासिनी इर्लेकर स्मृती पुरस्कार' देण्यात आला.

कांबळे म्हणाले, ''मराठी साहित्य हे चळवळीतून व संघर्षातून निर्माण झाले. क्रांतिकारी लेखनाची दीर्घ परंपरा अन्य भाषिकांकडे नाही. मात्र, आता आपण त्याकडे पाठ फिरवत आहोत. समाज असंख्य वेदना सहन करत आहे. प्रतिकूल परिस्थितीतून जात आहे. तरीही त्याचे प्रतिबिंब साहित्यात उमटत नाही. असे साहित्य का जन्माला येत नाही, याचा जाब नवी पिढी विचारेल. स्वत:ला फोडणारा कवीच व्यवस्थेला फोडू शकतो.''

माणगावे म्हणाल्या, ''साहित्य संमेलनामुळेच माझ्यातील लेखकाला जागृत केले. तसेच लेखनाची प्रेरणा मिळाली. त्यामुळेच प्रवासवर्णन व नाटक वगळता सर्व साहित्य प्रकार मला हाताळता आले. माझ्या साहित्याला रडणाऱ्या नव्हे, तर व्यवस्थेला ठोकर मारणाऱ्या धाडसी स्त्रियांचे अनुभवविश्व उतरले आहे.'' पोलिस शिपाई म्हणून कार्यरत असणाऱ्या बिटले यांना वर्दीमागील वेदना मांडताना अश्रू अनावर झाले.

त्या म्हणाल्या, ''पोलिस कितीही कडक असला तरी आतून तो लवचिक असतो. आपली पत्नी, बहीण, मुलगी महिला पोलिस आहे, हे सांगण्याची आपल्याच लोकांना लाज वाटते.


## ‘बर्डमॅन’ ने घेतली ऑस्करझेप

हॉलिवुडमध्ये मानाचे समजले जाणारे ऑस्कर पुरस्कार जाहीर करण्यात आले. सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार ‘बर्डमॅन’ चित्रपटाला जाहीर झाला. ‘बर्डमॅन’ आणि बॉयहूड’ चित्रपटांमध्ये या पुरस्कारासाठी चढाओढ होती.

‘ऑस्कर’ सन्मानासाठी आठ चित्रपटांचे नामांकन करण्यात आले होते. त्यातील ‘बर्डमॅन’ने सर्वोकृष्ट चित्रपट आणि दिग्दर्शक, तर ‘बॉयहूड’ने सहायक अभिनेत्रीचा पुरस्कार पटकावला. ‘बर्डमॅन’चा दिग्दर्शक अलेजांद्री इनारितू याला स्क्रीन प्ले आणि सिनेमॅटोग्राफीचे पुरस्कार मिळाले. जुलियआन मूर हिला अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. ‘स्टिल अलाइस’मध्ये अल्झायमर जडलेल्या प्राध्यापिकेची भूमिका तिने साकारली होती.

‘द थिअरी ऑफ एव्हरीथिंग’ चित्रपटातील स्टीफन हॉकिंगची भूमिका साकारणाऱ्या एडी रेडमेन याला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला. पडद्यावर केवळ १.१३ लक्ष डॉलरचा व्यवसाय करणाऱ्या ‘व्हिपफ्लॅश’ चित्रपटाला सर्वोत्कृष्ट संपादनाचा पुरस्कार मिळाला.

एडवर्ड जे. स्नोडेनने राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित फोडलेल्या माहितीवर आधारित ‘सिटीझन फोर’ला ‘सर्वोत्कृष्ट डॉक्युमेंटरी’चा पुरस्कार मिळाला. ‘इंटरेस्टेलर’ चित्रपटाला सर्वोत्कृष्ट व्हिज्युअल इफेक्ट्स’चा पुरस्कार मिळाला. ॲनिमेटेड चित्रपटाला पुरस्कार ‘डिस्ने’च्या ‘बिग हिरो ६’ ला मिळाला. कॉश्चुम डिझाइनमध्ये ‘द ग्रँड बुडापेस्ट हॉटेल’ ने बाजी मारली.



४थी आवृत्ती

# टू सर विथ लव्ह



मूळ लेखक
ई.आर. ब्रेथवेट

अनुवाद
लीना सोहोनी

मि. ब्रेथवेट, नवे शिक्षक. त्यांनी आपल्या वर्गातील मुलांना शरमेनं मान खाली घालायला लावली. त्यांच्याशी झटापट केली, प्रसंगी कुस्तीसुद्धा खेळली. हळूहळू त्यांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश आणला आणि एक दिवस स्वतःच त्या मुलांवर निरतिशय प्रेम करू लागले.

त्यांच्या वर्गातील गुंडगिरी करणारी, निर्ढावलेली मुलं त्यांना 'सर' म्हणून आदरानं हाक मारू लागली.

त्या मुलांच्या गलिच्छ वस्तीतल्या पोरींना सन्मानानं 'मिस्' म्हणायलाही सरांनीच शिकवलं. त्या मुलांना हात स्वच्छ धुवायला शिकवलं आणि त्याचबरोबर शेक्सपिअरसुद्धा वाचायला शिकवलं.

एका ध्येयानं प्रेरित झालेल्या शिक्षकानं रागाचं, द्वेषाचं, तिरस्काराचं रूपांतर प्रेमात केलं. पौगंडावस्थेतील बंडखोरीचं रूपांतर आत्मविश्वासात केलं. दुसऱ्यांच्या दृष्टिकोनातून विचार कसा करायचा असतो, हे त्या मुलांना शिकवलं. हा त्यांचा विजय होता. एका शिक्षकाच्या तळमळीचा, विद्यार्थ्यांविषयी वाटणाऱ्या कळकळीचा आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे त्यांच्या प्रेमाचा...

२री आवृत्ती

# गोल गोल राणी

स्वाती चांदोरकर




आजकाल आपल्या सभोवती घडणाऱ्या घटनांचे प्रतिबिंब ‘गोल गोल राणी’ यातील कथांमध्ये दिसते.


ब्लँक कॉल्समुळे उद्ध्वस्त झालेली मालविका, पिरॅमिड मार्केटिंगच्या मोहजालात रोहन, पपा सुटावेत यासाठी विलक्षण तडजोडी करणारी ममी... आपण सर्वांनीच पाहिलेले किंवा ऐकलेले असतात. जिद्दीने परिस्थितीशी दोन हात करून पुढे जाणाऱ्या यशवंतला मदत करणाऱ्यांत आपलाही खारीचा वाटा असतो आणि यशस्वी विजाकाकाचा अस्तही आपण पाहिलेला असतो. विक्षिप्त आप्पा, आपल्या नवऱ्याला सांभाळून घेणारी त्यांची समजूतदार सून निमा, कौटुंबिक अडचणींमुळे तऱ्हेवाईक झालेली आप्पांची मुलगी नीलू अशा लोकांनी भरलेली कुटुंबे थोड्या-फार फरकाने शहरात आणि गावात आपल्याला पाहायला मिळतात. आणि यामुळेच या कथा मनाला भावणाऱ्या ठरतात.




**आगामी**

# जिच्या हाती पाळण्याची दोरी

अमेरिकेतील सुप्रसिद्ध आणि विशेष व्यक्तींच्या
मातांचे स्वानुभवाचे मार्गदर्शक बोल




स्टेफनी हर्श आणि हॅना सेलिग्सन

अनुवाद

सुनीति काणे

# मदर नर्चर

*प्रत्येक यशस्वी गोष्टीची सुरुवात होते ती आईपासूनच...*
*बियोन्सला तिचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान कसे मिळाले?*
*कुठून गवसली लान्स आर्मस्ट्राँगला त्याची गती?*
*स्टीव्हन स्पीलबर्गला त्याची सर्जनशील दृष्टी कुठून लाभली?*

जेव्हा स्टेफनी हर्शने तिच्या मुलाला जन्म दिला तेव्हा तिचे विचारचक्र सुरू झाले की, तिच्या मुलाने भविष्यात कशा प्रकारची व्यक्ती व्हावे? उदार, कुटुंबवत्सल, प्रेमळ, धाडसी, व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी; कदाचित तो स्टीव्हन स्पीलबर्गसारखा व्हावा... आणि तिने विचार केला की, स्पीलबर्गच्या आईने त्याचे प्रगल्भ व्यक्तिमत्त्व कसे घडवले असेल? हे कसे शक्य होईल?

स्टीव्हन स्पीलबर्गच्या आईबरोबर संवाद म्हणून सुरू झालेली कल्पना स्टेफनीने राबवली सर्वांत प्रतिभावंत कलाकार, चतुरस्त्र पत्रकार आणि निष्णात खेळाडू यांच्या आईंच्या मुलाखती घेण्याचा तिला ध्यास लागला.

'मदर नर्चर' हे पुस्तक खेळ, राजकारण आणि संगीत यापासून ते साहित्य, मनोरंजन, व्यवसाय या सर्व क्षेत्रांतील यशस्वी मुलांच्या आईंच्या प्रेमळ भावनिक सल्ले आणि अविस्मरणीय अशा व्यक्तिगत प्रेरणादायी कथांचा संग्रह आहे.

जर तुम्ही पालक होण्याच्या तयारीत असाल किंवा पालक असाल किंवा जिने तुम्हाला वाढवले अशा स्त्रीला धन्यवाद द्यायचे असतील, तर 'मदर नर्चर' हे मातृत्वाची भेट साजरी करण्यासाठी योग्य असे पुस्तक आहे.

# रोझ नीलमन
## डेव्हिड नीलमनची आई

''मुलांना काम करण्याचं फर्मान सोडण्याऐवजी स्वत: काम करत असताना त्यांना त्यात सहभागी करून घेणं अधिक श्रेयस्कर असतं.''



डेव्हिड नीलमननं 'जेट ब्लू एअरवेज'ची स्थापना केली. त्यानं ह्या धंद्यात तीन व्यावहारिक डावपेच वापरले : अगदी कमी भाडं, मैत्रीपूर्ण सेवा आणि विमानप्रवासात फुकट खाद्यपेयं पुरवणे. ह्या तिहेरी क्लृप्त्या वापरून आपली विमान कंपनी त्यानं देशात तृतीय स्थानावर नेऊन ठेवली. प्रवाशांची पहिली पसंती असल्याचं पारितोषिक 'कॉन्डे नास्ट ट्रॅव्हलर्स'नं जेट ब्लू एअरवेजला २००३ साली सन्मानपूर्वक दिलं. डेव्हिड आपला व्यवसाय ज्या पद्धतीनं चालवतोय, त्यावरून त्याच्यावरचे कौटुंबिक संस्कार स्पष्टपणे दिसून येत आहेत. तो त्याच्या आरक्षण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना घरबसल्या काम करण्याची मुभा देतो आणि विमानातून प्रवास करणाऱ्यांना हवे तेवढे खाद्यपदार्थ विनामूल्य देतो.

विमान कंपनीतील डेव्हिडच्या व्यवसायाला १९८४ साली प्रारंभ झाला. त्या वर्षी त्यानं अगदी कमी प्रवासी आकार लावणाऱ्या मॉरिस एअर ह्या कंपनीची स्थापना केली. मॉरिस एअरचा अध्यक्ष या नात्यानं, त्यानं विमान व्यवसायात, सर्वांत आधी, कॉम्प्युटरवर तिकीटवितरण करायला आणि घरबसल्या कर्मचाऱ्यांना आरक्षणाचं काम करू द्यायला प्रारंभ केला. जेट ब्लू एअरवेजमध्येसुद्धा हीच प्रथा पाळली जात आहे. त्यांचं कॉल सेंटर

आगळंवेगळंच आहे. आरक्षणासाठी केलेले सर्व दूरध्वनी, घरबसल्या आरक्षण करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या घरी जातात.

विमानव्यवसाय यशस्वीपणे चालवण्याबद्दल डेव्हिडनं आडाखा बांधला होता की, कल्पक, उत्कृष्ट ग्राहकसेवेबरोबरच अगदी कमी शुल्क ठेवलं की, तुम्हाला खूप निष्ठावान ग्राहकवर्ग मिळतो. १९९९ साली डेव्हिडनं ठरवलं की, आपला हा व्यावसायिक सिद्धान्त देशातल्या विमानग्राहकांच्या सर्वांत मोठ्या समूहावर, न्यू यॉर्क शहरात, आजमावून पाहण्याची वेळ आलेली आहे. त्यामुळे त्यानं तेव्हा जेट ब्लू एअरवेजची स्थापना केली. डेव्हिड आपल्या व्हिकीनामक पत्नीबरोबर आणि नऊ मुलांबरोबर, न्यू कॅनन, कनेक्टिकट येथे राहतो.

डेव्हिड हे सात भांवंडांमधलं द्वितीय क्रमांकाचं मूल होतं. त्याची आई नऊ भावंडांपैकी एक होती. त्याची आई ज्या रूढिबद्ध घरात वाढली, त्यामागे अनेक पिढ्यांची परंपरा होती. त्याची आई रोझ नीलमन म्हणते, ''मेफ्लॉवर बोटीतून अमेरिकेत प्रारंभीचे स्थलांतरित आले, त्याच्या कितीतरी पूर्वी आमचं कुटुंब अमेरिकेत येऊन स्थायिक झालं. अमेरिकेत चर्चची ज्या वर्षी स्थापना झाली, त्या वर्षीच आमचं कुटुंब त्या चर्चचं सदस्य बनलं. आमची नातवंडं ही त्या चर्चला जाणारी नववी पिढी असणार आहे. असं क्वचितच घडतं.'' रोझच्या सासरी आणि माहेरी दोन्हींकडे भरपूर मुलंबाळं होती. तीच प्रथा डेव्हिडनं चालू ठेवली आहे. त्याला स्वत:ची नऊ मुलं आहेत.

इतकं मोठं कुटुंब असूनही त्यांच्यात अजिबात विसंवाद नव्हता. ''आमचे कुटुंबीय नेहमी एकमेकांसमवेत असत. आमच्या मुलांचे माझ्या आईवडिलांशी आणि त्याचप्रमाणे माझ्या सासू-सासऱ्यांशी अगदी जिव्हाळ्याचे संबंध होते,'' असं रोझ सांगते. डेव्हिड हा मध्यमवर्गीय वातावरणात वाढला. रोझच्या माहेरी समृद्धी होती; परंतु रोझ प्राप्त परिस्थितीत अत्यंत समाधानी होती. मध्यमवर्गीय वातावरणात ती सुखानं संसार करीत होती.

''दोन्हीकडच्या आजी-आजोबांशी आमचे घनिष्ठ असे संबंध आणि ये-जा असल्यामुळे डेव्हिडचे फक्त त्याच्या आईवडिलांशी आणि भावंडांशीच नव्हे, तर दोन्हीकडच्या आजी-आजोबांशीसुद्धा जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले. आजोबांच्या ज्या किराणा मालाच्या दुकानात डेव्हिडनं लहानपणी काम केलं होतं, ते दुकान मोठेपणी डेव्हिडनं दुरुस्त करून नव्यासारखं करून

दिलं. त्याच्या दुसऱ्या आजोबांचं गुरं राखायचं कुरण त्यानं विकत घेतलं. दोन्हीकडच्या आजोबांची रूढी जिवंत ठेवण्यासाठी डेव्हिडनं ह्या दोन गोष्टी ज्या प्रकारे केल्या, त्या अत्यंत हृद्य होत्या,'' असं रोझ म्हणते.

नीलमन कुटुंब धर्मानं मॉर्मोन या पंथाचं होतं. ह्या धर्मपंथाच्या शिकवणीप्रमाणे, मॉर्मोन धर्माचा प्रसार करण्यासाठी हे कुटुंब मिशनरी म्हणून, ब्राझीलमध्ये जाऊन राहिलं. ''माझा नवरा ब्राझीलमध्ये मॉर्मोन मिशनरी म्हणून काम करत होता. तो अमेरिकेत परत आला, तेव्हा युनायटेड प्रेस इंटरनॅशनलनं त्याला परदेशविषयक पत्रकार म्हणून नोकरीवर नेमलं. त्यानं कबूल केलं होतं की, तो फक्त दोन वर्षंच ब्राझीलमध्ये राहील.

आम्ही तेथे गेलो आणि तब्बल सात वर्ष तिथं राहिलो. आमचा तिथला काळ अतिशय आनंदात गेला.'' डेव्हिड मोठा होत असताना, त्याच्या आयुष्यात चर्चला असाधारण स्थान होतं. चर्चनं त्याला केवळ आध्यात्मिक मार्गदर्शनच केलं नाही, तर त्याच्या मनात आत्मविश्वाससुद्धा जागा केला. भविष्यात मोठा उद्योजक आणि कंपनीचा कार्यकारी संचालक म्हणून यशस्वी कारकीर्द होण्यासाठी हा आत्मविश्वास त्याला अत्यंत उपयुक्त ठरला.

''चर्चमध्ये ही लहान मुलं छोटी-छोटी भाषणं करत असत. त्यामुळे त्यांच्यात सभाधीटपणा आणि आत्मविश्वास आला.'' रोझ डेव्हिडशी दैनंदिन संवाद साधत असे, तेव्हा त्यातून ती त्याला परिपक्व बनवण्याचा कसोशीनं प्रयत्न करत असे. ''मुलं अगदी लहान असल्यापासूनच मी त्यांना ती बरोबरीचीच आहेत, असं समजून त्यांच्याशी बोलत असे.''

जरी डेव्हिडच्या आयुष्यात धर्माला असाधारण स्थान होते, तरी रोझनं त्याच्यावर धर्म लादण्याचा प्रयत्न कधीही केला नाही. त्याऐवजी धर्मामुळे आपल्या स्वत:च्या आयुष्यात किती सकारात्मकता आली आहे, हे ती मुलांना जाणवून देत असे. ''आमच्या सगळ्या मुलांना जाणीव होती की, आमच्या आयुष्यात चर्चला अनन्यसाधारण महत्त्व आहे. परंतु आम्ही कधीही मुलांवर 'मिशनवर जा' अशी सक्ती केली नाही. मिशनरी म्हणून आम्ही केलेलं कार्य त्यांना दिसत होतं.''

रोझ म्हणते की, डेव्हिडला आजूबाजूच्या दुनियेबद्दल अत्यंत आत्मीयता वाटत असे. घरातला कचरा बाहेर नेऊन टाकायचं काम असो की चर्चमध्ये आलेल्या अपंग मुलीला साहाय्य करण्याचं काम असो; डेव्हिडची सेवाभावी वृत्ती नेहमीच जाणवत असे. ''डेव्हिड तेव्हा फक्त तीन-चार वर्षांचाच होता.

चर्चमध्ये एक अपंग मुलगी चाकांच्या खुर्चीत बसून येत असे. आम्ही चर्चमध्ये पोचलो की, डेव्हिड बाहेरच्या फाटकापाशी थांबत असे. तिचे वडील फाटकापाशी गाडी थांबवून आतली चाकांची खुर्ची बाहेर काढत असत आणि त्यात त्या अपंग मुलीला बसवत असत. डेव्हिड तिच्याबरोबर चर्चमध्ये येत असे.''

नीलमन कुटुंबात मनोरंजनासाठी संगीताला खूप प्राधान्य दिलं जात असे. ''आम्ही घर बांधलं, तेव्हा साऱ्या घरात संगीत ऐकू जावं, यासाठी आम्ही स्पीकर्स बसवून घेतले होते. आम्ही शास्त्रीय संगीताच्या खूप साऱ्या टेप्स विकत घेतल्या होत्या. मुलांनी शास्त्रीय संगीताची मनमुराद चव चाखावी, अशी आमची इच्छा होती.'' संगीत हे करमणुकीचं मुख्य साधन होतं. ''आम्हाला नाटकं आवडत असत. संगीत नाटकं तर विशेष आवडत असत. आमच्या गावात छानसं नाट्यगृह होतं. फिरत्या संगीत नाटक कंपन्या आल्या की, आम्ही त्यांचे कार्यक्रम आयोजित करत असू.''

रोझ म्हणते की, खेळ आणि विविध गुणदर्शन कार्यक्रमांबद्दल मुलांकडून त्यांच्या फारशा अपेक्षा नव्हत्या. ''खेळांकडे बघण्याची आमची वृत्ती होती, मजा वाटतेय म्हणून खेळ खेळा. आमच्या सातव्या अपत्यानं पोहायला शिकण्यासाठी नाव घातलं; त्याला ते अजिबात आवडलं नाही, म्हणून त्यानं ते सोडून दिलं. आम्ही कोणताही आक्षेप घेतला नाही.

त्यानंतर तो स्वत:हूनच पोहायला शिकला. आमची कशालाच हरकत नव्हती. आम्ही मुलांवर कसलीही बळजबरी केली नाही.'' घरी नेमून दिलेली कामं मुलांकडून करून घेताना, रोझ स्वत:ही त्यात सहभागी होत असे. ते सामूहिक काम असे. ''मुलांना काम करायचं फर्मान सोडण्याऐवजी, स्वत: काम करत असताना त्यांना त्यात सहभागी करून घेणं अधिक चांगलं, असं माझं मत होतं.''

डेव्हिडची शाळा हा रोझसाठी चिंतेचा विषय होता. डेव्हिड तिसऱ्या इयत्तेत गेला, तेव्हा रोझला त्याच्या हस्ताक्षराबद्दल आणि वाचनातील प्रगतीबद्दल काळजी वाटू लागली होती. तिला एकदा सांगण्यात आलं की, शिकण्याच्या क्षमतेत तो उणा आहे. ''एका उन्हाळ्याच्या सुट्टीत मी त्याला त्याच्या शिक्षकांकडे शिकवणीसाठी दररोज घेऊन जात असे.

उन्हाळ्याची सुटी संपत आली, तेव्हा डेव्हिडचे शिक्षक मला म्हणाले, 'तुम्ही डेव्हिडबद्दल अजिबात चिंता करू नका.' त्याच सुमाराला, आणखी

एक शिक्षक म्हणाले, 'तुम्ही डेव्हिडची चिंता करायचं काहीही कारण नाही, कारण त्याला मदत करायला खासगी सचिवांचा ताफा हजर असणार आहे.'''

शिक्षकांचा सल्ला मनावर घेऊन आणि त्यांनी वर्तवलेल्या भविष्यवाणीतलं सत्य जाणवून, रोझनं डेव्हिडच्या शिकण्याच्या सुमार कुवतीबद्दल चिंता करणं थांबवलं. आज आपल्याला जे यश मिळालंय, त्यामागे आपल्या आईनं आपल्या अभ्यासाबाबत स्वीकारलेलं धोरण कारणीभूत आहे, असं डेव्हिडला प्रांजळपणे वाटतं. कमी शैक्षणिक कुवत असलेल्या मुलांना मदत करणाऱ्या 'स्मार्ट किड्स' ह्या संस्थेचा डेव्हिड मानद अध्यक्ष आहे. तेथील एका मीटिंगमध्ये डेव्हिड स्वत:च्या समस्येबद्दल एकदा सांगत होता. तो म्हणाला, '''आपलं मूल कोणत्या कॉलेजात जाईल, याबद्दल लोक किती काळजी करत असतात.' एका महिलेनं त्याला विचारलं, 'तुझे आई-वडील त्याबद्दल चिंता करत होते का?' तो म्हणाला, 'माझे आई-वडील अजिबात चिंता करत नसत. त्यांनी प्राप्त परिस्थितीचा स्वीकार केलेला होता.'''

जरी रोझची वृत्ती इतकी सकारात्मक होती, तरी डेव्हिडच्या शिक्षणात असंख्य अडथळे आले. ''डेव्हिड तीन वर्षांचा होता आणि बालकमंदिरात जाऊ लागला होता, तेव्हा तो माझ्यापाशी धावत आला आणि माझ्या गुडघ्यांवर डोकं टेकवून हुंदके देऊ लागला. तो मला म्हणाला, 'मला ती अवघड गाणी गाता येत नाहीत आणि ती अवघड चित्रं पण काढता येत नाहीत...' दुसऱ्या दिवशी सकाळी मी त्याच्या खोलीत गेले, तेव्हा तो डोक्याखाली हात घेऊन आढ्याकडे शून्य नजरेनं बघत आडवा पडलेला होता.

मी त्याला म्हटलं, 'डेव्हिड, तुला आयुष्यात पुढं काय बनायचं ते सर्वस्वी तुझ्यावरच अवलंबून आहे, बरं का, तू तुझ्या वडिलांसारखा मोठा, आदर्श माणूस बनू शकशील, किंवा रस्त्यावर भटकणारा मवालीही बनू शकशील. पण तुला जर तुझ्या वडिलांप्रमाणे मोठा, छान माणूस बनायचं असेल, तर बाळा, तुला शाळेत जावं लागेल, तुला मिशनरी म्हणून काम करावं लागेल आणि अशाच अनेक कठीण गोष्टी कराव्या लागतील.''

'आयुष्यात तुला काय बनायचंय, ते सर्वस्वी तुझ्यावर अवलंबून आहे', हे त्याच्या आईचे शब्द डेव्हिडनं मनात जतन करून ठेवले. तो एकोणीस

वर्षांचा झाला, तेव्हा त्यानं आयुष्याच्या त्या निर्णायक टप्प्यावर महत्त्वाचा निर्णय घेतला. ''मी स्वयंपाकघरात उभी होते. तो माझ्याजवळ आला आणि मला म्हणाला, 'मला मिशनवर जायचंय. ममी, तुला काय वाटतं, मी कोण बनणार आहे? डॅडीसारखा मोठा, आदर्श माणूस की रस्त्यावरला मवाली?' हे ऐकून माझ्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले.''

रोझ म्हणते की, ह्या मिशनवर जाण्याच्या अनुभवामुळं आयुष्यच बदलून गेलं आणि आपला व्यवसाय कशा पद्धतीनं करावा, याबद्दलच्या त्याच्या कल्पनांना रूप आलं. ''या मिशनवर काम करत असताना डेव्हिडला जाणीव झाली की, गरीब लोक श्रीमंत लोकांएवढेच किंबहुना अधिकच आनंदानं जगू शकतात.'' या अनुभवामुळे त्याची मानवतेशी ओळख झाली.

''त्याच्या दृष्टीनं सारी माणसं समान आहेत. तो आपल्या सर्व कर्मचाऱ्यांना समानतेने वागवतो. उदाहरण द्यायचे तर त्याच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या बिल्ल्यांवर आकडे असतात, पण त्यांच्यात वरिष्ठ-कनिष्ठ असा कोणताही भेद नसतो.''

डेव्हिड लहान वयाचा असल्यापासूनच त्याला विमानप्रवासाबद्दल आकर्षण आहे, हे रोझच्या लक्षात आलं होतं. ''डेव्हिड लहान होता, तेव्हा आम्ही बऱ्याचदा मोटरनं कॅलिफोर्नियाला जात असू. गाडीत सर्व जण दाटीवाटीनं बसलेली असत. गाडी वेगानं जात असताना जोराचा वारा वाहत असे. डेव्हिड एकदा म्हणाला, 'विमानानं जायला कितीतरी जास्त मजा वाटेल, नाही का?''' डेव्हिडच्या आईला विमानप्रवासाबद्दल फारसं आकर्षण वाटत नव्हतं. ती तेवीस वर्षांची होईपर्यंत विमानात बसलीसुद्धा नव्हती.

डेव्हिडला त्यामुळेच ह्या धंद्याात पडावंसं वाटलं. 'जेट ब्लू' कंपनी चालवताना डेव्हिड जी व्यवस्थापन पद्धत वापरतो, त्यावर रोझच्या संगोपन-पद्धतीचा खोल ठसा उमटलेला जाणवतो. डेव्हिड आपला सारा पगार 'कर्मचाऱ्यांसाठीच्या आपत्कालीन निधी'मध्ये जमा करतो.

सर्व कर्मचारी मिळून ह्या निधीमध्ये डेव्हिडच्या पगाराएवढाच पैसा जमा करतात. जर कोणावर काही आपत्ती ओढवली, तर ह्या निधीमधून त्या व्यक्तीला मदत दिली जाते. डेव्हिडच्या स्वभावाला साजेसंच हे वर्तन आहे. डेव्हिडचा हा स्वभाव त्याच्या आईनं आणि परोपकाराची परंपरा पाळणाऱ्या त्याच्या कुटुंबानं घडवला आहे!

# लीआ ॲडलर
## कल्पक दिग्दर्शक स्टीव्हन स्पीलबर्गची आई



स्टीव्हन स्पीलबर्ग ही हॉलिवूडमधला अग्रगण्य चित्रपट दिग्दर्शक-निर्माता आहे. त्याच्या आईला, लीआ ॲडलरला, 'तुझा मुलगा इतका यशस्वी होईल, हे तुला ठाऊक होतं का?' असा प्रश्न विचारला तेव्हा तिनं उत्तर दिलं, ''मला असं कधीच वाटलं नव्हतं. तो सुपरमार्केटमध्ये सामानाची ने-आण करायचं काम करेल, असं मी धरून चालले होते.'' पंधराव्या वर्षी बरीच मुलं वस्तुतः असंच काम करत असतात; परंतु त्या वयात, स्टीव्हननं त्याचा पहिला चित्रपट तयार केला होता. तो चित्रपट होता – 'एस्केप टू नोव्हेअर.' तो सोळा वर्षांचा झाला, तेव्हा त्यानं तयार केलेला 'फायरलाइट' हा चित्रपट त्यांच्या गावातल्या चित्रपटगृहात दाखवला जाऊ लागला. काही वर्षांनंतर, त्यानं 'अँबलिन' हा चित्रपट बनवला आणि त्या चित्रपटानंतर एका प्रमुख हॉलिवूड स्टुडिओनं त्याच्याबरोबर दीर्घ मुदतीचा करार केला. दिग्दर्शक ह्या नात्यानं, एखाद्या प्रमुख हॉलिवूड-स्टुडिओनं दीर्घ मुदतीचा असा करार इतक्या अल्पवयीन मुलाशी करण्याची ही पहिलीच घटना ठरली!

१९७०च्या दशकात स्टीव्हननं व्यावसायिक चित्रपटनिर्मितीत पदार्पण केलं. त्यानं बनवलेला पहिला व्यावसायिक चित्रपट होता – 'द शुगरलँड एक्स्प्रेस.' त्यानंतर त्यानं दिग्दर्शित केलेल्या 'जॉज' आणि 'क्लोज एन्काउंटर्स ऑफ द थर्ड काइंड' ह्या चित्रपटांनी त्याला आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवून दिली. सिनेमाजगतात आर्थिकदृष्ट्या सर्वांत यशस्वी ठरलेले अनेक चित्रपट त्याच्या खात्यावर जमा आहेत : 'एक्स्ट्रा टेरेस्ट्रियल', 'रेडर्स ऑफ द

लॉस्ट आर्क', 'जुरॅसिक पार्क' आणि 'शिंडलर्स लिस्ट'. शिंडलर्स लिस्ट ह्या चित्रपटासाठी त्याला सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक आणि सर्वोत्कृष्ट चित्रपट अशी दोन 'ॲकॅडेमी ॲवॉर्ड्‌स' देण्यात आली.

त्यानंतर दिग्दर्शनक्षेत्रातील त्याची घोडदौड चालूच राहिली. 'ॲमिस्टॅड', 'सेव्हिंग प्रायव्हेट रायन', दुसऱ्या महायुद्धावर आधारित 'बँड ऑफ ब्रदर्स' ही लघुपटमालिका, 'आर्टिफिशियल इंटलिजन्स', 'मायनॉरिटी रिपोर्ट', 'कॅच मी इफ यू कॅन', 'म्युनिक' हे उत्तमोत्तम चित्रपट त्यानं दिग्दर्शित केले. म्युनिक या चित्रपटाला पाच ॲकॅडेमी ॲवॉर्ड नामांकनं मिळाली आणि म्युनिकसाठी त्याला मिळालेलं 'सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक' हे त्याला मिळालेलं सहावं नामांकन होतं. अमेरिकन फिल्म इन्स्टिटट्यूटनं स्टीव्हनला 'लाइफटाइम ॲचिव्हमेंट ॲवॉर्ड' देऊन त्याचा गौरव केला आहे. 'ॲकॅडेमी ऑफ मोशन पिक्चर्स आर्ट्‌स ॲन्ड सायन्सेस' यांनी त्याला 'अर्व्हिंग जी. थालबर्ग ॲवॉर्ड' देऊन त्याचा गौरव केला आहे.

'राइचस पर्सन्स फाउंडेशन' (ही संस्था त्यानं 'शिंडलर्स लिस्ट' ह्या चित्रपटात झालेल्या नफ्यातून सुरु केली होती.) आणि 'द यू.एस.सी. शोआ फाउंडेशन इन्स्टिटट्यूट फॉर व्हिज्युअल हिस्टरी ॲन्ड एज्युकेशन' (ह्या संस्थेनं ज्यूंच्या छळछावण्यांमधून बचावलेल्या पन्नास हजार लोकांच्या साक्षींचं चित्रीकरण-ध्वनिमुद्रण केलेलं आहे.) ह्या संस्थांसाठी स्टिव्हननं आपला वेळ व पैसा सत्कारणी लावला आहे.

केट कॅपशॉ ह्या अभिनेत्रीबरोबर स्टीव्हननं विवाह केलेला असून त्यांना सात मुलं आहेत.

स्टीव्हननं तेराव्या वर्षी पहिला चित्रपट बनवला. लीआनं तिचं बालपण आणि तिचे आईवडील यांचं जे वर्णन केलं, ते ऐकून स्टीव्हनमध्ये निर्मितिक्षमता – सर्जनशीलता कोठून आली, त्याचा बोध होतो. ''माझं बालपण भीषण बनू शकलं असतं; परंतु तसं घडलं नाही, प्रत्यक्षात ते खूपच चैतन्यमय होतं. माझे वडील रशियन होते आणि ते कलासक्त आणि संगीतवेडे होते.... ते खोलीत चालत प्रवेश करतच नसत; ते बंदुकीच्या गोळीप्रमाणे खोलीत सट्‌कन प्रवेश करत. आम्ही दरिद्री होतो, पण आनंदात होतो.'' लीआच्या वर्णनानुसार, तिचं बालपण अत्यंत आनंदात आणि धार्मिक संस्कारांमध्ये गेलं. '''शब्बात' हा आमच्या घरातला सर्वांत आनंदाचा दिवस असे.'' ह्याच परंपरेला अनुसरून विवाहानंतरसुद्धा लीआनं आपल्या

घरात धार्मिकतेला प्राधान्य दिलं. ''आम्ही नेहमी मेणबत्त्या पेटवून 'शब्बात'चं जेवण घेत असू. जरी आम्ही कधी धर्माचा बडिवार माजवला नसला, तरी मुलांना आम्ही पारंपरिक संस्कारांमध्ये वाढवलं.''

लीआ म्हणते की तिच्या आईला, स्टीव्हनच्या आजीला सर्वांत आधी, स्टीव्हनमधलं वेगळेपण जाणवलं. ''माझी आई ही एक अत्यंत बुद्धिमान स्त्री होती. ती मला नेहमी म्हणत असे, 'त्याच्याकडे लक्ष दे. तो असाधारण आहे!'''

लीआसारख्या मुक्त प्रकृतीच्या स्त्रीला असा सुप्त गुण हेरून त्याला झिलई देणं जमण्यातलं नव्हतं. त्याबाबत आज विचार करताना ती म्हणते, ''माझ्या डोक्यात अशा गोष्टी येतच नाहीत. असा सुप्त गुण माझ्या लक्षातच आला नसता.''

स्टीव्हन सर्व बाबतींत वयाच्या मानानं खूप पुढे होता. एक वर्षाच्या आत तो स्वच्छ उच्चारात बोलू लागला. ज्या वयात त्याच्या बरोबरीची मुलं ट्रक्स घेऊन खेळत होती किंवा इतर खेळांमध्ये मग्न राहत होती, त्या वयात तो घरापाठीमागच्या अंगणात चित्रपट बनवू लागला होता. ''त्याच्या कल्पना इतक्या जगावेगळ्या असत! आणि मला त्याच्या मुलखावेगळ्या कल्पना अतिशय आवडत!!'' इतर आया जेव्हा आपल्या मुलांना 'लिट्‌ल लीग'च्या खेळाच्या सरावासाठी घेऊन जात असत, त्या वेळेस लीआ मात्र लेकाची वेगळ्या प्रकारची सेवा करत असे. ''त्याला जिथे-जिथे चित्रपटाचं चित्रीकरण करावंसं वाटेल, तिथं मी त्याला घेऊन जात असे! तो बारा वर्षांचा होता, तेव्हा त्याला वाळवंटात जाऊन चित्रीकरण करायचं होतं. मी त्याला तिथं घेऊन गेले.'' स्टीव्हन त्याच्या पिढीतला सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक बनला आणि बालपणीसुद्धा तो दिग्दर्शक म्हणूनच चित्रीकरण करत होता, हे त्याच्या भविष्यकालीन भूमिकेला साजेसंच होतं! लीआ म्हणाली, ''मी त्याला काहीही शिकवलं नाही. तो लहान असल्यापासून मलाच दिग्दर्शनाच्या खुब्या सांगत असे.'' तिनं त्याला कधी पुस्तकं वाचून दाखवली का, या माझ्या प्रश्नाला लीआनं उत्तर दिलं की, त्यासाठी त्यांचा कोणताही कधी पूर्वनियोजित वेळ नसे. तिच्या संगोपनाच्या धर्तीबद्दलचं हे बोलकं उदाहरणच म्हटलं पाहिजे. ''जेव्हा केव्हा जमेल, तेव्हा आम्ही त्याची मौज लुटत असू!''

लीआच्या दृष्टीनं स्टीव्हनची आई म्हणून तिचं प्रथम कर्तव्य होतं ते त्याच्या चित्रीकरणाच्या छंदात मन:पूर्वक सहभागी होणं. ''त्याच्यातल्या

सर्जनशीलतेची मला नेहमीच लागण होत असे! मला सर्जनाचा आनंद लुटायला मनापासून आवडतं.'' परंतु लीआनं त्याच्यामधील असामान्य गुणवत्ता पाहून त्याच्यामागे झक्कू-ताड्या लावून त्याला अल्पवयीन निर्माता बनवण्याचा कधीही प्रयत्न केला नाही. स्टीव्हनच्या कलागुणांएवढंच स्वत:च्या कलागुणांकडेसुद्धा ती लक्ष पुरवत होती. ''माझ्यापुढं माझेसुद्धा महत्त्वाचे विषय असत. मी स्वत:च्या उद्योगांमध्येसुद्धा व्यस्त असे. मुलांना एकटं सोडून माझी कामं करायला जाताना मी त्यांना सांगत असे, 'एकमेकांच्या उरावर बसू नका!''' परंतु मुलांना गरज असे, तेव्हा लीआ नेहमीच तिथं हजर राहत असे. ''मला आठवतंय की, तो (स्टीव्हन) कधीकधी घाबरून जात असे; कारण त्याची कल्पनाशक्ती असाधारण अशी होती. तो शांत होईपर्यंत मी त्याला जवळ घेऊन बसून राहत असे.''

लीआनं आयुष्यात जे-जे केलं, त्यात आपला जीव ओतून तिनं ते उत्साहानं केलं. तिच्या मुलानं आईचा हा गुण उचलला आहे. घोंघावणारं वादळ आकाशात वर वर चढताना पाहताना वाटणारा थरार जसा असतो, त्यासारखाच आपला उत्साह आहे, अशी उपमा देऊन लीआ म्हणते, ''मला आयुष्यात उत्तेजना-खळबळ हवीहवीशी वाटते. वादळ चाल करून येतं तेव्हा तुम्ही माझ्याकडे एकदा पाहिलंत की, मी काय म्हणते ते तुम्हाला कळेल!'' ती संगोपनाकडे किंवा आयुष्याकडे कसं बघते ते तिच्या ह्या वाक्यांवरून आपल्याला स्पष्टपणे उमगतं. ''मी आताच्या क्षणाचा उपभोग घेते, आणि कधीही उद्या-परवाबद्दल विचार करत बसत नाही!''

स्टीव्हन लहान होता, तेव्हा त्याच्या आयुष्यात जरी ऊर्जेचा प्रचंड प्रवाह खळाळत असला, तरी त्याचं दैनंदिन जीवन शिस्तबद्ध होतं, असं लीआ म्हणते. ''आम्ही दररोज रात्री सर्व जण एकत्र बसून जेवायचो. आम्हा सर्वांच्या दृष्टीनं तो दिनक्रमाचा अत्यंत महत्त्वाचा भाग होता; कारण आम्ही त्या वेळी एकमेकांना स्फूर्ती देत होतो!''

लीआ म्हणते की, स्टीव्हनला व्यवसायात मदत व्हावी म्हणून ती वाट्टेल ते करत असे आणि अजूनही करायला तयार असते. एकदा तर तिनं त्याच्यासाठी तिच्या स्वयंपाकघरातली नवीकोरी कपाटं खराब केली होती. ''आम्ही नुकतंच सुंदर घर बांधलं होतं आणि राखाडी रंगाची स्वयंपाकघरातली कपाटं नव्यानं बनवून घेतली होती. त्या वेळेस स्टीव्हन फायरलाइट नावाच्या चित्रपटावर काम करत होता. ती एक अफलातून

कलाकृती होती! त्या चित्रपटातल्या एका दृश्यात प्रेशर-कुकरमधल्या चेरीच्या घोसांचा स्फोट होतो, ह्या दृश्याच्या चित्रीकरणासाठी मी चेरीजचे अनेक कॅन्स माझ्या स्वयंपाकघरातल्या कपाटांमध्ये रिकामे केले आणि त्यांचा रस खाली टपकत असताना, स्टीव्हननं त्या दृश्याचं चित्रीकरण केलं. ते चित्रीकरण अगदी वास्तव झालं. मी त्या घरात आणखी आठ वर्षं काढली आणि चेरीच्या रसाचे डाग मला कपाटातून शेवटपर्यंत काढून टाकता आले नाहीत. दररोज मी एक स्पंज घेऊन ते डाग काढून टाकायचा प्रयत्न करत राहिले. माझी कपाटं विद्रूप झालेली असली, तरी स्टीव्हनला उत्कृष्ट चित्रीकरण करता आलेलं पाहून मला हर्ष झाला!''

तिच्या मुलाच्या आयुष्यात तिनं इतर कोणत्या गोष्टींत सहभाग घेतला, या माझ्या प्रश्नाला तिनं उत्तर दिलं, ''पालक-सभेला कधीही न जाणारी जगातली मी एकमेव आई असणार आहे. 'शंभर टक्के पालक आपल्या पालकसभेला हजर राहतात', ही शाळेची प्रथा माझ्यामुळे मोडली गेलीय.'' शाळेत पालकसभांना उपस्थित राहण्याऐवजी लीआ मुलांना प्रवासाला घेऊन जात असे. ''आम्ही भरपूर प्रवास केला. आम्ही भरपूर कँपिंग केलं. मला कँपिंग करायला मनापासून आवडतं.''

स्टीव्हनच्या अभूतपूर्व यशात ती कशा प्रकारे सहभागी झाली, या प्रश्नाला लीआनं उत्तर दिलं, ''मी त्याला नेहमी सांगत असे की, अपराधीपणाची भावना ही वृथा भावना असते... परंतु आम्ही त्याबाबत प्रामाणिक असतो; कारण ही ज्यू धर्माची प्रथा आहे.'' लीआ म्हणते की, ती नेहमी मुलांना बरोबरीच्या नात्यानं वागवत असे आणि त्याचा फायदा झाला. ''मी त्यांना कधीही उपदेशामृत पाजलं नाही. मी मुलांशी मित्रत्वाच्या नात्यानंच बोलत असे. त्यामुळे मी त्यांना जो काही सल्ला देत असे, तो अगदी सहजगत्या, संभाषणाच्या ओघात देत असे. मला वाटतं, त्यामुळेच मी दिलेल्या सल्ल्याकडे माझी मुलं लक्ष देत असावीत. मला वाटतं की, केवळ आईबापांनी सल्ला दिलाय, म्हणून काही मुलं त्या सल्ल्याकडे दुर्लक्ष करतात. स्टीव्हनबरोबर किंवा माझ्या इतर मुलांबरोबर माझी मित्रत्वाची देवघेव असे. मला त्यांनी मित्रच समजावं, अशी माझी इच्छा होती.''

मुलं मोठी होऊन त्यांनी पौगंडावस्था गाठली, तेव्हा त्यांची मन:स्थिती आपल्याला पूर्णपणे माहीत आहे, हे लीआनं त्यांच्यापर्यंत पोचवलं. ''मी मुलांना नेहमी सांगत असे की, तुम्ही एखाद्या पार्टीला गेलात आणि तुम्हाला

तिथे खूप-खूप मजा येत असली, तरी तुम्ही तिथून लवकरच निघायला हवं. तुम्ही असं केलंत, तरच इतरांना तुमचा सहवास आणखी हवाहवासा वाटेल आणि ते तुम्हाला पुन्हा बोलावतील.'' मुलांच्या वयाच्या गरजेनुरूप त्यांना पटेलसा सल्ला देता येण्याची लीआची ही क्षमता मुलांना वाढवताना अत्यंत उपयुक्त ठरली. ''मला बाहेर भटकंती करून चॉकोलेट-संडे-आइस्क्रीम खावंसं वाटलं की, मुलांना शाळेला दांडी मारायला लावून माझ्याबरोबर नेणारी मी (बिनधास्त) आई होते!.... सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांची अंथरुणं सारखी करणं अशासारख्या गोष्टींचीसुद्धा मी त्यांच्यावर कधीही सक्ती केली नाही.'' पण त्याचा अर्थ असा नव्हे की, घरातल्या सर्व गोष्टी नेहमी विनाकलह, सुरळीतपणेच घडत होत्या. ''आम्ही भांडत असू. एकमेकांवर डाफरून किंचाळत असू; पण हे सारं निकोपपणे चालत असे.''

लीआनं स्टीव्हनची जगाच्या गहनतेशी आणि मानवतेशी ओळख करून द्यायचा सुनियोजित प्रयत्न केला. त्याच्या चित्रपटात अनुभवांची जी सखोलता आणि व्याप्ती दिसते, त्यामागे आईनं घडवलेल्या विविध अनुभवांची पुण्याई उभी आहे! ''आम्ही नेहमी जगातल्या विविध स्तरांतल्या लोकांना आसरा देत असू... मग ती व्यक्ती घराची व्यवस्थापक म्हणून काम बघणारी असो किंवा दारूचं व्यसन असलेल्या जोडप्याचं आम्ही आसरा दिलेलं ते मूल असो... आम्ही माणसांच्या दर्जाकडे कधीही लक्ष दिलं नाही. आम्हाला माणसांचा दर्जा लक्षातही येत नसे. माणसाचा दर्जा लक्षात आलाच, तर वरच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाच्या माणसांना जवळ करण्याकडेच आमचा कल अधिक असे. त्यांच्या सहवासातच आम्हाला जास्त बरं वाटत असे.'' लीआ म्हणते की, स्टीव्हन अजूनही अशा प्रकारचंच आयुष्य जगतोय. ''स्टीव्हन आणि केट काटकसरी आहेत. त्यांची मूल्यं मध्यमवर्गीय आहेत. त्यांना मुलांना नीतिमूल्यं शिकवायची इच्छा आहे. मोठं होताना अंगी नीतिमूल्यं बाणवण्यासाठी, तुम्ही कोट्यधीश असताना, तुम्हाला मर्यादा घालून घ्याव्या लागतात. मला वाटतं की, स्टीव्हन सर्व प्रकारच्या लोकांची बाजू समजून घेऊ शकतो – मग ती व्यक्ती मध्यमवर्गीय असो, वर यायला निकरानं धडपडणारी असो की ते एखादं हरवलेलं मूल असो!''

जगाकडे इतक्या सर्जनशील भिंगातून पाहणाऱ्या स्त्रीला शोभेल, अशा शब्दांतच लीआनं तिच्या मातृत्वाचं तत्त्वज्ञान व्यक्त केलं आहे. ती म्हणते की, त्यांच्या दिवाणखान्यात तिचा आणि तिच्या सू नावाच्या मुलीचा एक

फोटो आहे. फोटोतल्या मायलेकी पायजम्याच्या अनौपचारिक पोशाखात आहेत. तो फोटो आपल्या व्यक्तिमत्त्वाची निशाणी आहे, असं लीआ म्हणते. ''तो फोटो इतका नाट्यपूर्ण आलाय. मी त्या क्षणी इतकी आनंदाच्या लाटेवर वाहत होते... आणि मी तशीच आहे. आहे तोच क्षण समरसून जगणारी!''

लीआ म्हणते की, आपलं व्यक्तित्व जपणं – आपण जशा आहोत तसंच राहणं तिला अत्यंत महत्त्वाचं वाटतं आणि हाच गुण तिनं मुलांनासुद्धा शिकवला आहे. ''मला मी म्हणूनच जगायचंय. मला आयुष्यातली माझी भूमिका प्रिय आहे.'' लीआच्या दृष्टीनं तिची ही वृत्ती म्हणजे एक प्रकारे चिरतारुण्याचं वरदानच आहे. ''मला वाटतं की, आई या नात्यानं मला मिळालेलं यश, काही अंशी, माझ्यातलं मूलपण मी कधीही न गमावल्यामुळे मला लाभलेलं आहे!'' स्टीव्हनला त्याच्या स्वप्नपूर्तीला मदत करणारी आई लाभल्यामुळे आणखी महत्त्वाच्या घटनांची शृंखला घडत गेली. ''स्टीव्हननं होतकरू चित्रपट-निर्मात्यांना नेहमीच मदत केलेली आहे. तुमच्यावर कुणाचातरी विश्वास असल्याचं किती महत्त्व असतं हे त्याच्या लक्षात आलंय, असं मला वाटतं.'' हे तत्त्वज्ञान एका रूपकाच्या शिंपल्यात बंदिस्त करीत लीआ म्हणाली.


## लोकोत्तर व्यक्तींच्या माता

मेहता पब्लिशिंग हाऊसने अनुवादासाठी निवडलेली पुस्तकं ही नेहमीच आगळीवेगळी असतात आणि आपल्या अनुभवांचं क्षितिज विस्तारून आपल्या विचारांना चालना देणारी असतात. अनेकदा जाणवलेली ही गोष्ट ह्या पुस्तकाच्या अनुवादाच्या वेळेससुद्धा पुन्हा प्रकर्षानं जाणवली.

आपापल्या क्षेत्रात यशाचं अत्युच्च शिखर गाठूनही पावलं भूमीवर घट्ट रोवून उभ्या असलेल्या, विविध समाजकार्यांसाठी आपला बहुमोल वेळ आणि पैसा सत्कारणी लावणाऱ्या लोकोत्तर हस्तींच्या मातांच्या स्टेफनी हर्श यांनी घेतलेल्या मुलाखती, त्यांनी ह्या पुस्तकात उद्धृत केल्या आहेत. त्यामागचा त्यांचा हेतू आहे यशस्वी मुलं घडवताना ह्या मातांनी कोणती विशेष गोष्ट केली याचा शोध घेणं, आणि आदर्श बालक घडवताना त्यांनी कोणतीतरी विशेष अशी संगोपन-तत्त्वं आचरणात आणली होती का, याचं अन्वेषण करणं.

– सुनीति काणे

२री आवृत्ती




# प्रस्थान

रेखा बैजल

आपल्या मनातच घोंघावणारं वादळ आणि निश्चल उभा हिमालयही असतो. हे सुख-दु:ख अंगावर चालून येतं.
वादळासारखं! व्यक्तिमत्त्वाच्या चिंध्या करत; पण एक लक्षात ठेव प्रणव, समुद्री वादळात जेव्हा जहाज अडकतं आणि कॅप्टन गोंधळतो, तेव्हा त्याला 'आय ऑफ स्टॉर्म' दाखवला जातो. त्या वादळाचा मध्यबिंदू म्हण.
त्या मध्यबिंदूत नीरव शांतता असते.
अगदी आश्चर्यकारकरित्या! जहाजाला त्या 'आय ऑफ स्टॉर्म'मध्ये नेलं की जहाज सुरक्षित राहातं.
तसंच अंतर्मनात एक कोपरा एवढा निश्चल, निवांत निर्माण करावा लागतो, की आयुष्यात कितीही वादळं आली तरी त्या क्षणी मनाला त्या कोपऱ्याचा आसरा घेता यायला हवा.
असा कोपरा प्रयत्नानंच निर्माण करता येतो.
स्वत:ला विसरून, विखरून, ध्यानात किंवा एखाद्या कामात.
हे जीवनाचं रूप आहे.

# पुस्तक परिचय

**आगामी**

# अविचल

समाजाकडून उपेक्षित वागणूक मिळूनही अखेरपर्यंत
समाजाचे हित साधणाऱ्या पाच असाध्य रुग्णांच्या यशोगाथा!




लेखक
रिचर्ड एम कोहेन
अनुवाद
डॉ. वसु भारद्वाज

वास्तव आणि कल्पित यांत एक सीमारेषा असते. ती कायमच अस्तित्वात असते, म्हणूनच वास्तवापासून जरा दूर भासणारं, किंचित अतिरंजित असं कल्पिताचं विश्व माणूस आपल्या बुद्धीच्या साहाय्याने उभं करतो. अपवादात्मकरीत्या, कधी कधी, केव्हातरी ही सीमारेषा बरीच धूसर झाल्याचं आपल्या लक्षात येतं. जे समोर आलेलं असतं, ते खरंच अविश्वसनीय असतं. ते वास्तव आणि कल्पित यांची सरमिसळ असल्याची प्रखर जाणीव आपल्याला एव्हाना झालेली असते, पण तरीही ते निखळ सत्य असतं. प्रत्यक्ष इंद्रियांना अनुभूती देणारं!

प्रस्तुतचं लेखन असंच आहे. त्यात पाच कथा आहेत. त्या कल्पित नाहीत, अतिरंजित तर अजिबातच नाहीत. अमेरिकेतील पाच जणांना असाध्य, जीवघेण्या विकारांनी ग्रासलं, त्यांची ही कथानकं आहेत. आयुष्याकडे डोळे उघडे ठेवून बघणारी, सगळ्यांशी असणारे नात्यांचे धागेदोरे तोडून जगणारी, एएलएसने, ॲमियोट्रॉपिक लॅटरल स्क्लेरॉसिसने ग्रस्त डेनिस ग्लास, सगळा हवाला परमेश्वरावर ठेवून, असीम श्रद्धेने नॉन हॉकिन्स लिम्फोमासारख्या आजाराविषयी तटस्थतेची भूमिका घेणारा बझ वे, मस्क्युलर डिस्ट्रॉफीला आयुष्यातलं परिवर्तन मानणारा बेन कम्बो, आतड्याचे तुकडे झाले तरी क्रॉन्स डिसीजला शरण न जाणारी आणि स्वत:चं आयुष्य नव्याने उभारू पाहणारी सारा लेविन आणि बायपोलर डिसऑर्डरमुळे दुभंगलेली, छिन्नमनस्कता भोगून, नरकाचे चटके सोसून कलंकित झालेला आणि अशाच लोकांसाठी चळवळ उभारून व्हाइट हाऊस समोरच्या परिषदेसमोर खुलं, खुलं आव्हान देणारा लॅरी फ्रिक्स! ही सारी माणसासारखी माणसं! पण असाध्य आजारांना शरण न जाता, आपापली व्यक्तिमत्त्वं उत्तुंग करण्यासाठी त्या आजाराला पायाखालचा दगड समजणारी ही माणसं अलौकिकच म्हटली पाहिजेत. अशा असाध्य आजाराने ग्रस्त झालेल्या, रोजच नरकयातना भोगणाऱ्या आणि मरणाला हातोहात फसवणाऱ्या पाच रुग्णांची ही कथा मांडलीय रिचर्ड कोहेन यांनी. त्या कथा रूढकथांसारख्या नाहीत. आजारपणाच्या असल्या तरी डोळ्यांत सतत अश्रू आणणाऱ्या तर मुळीच नाहीत.

अर्थात आजारासोबत तुटत जाणारी नाती, दुभंगणारी कुटुंबव्यवस्था

यांत आहे. प्रगत उपचारपद्धतीत भावनाशीलतेचा एक जरासा शिडकावाही नाही, पण आहे ती विजिगीषा. आजाराला जिंकण्याची! एक जीवेष्णा... अजून कुणाला तरी वाचवण्याची आणि जोडीला असीम धैर्य, जे सहसा वास्तवात सापडत नाही. जे आपल्याला केवळ कल्पितातच शोधावं लागतं.

लेखनाची शैली निवेदनात्मक असली तरी कथाकथनात्मक आहे. त्यात प्रवाहीपण असलं तरी भरकटणारं निश्चित नाही. कथा आजाराच्या असल्या तरी पोतडीतून काढलेल्या गतानुकालिक नाहीत. अकरा सप्टेंबरचा हल्ला, क्लिंटन प्रशासनाचे सुस्पष्ट दाखले आहेत. 'फक्त समजून घ्या', असा हट्ट नाही, तर 'दु:खाचे क्षण आमच्याकडे पाठवा'चं भावनिक आवाहनही आहे. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे अमेरिकेसारखं बलाढ्य राष्ट्र असाध्य विकाराने ग्रस्त होत चालल्याची धोक्याची सूचनाही आहे. अर्थात ती फक्त अमेरिकेपुरतीच नाही; तर जगातील प्रत्येक देशासाठी आहे.आजाराला तोंड देणं, संशोधनाने आजारावर मात करणं ही गोष्ट वेगळी आणि आजारी व्यक्तीला माणसाप्रमाणे जगण्याची संधी देणं ही गोष्ट वेगळी!

या आजारग्रस्तांच्या भावविश्वाचं खरं खुरं रेखाटन रिचर्ड कोहेन यांनी केलंय. त्यांच्याच भाषेत सांगायचं झालं, तर 'आजारांचे आक्रोश' असले तरी 'आशेचं एक समूहगान' ही आहेच. याच आशेच्या तेवत्या पणतीचं आगमन आपल्याही समाजात व्हावं, एवढीच इच्छा!

'स्ट्राँग ॲट द ब्रोकन प्लेसेस'च्या निमित्ताने आशेचं एक नवं अवतरण रुग्णांच्या व नातेवाइकांच्या मनात होईल, यात शंकाच नाही.

**वसु भारद्वाज**



# लॅरी फ्रिक्स

## आशेचा जिताजागता जागर

मी आणि लॅरी फ्रिक्स दक्षिणेकडच्या दूरवरच्या एका ठिकाणाकडे गाडी चालवत निघालो होतो. त्याचे नाव होते सेंट्रल स्टेट हॉस्पिटल... जी जॉर्जियाची अतिशय कुप्रसिद्ध मानसोपचार संस्था होती. ही संस्था सन १८०० च्या सुमारास स्थापन झाली होती आणि सुरुवातीला तिचे नाव होते 'जॉर्जिया ल्यूनाटिक असायलम्'. त्या दिवशी त्या जुनाट संस्थेची इमारत एखाद्या प्रचंड हत्तीप्रमाणे सुस्तावलेली दिसत होती, जणू काही एखादी वस्तू खराब होऊ नये म्हणून डांबराच्या गोळ्यांत ठेवलेली होती.

एका बाजूला असलेल्या उतारापलीकडे प्रत्येक दिशेला बरेच खळगे दिसत होते. त्या खळग्याबद्दल कुणाला काहीच सांगता येत नव्हते. कुठल्याही प्रकारचे धार्मिक चिन्ह नव्हते. ''ही खळगी संरक्षणासाठी नव्हती...'' लॅरीने सांगितले, ''बरेच जण तिथे गवत कापण्यासाठी जात. मरतानाही ते आपण कुठे आहोत, हे विसरलेले असत.''

त्या गृहस्थाने आपले अश्रू प्रयत्नपूर्वक आवरले. ''चालू दे.'' तो पुन्हा

शांतपणे पहिल्याच स्वरात म्हणाला, ''त्या खळग्यांकडे जायचंच नाही, हे मला शिकवण्यात आलंय. एक मानव या पृथ्वीवर राहात होता आणि आम्हीही त्याच्याशी संबंधित होतो, त्याची ती खूण आहे.''

काही वर्षांनंतर तिथे बसलेल्या शहराच्या नावाने, 'माईलेज व्हिले' च्या नावाने ते रुग्णालय ओळखले जाऊ लागले. ''पोरांनो, जरा चांगलं वागा.'' अशी कानपिचकी पोरांना दिली जाऊ लागली, ''नाहीतर माईलेज व्हिलेला रवानगी होईल.'' जॉर्जियाचे लोक अद्यापही त्या धमकीबद्दल चर्चा करतात आणि आपल्या भांडणाचा शेवट याच धमकीत होतो असे ते सांगतात.

सप्टेंबर महिन्याच्या त्या रविवारी ती जागा स्मशानवत् शांत होती, पण अद्यापही मनावर खोल परिणाम करत होती, थोडी दहशतही वाटत होती. ती कंटाळवाणी भासणारी प्रचंड इमारत म्हणजे एक प्रचंड कारागृहच होते म्हणा ना! जवळपास पंधरा हजार संत्रस्त जीवात्मे तिथे तडफडत होते. ती जागा म्हणजे मनोरुग्णांचे गोदामच होते.

माईलेज व्हिले म्हणजे जॉर्जियाच्या संस्कृतीतील एक वेड्यांचा खेळच झाला होता. प्रवासी त्या मैदानांवर उभे राहून फक्त पाहायचे. जगातले मोठे स्वयंपाकघर बहुधा तिथेच असावे. शाळेच्या सहलीचे ते एक विकृत आकर्षण सुद्धा होते. त्या रुग्णालयाचा भयंकर इतिहास सांगता लॅरीचा गळा भरून आला.

इलेक्ट्रोशॉक थेरपी... रुग्णाला विजेचे झटके देणे... त्यासाठी लागणारी उपकरणे इकडून तिकडे नेली जात होती, त्याचा सरळ अर्थ सारे काही शिस्तीत ठेवायचे असाच होता. एका मजेत असलेल्या पर्यवेक्षकाला जॉर्जिया पॉवर कॉकटेल आणण्याची नेहमीचीच विनंती केली गेली. मानसोपचार तज्ज्ञांनी ती ऐकली... रुग्णाची ती मागणी ऐकून ते म्हणाले, ''जॉर्जिया पॉवरने तुझ्यातला ख्रिश्चन आजच्या दिवसापुरता बाहेर काढला की काय?''

लॅरीने मला तिथे आणले कारण या जागेच्या इतिहासाने आणि त्याच्या कृतीने लॅरीची अनेक दशकांपासून शिकार केली होती. ''ही जागा म्हणजे एक कलंकित कथा आहे.'' तो म्हणाला, ''लोकांना इथे आणलं जायचं आणि सांगितलं जायचं की पृथ्वीवर त्यांचं काही काम नाही.'' तो जरासा थांबला. ''हे आता कदाचित माझं पण घरच असतं. मी गोरा, मध्यमवर्गीय पांढरपेशा नसतो आणि काही करणांमुळे यांच्याशी संबंध आला नसता तर मी इथंच असतो...'' तो जरासा थांबून म्हणाला, ''मी ही मनोरुग्णच आहे.''

जवळपास एका वर्षापूर्वी मी आणि लॅरी जॉर्जियातील क्लिव्हलँडमधील एका रस्त्यावर मा गुच रेस्टॉरंट समोर गाडी थांबवून तसेच बसलो होतो. समोरच्या सीटवर आम्ही थोडा वेळ बसलो होतो. उत्तर अटलांटातील लॅरीच्या ॲप्पलॅचियन केबिनकडून येणाऱ्या घाणेरड्या उताराच्या रस्त्याच्या आम्ही थोडे खाली होतो. आम्ही आमच्या भेटीचा मूळ विषय सोडून इतर गोष्टींवर भरपूर चर्चा केली.

आमची नव्यानेच ओळख झाल्याने लॅरी तसा अद्याप जवळचा वाटत नव्हता. जेवणानंतर जरा ते नाते मोकळे झाले.

''मी दिवसातून किमान तीन वेळा जेवतो.'' मी काहीच विचारले नाही तरी लॅरी म्हणाला.

''आहार हा आजारातून बाहेर पडण्याचा एक मार्ग आहे.'' तो सांगतच राहिला. मी आपली मान हालवली आणि संवाद चालू ठेंवला. त्याची ती पांढरी दाढी, चौकडीचा शर्ट, बंदांचे बूट... तो अगदी सँटाक्लॉज किंवा लाकूडतोड्या सारखा दिसत होता.

मग मानसिक आजाराला नियंत्रणात ठेवण्यासाठी व्यवस्थित जेवण, पुरेशी झोप वगैरे शिस्तीचे काय महत्त्व आहे, हे तो सांगू लागला.

''आपण आपल्यासाठी बऱ्याच गोष्टी करू शकतो.'' टप्प्याटप्प्याने खेळलेली एकेक खेळी, समानता राखण्यासाठी वापरलेले तारतम्य आणि पुन्हा धोक्याच्या सूचनेसाठी एक डोळा सतत उघडा ठेवणे... खरंच अवघड आहे. ''दक्षता ही प्राणरक्षक बनू शकते.'' त्याने निर्णय दिला.

लॅरी हीच दक्षता बहुधा हळुवारपणे, मागे सरत आणि मला दुर्लक्षित करून घेत होता. हे म्हणजे अगदी नेहमीच्या पद्धतीने मानसिक विकारांबाबत लोकांचे अज्ञान कायम राखण्याचा जो प्रयत्न असतो ना, तसेच होते. मला वाटते, मला जे नको होते ना, तेच हे होते, माझ्या समोर ठेवलेल्या सूपप्रमाणे...! मला मोठ्या आतड्याचा कॅन्सर झाल्यापासून, मी दिवसा जवळपास काही खातच नाही. हळूहळू बोलत असला, काही गंभीर असला, तरी लॅरीसोबत राहणे फार वाईट नव्हते. बिचारा सरळ, उत्साही आणि त्याची भेटण्याची इच्छा असणाऱ्यासाठी तरी बरा होता. अद्यापही माझ्यापासून जरा बचावात्मक पवित्रा घेऊन होता.

लॅरीला बायपोलर डिसऑर्डर आहे, त्याला एकेकाळी नैराश्याचे वेड म्हणून ओळखले जायचे. तो सत्तावन्न वर्षांचा आहे, पण त्या मानाने तो खूप

वयस्कर दिसतो; पण एकदा नरकात जाऊन परतलाय. त्याच्या त्या प्रवासाचा नकाशाच त्याच्या चेहऱ्यावरच्या रेषात दिसतो, त्याच्या डोळ्यांत तो वाचता येतो.

हा भयंकर जीवघेणा प्रवास सुरू झाला, तेव्हा लॅरी तरुण होता. त्याची सारी स्वप्ने चुरडली गेली आणि त्याचे भविष्य पुढे जाण्याऐवजी तिथेच खुरटले. मानसिक आजार हा त्याच्या आयुष्यातला प्रश्न बनला नाही, पण आयुष्यच एक प्रश्नचिन्ह बनले. अगदी ते भयाण राक्षस आता नियंत्रणात आले असले तरीही...! एका वेगळ्याच विश्वात तो आत्मसंरक्षणाचा तज्ज्ञ बनला आणि त्याच्यासाठी ही बाबच एक कठीण मार्ग होऊन बसली.

जॉर्जियाला मी काढलेल्या दौऱ्यापूर्वी काही महिने आधी आम्ही वॉशिंग्टन डीसीत पहिल्यांदा प्रत्यक्ष भेटलो होतो, तेव्हा मला त्याच्याशी स्नेहसंबंध जुळल्याची जाणीव झाली. लॅरीची ओढाताण प्रत्यक्ष त्याच्या डोळ्यांत दिसत होती, मी तिच्यावर विश्वास ठेवला. आम्ही त्याने मुक्काम केलेल्या हॉटेलच्या खोलीत बसलो. थोडेफार बोलत होतो, मध्येच टेपरेकॉर्डर घुमत होता.

त्याच्या आयुष्यात आलेल्या या भयानक काळाची माहिती तो सविस्तरपणे हळूहळू अडखळत सांगत होता. मी जरा नाराज होतो, मला भराभरा अगदी प्रवाहीपणे सगळी माहिती हवी होती. बझसोबतचा संवादही असाच कठीण झाला होता. बझ नेहमीच पहिल्या पायरीवर थांबायचा.

जणू काही देव त्याला पुढचे शिकवत असे. लॅरीही बहुधा असाच कुंपणावरून उडी मारण्यासाठी उसळत उसळत बोलत होता.

''लक्षात घे रिचर्ड, जॉर्जिया विद्यापीठात एकेकाळी शिकायला गेलेला मी माणूस आहे. मला चांगली नोकरी होती आणि भरपूर यश होतं. मी पैसाच पैसा जमा केला.'' लॅरी प्रामाणिकपणे म्हणाला, ''आणि एवढं सारं झाल्यानंतर मला जेव्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं, त्यानंतर मी अक्षरश: बडवलेल्या ढोलकीसारखा निरर्थक ठरलो होतो. लोक मनोरुग्णाला अडगळ समजतात आणि माझ्या बाबतीतही हेच झालं होतं.''

या अशा सीमारेषेत बंदिस्त होण्याबद्दल या गृहस्थाला आलेला राग स्वाभाविक होता.

आम्ही पुन्हा ग्रामीण जॉर्जियात भेटण्याचे कबूल केले, लॅरीच्या पर्वतराजीच्या मागच्या भागात...! लवकरच लॅरीची व्होल्कवॅगन बीटल

बझार्ड पर्वतराजीवर त्याच्या केबिनकडे चढून येत होती. हा प्रांत म्हणजे पार सुटकेपलीकडचा होता. ''धक्का बसला ना?'' त्याने हसत विचारले.

आम्ही महामार्ग सोडला, तशी वस्ती विरळ होत गेली आणि रस्ते घाणेरडे दिसू लागले. टर्नर्स कॉर्नर्सवरच गोड्या पाण्याचे सरोवर आम्ही ओलांडले आणि उतार खूपच वाढला. झाडांच्या त्या पट्ट्याच्या पार शेवटी लॅरीचे घर दिसू लागले. ते तसे पार जुनाट दिसत होते, जणू बाहेरून आणून तिथे चिकटवल्यासारखे दिसत होते, एक कुरूप कुबडे घर!

आम्ही कारबाहेर पडलो आणि दोन बोकड तिथे आले. जणू दोन कुत्रे असावेत तसे ते बाजूने फिरले. आमच्यातला रस संपला, तसे ते दूर निघून गेले. सरत्या उन्हाळ्याच्या त्या दुपारी आम्ही लिंबू सरबत पीत लाकडी ओसरीत बसलो.

रात्री आम्ही त्याच्या अजून उंचावर असणाऱ्या शेताकडे गेलो. मोकळ्या आकाशाखाली त्या टेकडीच्या सुळक्यावर आम्ही शांतपणे बसलो. लॅरीने तिथे निसर्गाशी मेळ खाणारा घुमट बांधलाय तो आमच्या वर छत धरून होता.

''ऊर्जा संरक्षण हा माझ्या आध्यात्मिकतेचाच एक भाग आहे.'' त्याने सांगितले. ''विश्वातील साऱ्या गोष्टींबरोबर योग्य व्यवहार हवा.''

आम्ही कडाक्याच्या थंडीत बसलो होतो. समोर पेटवलेल्या शेकोटीवर झुकलो होतो, जणू ती आग पीत होतो.

''तर मग पहिल्यापासून सुरू करू...'' मी म्हणालो.

''रिचर्ड, ती कथा म्हणजे कादंबरीतल्या कल्पनेप्रमाणे आहे.'' तो स्मित करत म्हणाला.

लॅरीने १९७२ मध्ये जॉर्जिया विद्यापीठातून पत्रकारिता हा प्रमुख विषय घेऊन पदवी प्राप्त केली. त्याच्या म्हणण्याप्रमाणे, तो पार्टीत रमणारा माणूस होता. ''मी तसा बाप्तिस्मा घेऊनच लहानाचा मोठा झालो. आम्ही कधी दारू वगैरे घेतली नाही. कॉलेजात आल्यावर मला दारुचा शोध लागला.'' तो म्हणाला, ''तिथं साऱ्यांचा आग्रह होता.. मग मी पण त्यांच्यात गेलो आणि मी अगदी पट्टीचा पिणाराही बनलो.''

काही वर्षांनंतर एका उन्हाळ्यात त्याला काही धार्मिक अनुभव आला. अथेन्समध्ये तो वीजदुरुस्तीचे काम करत होता. तिथे आता विद्यापीठ आहे. तिथून त्याला एका चर्चमध्ये विजेच्या जुन्या तारा बदलवण्यासाठी

पाठवण्यात आले होते.

लॅरीच्या हातात भरपूर काम होते. विचार करायला फुरसत नव्हती. शिडी आणि कामाचे साहित्य हातात घेऊन तो बराच वेळ तिथे गेला होता. ''मी साऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या खिडक्या पाहात होतो....'' आणि..

''काहीतरी सरळ माझ्यावरच आलं.'' त्याला आठवले. ''मला असं काहीतरी आतून सजगता आल्यासारखं आत्मजागृतीचं भान झाल्यासारखं वाटलं आणि त्यावेळी तो अनुभव मी अगदी भरभरून घेतला तसा मी बॅप्टिस्ट असल्यामुळे नेहमीच त्या परमेश्वराशी संलग्न राहण्याची माझी इच्छा होती.. जे काय घडलं, ते तसं फार आश्चर्यकारक नव्हतं.'' मग वेगळं होतं? ''होय, देवाच्या अस्तित्वाची मला जाणीव झाली.'' बझ इथे असता तर त्या पवित्र आत्म्याचं अस्तित्व म्हणाला असता. ''ते वास्तवात जाणवत होतं.''

ही मानसिक विकृतीची सुरुवात होती का? ''नाही..'' लॅरी खांदे उडवत म्हणाला, ''पण माझ्या मोठ्या भावालाही आता असेच अनुभव येत असतात.'' लॅरीने त्या क्षणाला सांस्कृतिक अनुभूतीत जमा करून टाकले. ''हा ग्रामीण भाग आहे आणि ख्रिश्चन धर्माचा प्रचंड प्रभाव आहे. असा अनुभव इथं नेहमीच लोकांना येत असतो.'' तो गालातल्या गालात हसला.

''पण ते काही फारसं महत्त्वाचं नाही... अर्थात् महिन्यानंतर मी पुन्हा आपला पार्टीत दारू वगैरे पिऊन मजेत नाचत होतो. म्हणजे माझ्या नेहमीच्या कार्यक्रमाप्रमाणे...'' लॅरीच्या म्हणण्याप्रमाणे बहुधा पुन्हा तसे घडले.. जास्त सुव्यवस्थित.. बहुधा मानसिक विकृतीची लक्षणेही पाठोपाठ आलीच. स्वत:च्या असाधारण क्षमतेबद्दल आणि काम करण्याच्या वृत्तीबद्दल तो मला सांगतोच.

''त्यानंतर मी लहानसा व्यवसाय सुरू केला, पार्टीला लागणाऱ्या वस्तू आणि फुलं वगैरे विकू लागलो. कॉलेजच्या पोरांना हव्या असतात त्या या वस्तू होत्या. मी आजूबाजूला लक्ष ठेवून त्यांना काय हवं, तेवढं पुरवण्याचं कंत्राट घेऊ लागलो. आमचं चांगलं चालू होतं.''

''त्याच्यातून काही अंदाज काढता येतो का?''

''थोडाफार...'' लॅरी जरासा थांबला. ''मी जरा वेगानेच काम करायला सुरुवात करत होतो. त्याचं नेमकं विश्लेषण कोण करू शकतं?''

लॅरी जरा वेगाने काम वाढवण्याचा प्रयत्न करत होता म्हणजे याचा अर्थ लगेच शून्यावरून साठच्या वेगावर जाऊ शकत होता, असाही नाही.

त्यानंतर मानसिक गोंधळ, विस्कळीतपणा येणे मात्र सहज शक्य होते.

पदवी मिळाल्यानंतर तो दुसरा व्यवसाय करण्याची संधी शोधत असतानाच त्याला सैन्यात काम करण्याची सक्तीची आज्ञा झाली आणि तो सरळ सैन्यात गेला. ''सहा वर्षं अर्धा दिवस; तर सहा महिने पूर्ण सेवा केली आणि उन्हाळ्यात दोन आठवडे लष्करी काम केले.

लॅरी साठ वर्षांचा असतानाही जणू एक छोटा मुलगा झाला होता. तो जणू अद्यापही शाळेतच होता, असे त्याला आठवले. अद्यापही तो आवेग भविष्यात यायचाच होता आणि लॅरीने जपलेली कुठलीही सांस्कृतिक सवय त्याच्यामागे पळवायला होतीच.

लॅरी मग शाळेच्या एका मित्रासोबत, ग्लेनसोबत जमिनीच्या खरेदी-विक्रीच्या धंद्यात गेला. ग्लेनचे वडील यशस्वी उद्योजक होते. त्यामुळे यश मिळण्याची शक्यता जास्त होती, जॉर्जियाच्या त्या उन्हाळ्यात बर्फावरून स्केटिंग करता येण्यासारखी व्यवस्था करता येईल का, हे पाहायचे होते.

''ग्लेनच्या वडलांना ती कल्पना फार आवडली.'' लॅरी अजूनही हसतो.

''ही फार मोठी गोष्ट होती, अशातला भाग नाही, पण सुंदर पोरी भेटण्याची शक्यता मात्र भरपूर होती.'' खरेतर लॅरीला व्यवसायाचा अजिबात अनुभव नव्हता. पण सहकाऱ्यांनी तसे मैदान तयार केले. त्याला हे हिममैदान म्हणायचे आणि सारे मनुष्यनिर्मितच बनवले. मग या जोडीने ॲटलांटा फ्लेमस् या राष्ट्रीय हॉकी लिग टीमसोबत एक करार केला, आधुनिक सुखसोयींसह हॉकी सरावासाठी असे मैदान बनवण्याचा! लॅरीने टीमच्या प्रशिक्षकासोबत राहून हे काम पूर्ण केले. ''आम्ही त्यांना कपडे धुण्यासाठी व वाळवण्यासाठी यंत्रही दिलं. आमचं काम जोरात चालू होतं...'' लॅरीने स्मित केले. ॲटलांटा फ्लेमस् भोवती एकदम प्रसिद्धीचे आकर्षक वलय निर्माण झाले. मग बर्फावरची हॉकी हा हौशी लोकांचा व्यवसाय झाला. लॅरी रात्रीचा व्यवस्थापक म्हणून काम पाहात होता. तसेच दिवसाही लक्ष ठेवत होता. सरतेशेवटी, तोच त्या व्यवसायाचा प्रमुख बनला.

भयंकर तणावाच्या कामाचे ते दिवस होते... पण आत मनोविकृतीचे एक वादळ धुमसतच होते. फ्लेमस्मुळे आयुष्याला खूपच वेग आला होता, आणि सतत आपण प्रचंड वेगाने पाण्यात पोहत आहोत, असे वाटणारा लॅरी आता पडण्याच्या बेतात आला होता. त्याची धावपळ चालूच होती आणि ती एका तरुणाची जबरदस्त आणि सकारात्मक वर्तणूक वाटत होती.

''माझी काम करण्याची ऊर्जा भयानकच होती'' त्याला आठवले. ''मी नेहमी कामाच्या तयारीतच असे. मला दोन चार जणांनी अगदी थरथरत्या हातांनी हस्तांदोलन केल्याचं आठवतं. ते थक्क होत म्हणाले होते, ''बाबा रे, हॉकी खेळायचं आणि लगेच रग्बी खेळायला जायचं म्हणजे.. दोन्ही खडतर कष्टाचे खेळ आहेत.''

त्याने दात काढले, ''ते खेळ होतेच तसे. पण माझ्याजवळ तेवढी ऊर्जा होती, सतत पुढे पुढे जाण्याची शक्ती होती.'' तो खुष होता. ते वेड त्याला नैसर्गिकरित्याच संमोहनात नेत होते. ''फार छान होतं ते.'' तो म्हणाला, ''मला मस्त वाटत होतं. माझा कुठल्याही अडचणीशी कसलाही संबंध नव्हता.''

लॅरी आता उच्चभ्रू वर्गात होता. शहराच्या वायव्य भागात राहणाऱ्या उच्चभ्रू लोकांच्या, श्रीमंत पैसेवाल्या लोकांच्या पार्ट्यांमध्ये तो असायचा. त्याची सायंकाळ.. अर्थात रात्री नाही... सुंदर सुंदर स्त्रियांच्या सहवासात जायची. आजूबाजूच्या प्रत्येकाबरोबर असताना त्याचा अत्युत्साह, ती ऊर्जा व्यक्त व्हायचीच. ''तो भाव फार आकर्षित करणारा असतो.'' लॅरी म्हणाला.

साऱ्या यंत्रणा काही काळापुरत्या सुरू राहतात आणि बंद होतात. पण तुम्ही प्रत्येकाबरोबर त्याच गतीने नाही चालू शकत. त्या वर्गाने धावण्याला एक प्रतिक्रिया म्हणून लॅरीने खूप प्यायला सुरुवात केली. ''जेव्हा तुमचं मन वेगाने धावत असतं तेव्हा तुम्हाला ते सारं भयंकर ऊर्जेने, वेगाने व्यापलेलं वाटतं. मग तुम्हाला त्याचा वेग कमी करण्याची गरज भासते. झोपावंसं वाटतं. मग तुम्ही ते करता, मी स्वत:च औषधं घ्यायला सुरुवात केली.'' प्रचंड मौजमजेला दुसरा पर्यायी शब्द कोणता तर ''स्वत:वर स्वत:च औषधोपचार करणं, हा होय.'' ''नाही, मी लगेच ते बंद केलं. कारण ते अतिशय वाईट होतं.''

''तुम्ही फार उंचीवर जाण्याची दुसरी बाजू म्हणजे... तुम्ही खाली येता..'' लॅरी सांगू लागला. ''पण तुम्हाला फार खाली जाण्याची इच्छा नसते. मग ते नैराश्यात रुपांतरीत होतं.'' लॅरीने स्वत:वर औषधोपचाराचा मारा केला. ''तुम्हालाही असंच वाटतं का रिचर्ड?'' मी होकारार्थी मान हालवली. ''म्हणजे हे काही तसं तर्कशास्त्र नाही.'' लॅरी म्हणाला.

अर्थातच या पद्धतीची मात्रा लागू पडली नाही. ''दारू मदत करतीये असं वाटतं, पण सरतेशेवटी दारु पिणं काही चांगलं होत नाही. कारण ती

फक्त तुमची गती कमी करते आणि झोपी जायला मदत करते. अर्थात गाढझोपेसाठी तिचा काहीही उपयोग नाही.'' तो म्हणाला. तो पुढे सांगू लागला. आपल्यापैकी बऱ्याच जणांचा हा स्वानुभव असतो. दारू पिऊन झोपणे आणि पहाटे उठणे, हे फार थकवा आणणारे असते. ''मला वाटतं मी कुठल्यातरी मानसिक रोगाच्या अवस्थेच्या आसपासच होतो.'' स्वतःच औषध घेत राहिल्याने लॅरीची झोप गायब होत चालली, त्यामुळे लॅरीची अवस्था आणखी बिकट होत चालली.

दारूच्या व्यसनाधीनतेतून हळूहळू लॅरीची कोकेनची ही सवय वाढू लागली. ''अ‍ॅटलांटा फ्लेममधून बाहेर पडलेल्या दोघांनी ती मला सवय लावली.'' पार्टीचा एक भाग म्हणून कोकेनही होतेच. ''तुम्ही सारी रात्र पार्टी करू शकता. माझ्याजवळ सारी शक्ती होतीच.'' ती ओढन थांबवण्याजोगी होती. 'तुम्ही जेव्हा या साऱ्यांच्या केंद्रस्थानी असता, तेव्हा त्या हक्काच्या क्षणी प्रत्येक गोष्ट अशीच अगदी आयुष्याच्या केंद्रस्थानी असते.

ती बर्फावर स्केटिंग करण्याची जागा आणि आजूबाजूची जमीन १९८२ ला विकली गेली. लॅरी बत्तीस वर्षांचा होता. त्या विक्रीने बराच आर्थिक फायदा झाला, कारण त्या जागेची किंमत आता त्या व्यवसायापेक्षा जास्त झाली होती. या व्यवहारातही लॅरी भागीदार होताच. त्याला जवळपास दोन लाख डॉलर्स मिळाले. काही दिवसांनंतर त्याचे लग्न झाले. क्लेमेन्टाईन एक श्रीमंत तरुणी होती, तिची लॅरीसोबत अशाच सामाजिक कार्यक्रमात भेट झाली. प्रेमयाचना झाली आणि लग्नही! जोडपे सगळ्याच बाबतीत वरचढदिसत होते. लग्नानंतर हे जोडपे अतिशय महागड्या, श्रीमंत अशा वस्तीत जाऊन राहू लागले. ''आम्ही चांगले नामांकित होतो. रिचर्ड, गावात आमची दोन घरं होती.''

या जोडप्याची मित्र मंडळीही चांगली होती. ''आम्ही लोकांना सांगत होतो की, आम्हीही सारं काही मिळवणार आहोत.'' लॅरी जरासा थांबला. ''अर्थात् आम्ही सारं काही मिळवणार होतो.'' ''ते सारं फार चांगलं वाटणं नाही.'' तो म्हणाला, ''ते खरे तर माझ्यासाठी ध्येय होते. माझे वडील नौदलात अधिकारी होते. आम्ही आपले मध्यमवर्गीय होतो.''

''पण तेही मोहात पाडणार होतं ना.''

''गंमत करताय का?'' लॅरी हसला. ''सुंदर व्यक्तींबरोबर लटकत राहणं बरं वाटतं. बाकीचं सारं संपून जातं.''

इतर कुणाला माहीत नव्हतं, पण लॅरीने त्याच्या भागीदाराच्या नकळत त्या बर्फाच्या मैदानाच्या व्यवहारातले जवळपास दहा हजार डॉलर्स स्वत:च्या उच्च जीवन जगण्यासाठी घेतले होते. ते त्याने चोरी असल्याचे स्वत:शी कबूल केले होते. तसेच उच्च राहणीसाठी आपण फक्त उसने पैसे घेत आहोत, आणि नंतर परत देऊन टाकू असेही अर्थातच तो स्वत:शीच म्हणाला होता.

''मला ते बरोबर वाटत नव्हतं..'' त्याने मला म्हटले, ''माझी चूक म्हणजे प्रश्न पैशाचा नव्हता, पण मी भागीदाराला गंडवणं याचा होता.'' जेव्हा बर्फाचे मैदान आणि आजूबाजूची जागा विकली तेव्हा कुणी शहाणा नव्हता. हे सारे लॅरीच्या सदसद्विवेकबुद्धीतच गुपीत म्हणून राहिले होते.

लॅरीने सांगितले की, त्याला ना नैतिक दिशा होती, ना उद्योगधंदा, पण तरीही ते आर्थिकदृष्ट्या स्थिर होते. क्लेमेंन्टाईन जिला सारेजण किमी म्हणायचे, तिच्याजवळ पैशाचा चांगला साठा होता. गुंतवणूक होती आणि या जोडप्याला कशाची गरज नव्हती. त्या दोन घरांखेरीज किमी आणि लॅरीने लॅनियर सरोवराच्या काठी एक घर खरेदी केले होते. ते ॲटलांटामधील सरोवराकाठचे सुंदर घर होते. त्यांनी एक नाव खरेदी केली होती. पार्ट्या चालू होत्या. तरीही कारण नसतानाच त्यांना जीवन अस्थिर वाटतच होते.

लॅरी त्याच्या एका आवडत्या काकांसोबत स्त्रियांसाठी ब्लाऊझेस तयार करणाऱ्या कारखान्यात नोकरीला लागला. पण सुरुवातीपासूनच या धंद्यात काहीतरी मोठा घोळ होता आणि नुसती अस्थिरता होती. ''मला वाटतं, आम्ही त्या धंद्याचा व्यवस्थित विचार केलाच नव्हता आणि ज्याबद्दल मला काहीच माहिती नव्हती, अशा धंद्यात मी गेलो होतो, तो व्यवसाय अतिशय तणावपूर्ण होता, हे लॅरीला आठवले.

त्याने आणि किमीने सुट्टीच काढली, १९८४ च्या सुरुवातीला ती दोघे फिनी बेटावर गेले. तीन आठवडे जणू ते आकाशात विहरत होते. ''आम्ही खूप आनंदी होतो.'' लॅरी म्हणाला, ''किमी तर असं म्हणाली की, ती आयुष्यात एवढी सुखी कधीच नव्हती. आम्ही एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडालो होतो.'' परदेशातील त्या सहलीचा आनंद लुटत असतानाच किमीचे वडील अचानक वारल्याची बातमी आली. ''आम्ही पुष्कळ धावपळ केली, पण अंत्यसंस्कारापूर्वी काही पोहोचू शकलो नाही.'' लॅरी म्हणाला.

तिथले सारे आवरून लॅरी परतला आणि लगेच.. लगेचच काही

दिवसात लॅरीत काही बदल दिसू लागले. स्वर्ग मागेच राहिला, त्या ब्लाऊजच्या धंद्यातला प्रचंड तणाव समोर आ वासून उभा होता आणि त्यात आपण पैसे चोरले ही भावना थैमान घालत होती. या न पेलणाऱ्या आयुष्याचे आव्हान जास्तच ताण देऊ लागले.

....आणि एकाच विस्फोटात त्याचे आयुष्य हादरून गेले.

मला खूप मोठ्या प्रमाणात सततच आत्मजागरणाची आणि स्वत:त बदल होताहेत, ही जाणीव होऊ लागली होती. लॅरीच्या शब्दात अजिबात चूक जाणवत नव्हती. नुसता प्रकाशाचा झोत असल्याचा भास त्याला होत होता. ''अचानकच, मी घामाने अक्षरश: निथळून जायचो.'' हा सारा प्रकार अखंड तीन दिवस चालू होता. ''मला असं वाटत होतं, की मी देवाशी जणू झगडतोय, आणि तिसऱ्या दिवशी शेवटी शेवटी, मला खात्री पटली की, देव अस्तित्वात आहे.'' लॅरी आठवून म्हणाला, ''देवाने माझ्यासोबत संपर्क साधला होता आणि माझ्या जीवनाला त्याचा स्पर्श झाला होता आणि अचानक, एक नातं निर्माण झालं.''

हा परिवर्तनाचा जो अनुभव होता, तो सत्य होता, पण देवाशी माझं जे नातं जोडलं गेलंय हा मात्र वेडाचा भाग होता, असं लॅरी म्हणतो.

''तर ते सगळं असं झालं होतं रिचर्ड.''

''किंवा ते असं झालं, असं तुला वाटतं.''

''तो प्रकार माझ्या आयुष्याला कलाटणी देणारा होता.'' लॅरी त्याच्या त्या सत्यानुभूतीवर ठाम आहे. ''धार्मिक अनुभूती माणसाला बदलवते.'' तो लगेच म्हणाला, ''माझा अद्यापही ठाम विश्वास आहे की त्यात काही आध्यात्मिक अनुभव होता. माझ्यासाठी या साऱ्या गोष्टींची सुरुवात चांगल्या, वाईट गोष्टींतून आणि सदर्न बॅप्टिस्ट चर्चमधून झाली.'' मी फक्त ऐकले. ''माझ्या वागण्यासोबतच अजून बऱ्याच गोष्टी प्रकाशात येत होत्या. ती संवेदना होती... देवाचीच... मी देवासोबतचा माझा संबंध या आयुष्यात विसरतो. पण तो होताच.''

लॅरीची त्यावेळी फार ठाम श्रद्धा होती, असं नाही, किंवा त्याचा धार्मिक क्षेत्रात फार कृतिशील सहभाग होता असेही नाही... ''आम्ही कोणत्याच चर्चमध्ये कुठल्याच कार्यक्रमात सहभागी नसायचो. जे काय परिवर्तन झालं ते देवाच्या संदर्भात झालं, धर्माच्या नाही.'' सत्य एवढेच होते की, लॅरीच्या बाबतीतच आत्मजागरणाचा प्रकार घडला होता.

''देव माझ्या जीवनात सक्रिय होता आणि सरळ माझ्याशी संपर्क साधून होता.'' तो म्हणाला. एकदा भर दुपारी एका पर्वतराजीतून आम्ही गाडी चालवत जात असताना आमच्या या संवादाला रंग भरला होता. खूप दूरवर, गावंढळ ग्रामीण परिसरात आमच्या संवादात देवाचा विषय चालू आहे, हे कुणी लक्षातही घेतले नसेल.

''प्रश्न विचारणं आणि त्याची मनोमन उत्तर देणं, हाच माझ्या विचारांच्या प्रक्रियेचा एक भाग होता. मी जसजसा माझ्या विचाराचा तो भाग वापरायला सुरुवात केली तसतसा मी वेगाने पुढे जाऊ लागलो.'' लॅरी शांतपणे देवाशी भावनिक, बौद्धिक संवाद साधत होता. ''रिचर्ड, त्या संवादाने मला अतिमानवी शक्ती दिली. त्याने मला त्या शक्तीत इतकं बांधून घेतलं की मी वर्णन करू शकत नाही. जर देव तुझ्याशी संवाद साधतोय यावर तुझा विश्वास असेल तर तुला आपण अगदी अखंड, अविनाशी आहोत, असं वाटेल.''

लॅरीने या नव्या नात्याचे स्वागत केले होते. ''होय, मी केलं अगदी हृदयापासून, आनंदाने! अर्थात् हा मनोरोगाचा भाग धरला गेला म्हणा. देवाशी संवाद साधणे आणि असं आत्मजागरण की, देव फक्त जगाशीच नाही, तर सरळ सरळ त्यांच्याशीच संवाद साधतोय असं वाटणं, ही अशा आजारी लोकांच्या बाबतीत नेहमीची बाब असते. ''पण माझ्यासाठी तरी तेच वास्तव होतं.''

लॅरीची ठाम खात्री होती की देवाने त्याची वेगळ्या कामासाठी नेमणूक केली होती. त्याने किमीला सांगितले की, त्याला देवाने स्पर्श केला आहे. किमी हादरली आणि तिला त्याची भीती वाटू लागली. तिच्या प्रतिक्रियेला खरी पार्श्वभूमी होती ती, ख्रिश्चन धर्माविषयी तिच्या मनात असलेल्या तिटकाऱ्याची! किमी शांतच राहिली, लॅरीच्या या अनुभवावर काय प्रतिसाद द्यावा याचा विचार करू लागली.

''पण तिचं वागणं मात्र विक्षिप्त होऊ लागलं, कारण देव माझ्याशी संपर्क साधून आहे ही माझी भावना, मला वाटतं, समजवायला जागाच नव्हती. मी देवाची सेवा करण्याच्या माझ्या ध्येयामागे निघालो होतो. काही महिने मी त्याच अवस्थेत होतो.''

असा देवासोबतचा धूसर संवाद पार टोकाला पोहचला होता. लॅरी पुन्हा एक नवा ख्रिश्चन बनून जन्मच घेतोय, हे गृहित धरण्यात आले असावे. पण

किमीच्या दृष्टिपथात कुठलेच परिवर्तन दिसत नव्हते आणि लॅरी तर अगदी पराकोटीच्या अवस्थेला पोहचला असावा.

या संमोहनाचा परिपाक म्हणून की काय, लॅरीच्या मनात ख्रिस्ताने शिकवलेली क्षमायाचना डोकावली आणि तो पुन्हा आपल्या जुन्या धंद्याकडे वळायला तयार झाला. ''मला पैसे चोरल्याबद्दल क्षमायाचना करायची होती.'' तो म्हणाला, ''मला ते माहिती होतं, की ती वेळ आली होती.''

त्याने केलेल्या दृष्कृत्याबद्दल आपल्या भागीदारांना कबुली देण्यासाठी तो तयार झाला, त्याने त्यांची बैठक बोलावली.

''तू त्या बैठकीत असं काही सांगितलंस का की देवावर असणारा ठाम विश्वास माझ्या बाजूने साक्ष देईल... वगैरे?''

''मी खूप घाबरलो होतो...'' त्याने मला सांगितले, ''पण माझा देवावरचा ठाम विश्वास होता. एक महत्त्वाचा मुद्दा होता. किमीही या बैठकीला आली होती.''

''अजून कोणी होतं?''

''भागीदार होते. मी त्यांना सांगितलं की, काही गोष्टी माझ्या हाताबाहेर गेल्या होत्या आणि मी काही पैसे उसनवारीने उचलले होते.''

''मग?''

''रिचर्ड, ते माझ्यावर खटला वगैरे भरतील की काय, हे पण मला कळत नव्हतं. माझ्या मित्राचे वडील, आमचे जुने बॉस, त्यांनी माझ्याकडे पाहिलं आणि शांतपणे म्हणाले. ''ठीक, तू कंपनीचा चाळीस टक्के मालक होतास, त्यामुळे तू जे काही घेतलंस, त्यातल्या साठ टक्क्यांचा तू आमचा कर्जदार आहेस.''

कायद्याच्या सत्त्वपरीक्षेतून लॅरी सुटला. त्याने त्याचे नीतिधैर्य वाढले आणि देवावरचा त्याचा विश्वास अधिकच दुणावला. ''देवाकडून होणाऱ्या या संपर्कावर माझा विश्वास वाढतच चालला.'' आता नेमकी कुठली दिशा पकडायची हे पण लॅरी देवाकडून सल्ला घेऊन ठरवू लागला. अगदी खरंच! ''मी फक्त गाडी चालवत होतो, वळणं पार करत होतो, पण नेमकं शेवट कुठं होणार हे मला माहिती नव्हतं.''

तो स्पष्टपणे सांगतो की देवाचा आवाज त्याने प्रत्यक्षात कधीच ऐकला नाही. तो मौनातच देवाला प्रश्न विचारायचा आणि लगेच उत्तर मिळायचे. अद्यापही त्याचे किमी वगळता इतरांसोबत मौनच होते. ''लोकांसोबत हा

अनुभव वाटून घ्यावा, हा मला अधिकार नव्हताच.'' लॅरी म्हणाला, ''अंत:प्रेरणेतून मला ते कळलं होतं, की मी तो अनुभव फक्त माझ्यापुरता ठेवावयाचा होता.''

जर लॅरीकडून तो अनुभव गमावला गेला असता, तर त्याने ते सामान्य बुद्धीने केलेही असते. ''लोकांना हे सारं स्वीकारायला फार कठिण जातं.'' तो म्हणाला, ''माझ्या या विकृत मनोवस्थेलाही, वास्तवाची पार्श्वभूमी थोडीफार होतीच. अंत:प्रेरणेतून मला हे कळलं होतंच की, काही कृती अशा आहेत, ज्या आपल्याला बांधून टाकतील.'' आजूबाजूच्या जगाची जगण्याची रीतही त्याने सहज अंगिकारली. ''ते सारं माझ्या दृष्टीक्षेपात होतं. मी अगदीच मूर्ख नव्हतो.''

हा उत्साह जोपर्यंत होता तोपर्यंत त्याचाच वरचढपणा होता. मित्र आणि नातेवाईकांपासून त्याला वाचवण्यासाठी धडपड किमी करतच होती, पण त्याला थोपवू मात्र शकत नव्हती. ''जेव्हा हे सारं प्रखर आणि प्रभावी झालं, तेव्हा मी स्वत:ला शांत बसवू शकलो नाही. मी माझा अनुभव साऱ्या कुटुंबीयांना सांगितला.''

लॅरीचा मोठा सावत्र भाऊ, बिलला लॅरी जे सांगत होता ते स्वीकारायला जड जात होते. त्याने आधीच स्वत: धर्माकडे पाठ फिरवली होती, त्यामुळे लॅरीच्या या फाजील धर्मवेडेपणाचा त्याला त्रासच झाला. ''लॅरीच्या या अति धार्मिक वेडामुळे मी पार बाजूला सरलो, कारण त्या दक्षिणेच्या बॅप्टिस्ट लोकांविरुद्धचा माझा विद्रोह मला हे सगळं म्हणजे काळ्या फळ्यावर विनाकारण नखांनी ओरबाडण्यासारखं निरर्थक वाटलं होतं.'' - बिलने सांगितले.

''मी एकटाच होतो, कारण मी दुसऱ्या कुणाच्या लायकीचाही नव्हतो. मी खरंच त्यावर विश्वास ठेवत होतो.'' औषधामुळे वाढलेल्या वजनाने त्याच्या एकटेपणावरही परिणाम केला. ''असं एकटं संन्याशासारखं राहण्यामागचं हे पण कारण होतं, किमान ग्रेस माझ्या आयुष्यात येईपर्यंत तरी...!''

लॅरीची बायको ग्रेस ही, ती दोघे जेव्हा भेटली तेव्हा जॉर्जियामध्ये अविकसितांसाठी एक वकील म्हणून काम बघत होती. ''ती दिसायला सुंदर आहे, यापेक्षा जीवनाबद्दलचे तिचे दृष्टिकोन किती मूल्यवान आहेत, याकडे मी खरंतर आकृष्ट झालो.'' लॅरीने खुलासा केला. ''मोठमोठ्या उद्दिष्टांसाठी

काम करण्यात झोकून स्वत:ला द्या. शेवटी इतर साऱ्या गोष्टींपेक्षा तीच बाब जास्त महत्त्वाची ठरेल.''

तो ठामपणे सांगतो, 'ग्रेसनेही याच प्रकारच्या भावना व्यक्त केल्या. ''जे माणसांना बांधून ठेवतं, तेच खरं तर मूल्यवान असतं.'' मग तिने हसायला सुरुवात केली. ''हं, जरा एक क्षण थांबा...'' ती ओरडली, ''आपण सर्वसाधारण माणसं आहोत. तुम्हाला माहीतेय, आपल्याला खायला आवडतं. खूप. आपण आपल्या घराबाहेरील वस्तूवरही प्रेम करतोच, उदा. आपला कुत्रा...! किती? खूप! आणि लॅरी तर एकदम मस्त माणूस आहे.''

सर्वसाधारण माणसांचा आजारी जोडप्यांबद्दल चमत्कारिक गैरसमजच असतो तोच ग्रेस प्रकट करीत होती. ''जुन्या लोकांचा बहुधा असा एक ठाम विश्वास असतो की, आजारपणामुळे जेवताना गप्पा मारणं शक्य नसतं. ''त्यांचं म्हणणं असतं आजारपण हे साऱ्या गोष्टींच्या केंद्रस्थानी असतं.'' ग्रेसनी सांगितलं. ''पण ते तसं नाहीये म्हणजे वेडं बनण्यापलीकडेही आयुष्यात काही उद्दिष्ट आहेतच! असं तुम्हाला म्हणायचं की काय?'' ''हे बघा रिचर्ड, आपण विमा कार्यशाळा किंवा एखाद्या पुस्तकाबद्दल बोलत आहोत, लॅरीच्या विशिष्ट आजारपणाबद्दल नाही. आपण सिनेमा किंवा सकाळी पेपरात जे काय वाचलं त्याबद्दलही बोलतो.'' कळले. म्हणजे मी आणि मेरेडिथ आपल्या मनोविकृतीवर चर्चा करत असतो, असा प्रकार नाही. किमान तेवढा सहज घेण्यासारखा नाही.

ग्रेसच्या आवाजातले नैराश्य हा त्याचा एक पुरावाच होता. ''लोक एखाद्या मानसिक विकाराबद्दल किंवा एखाद्या रुग्णाबद्दल जो विचार करतात ना, तो त्या आजारापेक्षा भयानक असतो.'' याच विचारांचे प्रतिध्वनी लॅरीच्या विचारातही जाणवत होते. ''म्हणजे मला या आजाराचं निदान करणाऱ्या पेटीत कोंबलं की मी पुन्हा बाहेर येऊच शकत नाही. म्हणजे जर मी एखाद्या विषयाच्या बाबतीत उत्साह दाखवला की लोक म्हणणार, ''नाही, तो तुझ्या आजाराचा परिणाम आहे.'' लॅरीची भावना इथे स्पष्ट होत होती. ''हे थांबणार कधी आणि आपल्या आयुष्यावर नियंत्रण प्रस्थापित होणार.

न्यू हॅवेनच्या थोड्याशा बाजूला असणाऱ्या जेनेरिक मोटार लॉजकडे मी टॅक्सीत बसून चाललो होतो, तिथे मी लॅरीचे चालणारे कामकाज पाहण्यासाठी चाललो होतो. मी त्याला चांगला ओळखत होतो. त्याच्या सहवासात एरवी फारसा तणाव जाणवत नसला तरी त्या दिवशी थोडेसे

अस्वस्थ वाटत होते.

त्या दिवशी सकाळीच मी मानसिक विकारांनी थकलेल्या लोकांसोबत गप्पा मारत बसलो होतो. आता प्रत्यक्ष तिथे जाऊन भेट द्यायची होती. ते काय म्हणतात, ते ऐकायचे होते. लॅरी त्यांचे प्रशिक्षण घेत होता, त्या आजारी लोकांना एकमेकांना मदत करायला शिकवत होता. अर्थात् त्यांनी मदतही करावी, हे शिकवत होता.

थोड्याच वेळात गाडी त्या गर्दीच्या महामार्गावरून जरा बाजूला आली. लवकरच आम्ही एका फारशा आकर्षक नसलेल्या, दुर्लक्षित अशा वाहनतळावर थांबलो. किमान मला तरी तसे वाटले. एकटी एकांतात असलेली ती जागा म्हणजे मानसिक विकारवाल्या लोकांची भेटायची जागा असावी असे वाटत होते.लॅरीने सांगितले की, त्याचा आणि त्याच्या सहकाऱ्यांचाही ठाम विश्वास आहे की, मनोविकारग्रस्त फक्त अशाच लोकांचे ऐकतो, जो त्या मार्गाने किमान जाऊन आलाय. त्यांना एकमेकांकडून थोडं फार ऐकण्याची इच्छा असते.''

लॅरी म्हणाला, ''जे लोकं तिथे होते, त्यांना हे माहिती असतं; डॉक्टरांना नाही.''मी माझ्या खिशातली चिल्लर चाचपत तिथेच उभा राहिलो. लॅरी मस्त हसत दरवाजापाशी उभा होता. आम्ही तळमजल्याकडे गेलो. परिषदेच्या त्या, खिडक्या नसलेल्या दालनात भाग घेणारे एकेक करून आत जात होते. काही जण घोळक्यांनी आले. काही नेहमीचेच गावकरी, म्हातारे होते. गप्पा मारत होते. बोलक्या बाहुल्यांप्रमाणे दिसत होते. लोकांचे आत येणे सुरू असतानाच लॅरीने बोलायला सुरुवात केलीही!

मी शांतपणे बसलो. त्यांचे येणे आणि शिष्टाचार निरखत बसलो. पुरुष आणि स्त्रियाही स्मित करत होत्या. बरेच जण जागेवर जाता जाता जवळ येऊन स्वागत करत होते, काही जवळच बसत होते. त्यांनी हातात हात मिळवला, कुणी कॉफी आणून दिली.

बऱ्याच जणांच्या हातात पॅड आणि कागद होते आणि आमची जशी लहान लहान गटात विभागणी झाली तशा त्यांनी समोरच्या टेबलावर त्यांच्या वस्तू ठेवायला सुरुवात केली. ते तिथे आपले काम पूर्ण करणारच होते, याबाबत ठाम होते. बरेच जण एकमेकांना ओळखत असावेत आणि लॅरीसोबत फार सहजतेने वागत होते. हा सहजपणा, बहुधा त्याच्या त्यांच्यासोबतच्या सहज वागण्यातून आला असावा.

‘‘जगात विश्वास उडालेली बरीच माणसं आहेत.’’ लॅरीने मला नंतर सांगितले. ‘‘ते नवीन संबंध शोधत असतात. तो विश्वास पुन्हा शोधण्यासाठी संघर्ष करत असतात.’’ तो क्षणभर थांबला, ‘‘आणि हेच कठीण काम आहे.’’ तो म्हणाला.

पर्वतावरच्या त्या छोट्याशा घरात लॅरी आणि ग्रेस यांना पाहणे म्हणजे समजूतदारपणा पाहण्याची कसरत करणेच होते. समन्वय.. जास्तच अचूक सांगायचे झाले तर....! सकाळी सकाळीच लॅरी कॉफी घेऊन बेडरूममध्ये हजर व्हायचा. तेव्हापासून समजूतदारपणा सुरू व्हायचा. हा माणूस पत्नीवर भक्ताप्रमाणे प्रेम करतो.

‘‘तुला माहिती आहे की नाही, मला माहिती नाही, पण ग्रेसनेही एकदा स्टेट सायकियाट्रिक हॉस्पिटलमध्ये उपचार घेतलेला आहे...’ लॅरी म्हणाला, ‘‘खंबीरपणा आणि असामान्य जाणीव यामुळे तिने ते सहज पार केलं. ती खरंच खंबीर, बुद्धिमान आहे.’’

ग्रेसलाही कधी कधी नैराश्याचा त्रास होतो. ‘‘आमच्या संबंधाचा तो काही परिणाम आहे का ते मला माहीत नाही.’’ ती म्हणाली, ‘‘त्याचा लॅरीला त्रास होत नाही, याचाच मला आनंद होतो.’’

‘‘पण त्याचा इतिहास बघ जरा...’’

‘‘हो, पण जेव्हा जेव्हा तुम्हाला नैराश्य येतं ना, तेव्हा प्रत्येकाच्या आसपास त्याच्यापेक्षा वाईट अवस्था असलेला कुणी असतोच. अगदी कुणी समजून घेतो, तेव्हा तुम्हाला बरं वाटतं?’’

लॅरीची भेट झाली तेव्हा तिला कुठल्याही प्रकारचे औषध चालू नव्हते. ‘‘मी कलंकाचा विचार करत होते.’’ ती म्हणाली. ‘‘नेहमीच. मला एकही पुरावा आजूबाजूला असावा असं वाटत नव्हतं. नैराश्याबद्दल मी काही करावं. असं लॅरीने मला सुचवलं.’’ ‘ती खरंच खूप चांगली, कर्तबगार आहे,’ हे तिला त्याने सांगितलेच होते. ‘‘तो मला सततच सांगत असतो की, तो साऱ्याच गोष्टींवर प्रेम करतो.’’


‘‘तू मानसिकदृष्ट्या आजारी आहेस असं तुला वाटतं?’’

‘‘कदाचित,’’ ग्रेसने उत्तर दिले. ‘‘मी तसा विचारच करत नाही. नैराश्य हे मानसिक विकारांपैकी एक आहे, असा मी विचार करते.’’

‘‘तुम्ही दोघं त्याकरता काम करण्यासाठी एकदम योग्य व्यक्ती आहात?’’




## डॉ. मीरा कोसंबी



१९ व्या शतकातील महाराष्ट्राच्या प्रबोधनयुगाच्या भाष्यकार, स्त्रीसाहित्य-चळवळीच्या अभ्यासक आणि ज्येष्ठ लेखिका डॉ. मीरा दामोदर कोसंबी (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्या अविवाहित होत्या.

पाली भाषा आणि बौद्ध वाङ्मयाचे अभ्यासक डॉ. धर्मानंद कोसंबी हे मीरा कोसंबी यांचे आजोबा. जेष्ठ गणिततज्ज्ञ आणि इतिहासाचे अभ्यासक डॉ. दामोदर धर्मानंद ऊर्फ डी. डी. कोसंबी हे त्यांचे वडील. घरामध्येच ज्ञानपरंपरेचा वारसा लाभलेल्या श्रीमती कोसंबी यांनी फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये शिक्षण घेतले. त्या नंतर याच महाविद्यालयात काही काळ अध्यापनाचे काम केले. १९ व्या शतकातील प्रबोधनपर्व या विषयावर यांनी पीएच. डी. संपादन केली. त्यानंतर २० वर्षे त्यांनी स्वीडनमध्ये अध्यापन कार्य केले. स्त्रीसाहित्य आणि चळवळी या विषयांचाही त्यांचा अभ्यास होता. एसएनडीटी विद्यापीठातील स्त्री अभ्यास आणि संशोधन केंद्राच्या प्रमुख म्हणून श्रीमती कोसंबी सेवानिवृत्त झाल्या. त्यांनी भारतातील पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी आणि पंडिता रमाबाई यांचे इंग्रजी चरित्रलेखन केले होते. विविध विषयांवर त्यांची १२ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

## पंडित राम माटे

स्वरसाधना विद्यालयाचे संगीत विद्यालयाचे संस्थापक व संगीतगुरु आत्माराम चिंतामण तथा पं. राम माटे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते ८६ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, मुलगा असा परिवार आहे.

पं. माटे आकाशवाणीचे मान्यताप्राप्त गायक होते. विद्वान संगीत शिक्षक असा त्यांचा नावलौकिक होता. मैफलींसाठी विद्यार्थी तयार करण्यासाठी त्यांनी पंचवीस वर्षे जलसा हा उपक्रम राबवला. त्यांनी गायनासह सतार व बासरीवादकही घडवले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन तालयोगी सुरेश तळवलकर व पं. उल्हास कशाळकर यांनी त्यांचा गौरव केला होता.


## अजय वढावकर



'नुक्कड' या लोकप्रिय मालिकेत गणपत हवालदाराची भूमिका साकारून घराघरात आणि मनामनात पोहोचलेले लोकप्रिय अभिनेते अजय वढावकर (वय५९) यांचे निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी शिवानी वढावकर आहेत.

'जिंदादिल अभिनेता' म्हणून वढावकर यांची ओळख होती. सोशल नेटवर्किंगच्या माध्यमातून ते सतत चाहत्यांच्या संपर्कात असत. वढावकरांच्या निधनाचे वृत्त समजताच त्यांच्या सहकाऱ्यांनी फेसबुक पेजवर श्रद्धांजली अर्पण केली.

## विनोद मेहता



प्रख्यात संपादक, टीकाकार विनोद मेहता (वय ७३) यांचे ७ मार्च रोजी निधन झाले. मेहता यांनी 'आउटलूक' साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाचे ते संपादकीय अध्यक्ष होते.

रावळपिंडी येथे १९४२मध्ये जन्मलेले मेहता बेधडक पत्रकारितेसाठी ओळखले जातात. तीन वर्षांचे असताना फाळणीच्या वेळी मेहता यांचे कुटुंब रावळपिंडीहून लखनौ येथे स्थलांतरित झाले. त्यांचे बालपण लखनौमध्ये गेले. तेथेच त्यांनी 'बीए'चे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर 'डेबोनेयर' मासिकात त्यांनी काम सुरू केले. 'लखनौ बॉय' हे २०११ मध्ये प्रसिद्ध झालेले त्यांचे आत्मचरित्र बेस्ट सेलर ठरले. टेलिव्हिजन चर्चामधूनही मेहता लोकप्रिय होते. 'एडिटर अनप्लग' हे त्यांचे दुसरे पुस्तकही नुकतेच प्रसिद्ध झाले आहे.

आजारपणामुळे गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये त्याच्या प्रकाशन कार्यक्रमाला ते उपस्थित राहू शकले नव्हते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मेहता यांना श्रद्धांजली वाहिली आहे. 'मेहता हे मोकळे आणि थेट विचार मांडत. उत्कृष्ट पत्रकार आणि लेखक म्हणून ते कायम स्मरणात राहतील,' असे ट्विट मोदी यांनी केले आहे.

मेहता यांनी विविध प्रकाशने यशस्वीपणे सुरू केली. त्यामध्ये 'संडे ऑब्झर्व्हर', 'इंडियन पोस्ट,' 'द इंडिपेंडंट', 'द पायोनियर' (दिल्ली आवृत्ती) आणि त्यानंतर 'आउटलूक' यांचा समावेश आहे. मेहता यांनी मीना कुमारी आणि संजय गांधी यांच्या चरित्रांचे लेखनही केले.

## शाहीर साबळे



महाराष्ट्राची लोकधारा या कार्यकमाच्या माध्यमातून अवघ्या महाराष्ट्राला चिरपरिचित असणारे प्रख्यात शाहीर कृष्णराव गणपतराव साबळे (वय ९४) यांचे दि. २० मार्च रोजी मुंबई येथे वृद्धापकाळाने निधन झाले.

सातारा जिल्ह्यातील पसरणी येथील एका शेतकरी कुटुंबात जन्म झालेल्या शाहीर साबळे यांना आईवडिलांकडूनच गायकीचा वारसा मिळाला होता. अंमळनेर येथे शालेय शिक्षण घेत असताना त्यांना साने गुरुजींचा सहवास लाभला होता. साबळेंनी त्यांच्याकडून प्रखर राष्ट्रवादाचे धडे घेतले. राजकीय तसेच सामाजिक अपप्रवृत्तींवर प्रहार करण्यासाठी त्यांनी शाहिरी माध्यमाचा उपयोग केला. यासाठीच त्यांनी जागृती शाहीर मंडळाची स्थापना केली.

महाराष्ट्राची लोकधारा या कार्यकमाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विविध विभागातील लोककलाकारांना एकत्र आणून लावणी, बालनृत्य, कोळीनृत्य, गोंधळीनृत्य, मंगळागौर, वाघ्यामुरळी, वासुदेव, धनगरगीते यांचे जीवंत दर्शन घडवले. निराधार कलाकारांना स्वाभिमानाने जगता यावे आणि युवा पिढीला आपली कला शिकवता यावी यासाठी शाहीर साबळे प्रतिष्ठानची स्थापना केली.

## कृष्णा कल्ले

'गोड गोजिरी, लाज लाजिरी', 'परीकथेतील राजकुमारा', 'कामापुरता



मामा', 'उठ शंकरा, सोड समाधी', यासारखी अजरामर गाणी गाणाऱ्या, सुरेल गळ्याच्या पण प्रसिद्धीपासून दूर राहणाऱ्या ज्येष्ठ गायिका कृष्णा कल्ले यांचे अंधेरी पूर्व येथे राहत्या घरी निधन झाले. ७४ वर्षांच्या कृष्णा कल्ले गेले काही दिवस पक्षाघाताने आजारी होत्या.

कृष्णा कल्ले यांचे बालपण कानपूर येथे गेले. शालेय जीवनात गायन शिकत असताना त्यांनी अनेक स्पर्धांमध्ये अव्वल कामगिरी करत तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू आणि राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते पारितोषिके पटकावली होती. १९६५ मध्ये त्यांनी राष्ट्रीय पातळीवरच्या गायन स्पर्धेत सहभाग घेतला आणि 'गोल्डन व्हाइस ऑफ इंडिया'चा किताब मिळवला. त्यानंतर मराठी व हिंदी गीतांसह अनेक लोकप्रिय लावण्या त्यांनी कंठबद्ध केल्या. 'गोड गोजिरी, लाज लाजिरी' या आजही रसिकांच्या ओठी असलेल्या गीतासह 'केला इशारा जाता जाता' आजा 'एक गाव, बारा भानगडी' या लावण्या त्यांनीच गायल्या आहेत.

## माजी कुलगुरू श्रीधर गुप्ते

पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. श्रीधर चंद्रशेखर गुप्ते (वय ८२) यांचे पुण्यात वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे.

डॉ. गुप्ते यांनी १९ एप्रिल १९८९ ते १८ एप्रिल १९९५ या सहा वर्षांच्या काळात दोन वेळा विद्यापीठाचे कुलगुरूपद भूषविले. त्यांच्या कुलगुरूपदाच्या कार्यकाळामध्येच 'आयुका', 'टीबायएफआर', 'एनसीआरए', आदी राष्ट्रीय पातळीवरील संशोधन संस्थांना विद्यापीठाच्या आवारामध्ये केंद्र सुरू करण्यासाठीची प्रक्रिया पार पडली होती. डॉ. गुप्ते यांनी पुणे विद्यापीठातून भूगोल विषयामध्ये एम. एस.सी. केले. रुपारेल कॉलेजमध्ये व्याख्याता पदावर काम केल्यानंतर १९५९ पासून ते भूगोल विभागामध्ये व्याख्याते म्हणून रुजू झाले. त्यानंतरच्या काळात विभागप्रमुख पदासोबतच विद्यापीठाच्या सिनेट, मॅनेजमेंट कौन्सिल, ॲकेडमिक कौन्सिल अशा अधिकार मंडळांमधून प्रशासकीय कार्यकुशलतेची प्रचिती दिली.







## भ्रष्टाचाराशी लढा

आपले भविष्य हे आपल्या मतदारांवर आणि ते किती जबाबदारीने वागतात यावर अवलंबून आहे. आपलं मत केवळ एक रिवाज म्हणून पाच वर्षांतून एकदा दाबायचं असा विचार काही कामाचा नाही. आज सर्व स्तरांवरील भ्रष्टाचारानं आपणच आपल्या स्वातंत्र्याचा विध्वंस केला आहे. आपण अजूनही आपल्या वर्तनात सुधारणा न केल्यास भविष्यात त्याची शिक्षा नव्या पिढीला भोगावी लागेल हे निश्चित. याच गोष्टीची जाणीव भ्रष्टाचाराशी लढा हे पुस्तक करुन देते.

–दैनिक ऐक्य
मूळ लेखक : किरण बेदी
अनुवाद : सुप्रिया वकिल
प्रकाशक : मेहता पब्लिशिंग हाऊस
पृष्ठे : १३८, किंमत १५० रुपये.

४थी आवृत्ती

# पोस्टमास्तर

## आणि इतर कथा

मूळ लेखक
रवीन्द्रनाथ ठाकूर

अनुवाद
मृणालिनी गडकरी





माणूस आहे म्हणूनच या जगात भावनांचा सुंदर गोफ विणला जातो, आणि त्याला साथ असते निसर्गाची.

रवीन्द्रनाथांच्या जीवनात 'माणूस' आणि 'निसर्ग' यांना असाधारण स्थान आहे. त्यांच्या कथेत निसर्ग हा फक्त वर्णनाकरिता येत नाही, तर भावभावनांच्या खेळात महत्त्वाची भूमिका बजावतो. निसर्गाची बदलणारी रूपं माणसाच्या बदलणाऱ्या भावनांच्या प्रतिमा असतात.

निसर्ग आणि माणूस यांच्या संयोगातून फुललेली विश्वकवीची कथा तो महामानव होता हे नकळत सांगून जाते.




# Sahara




## Book Review

First things first: If you want to savour Paula Constant's book 'Sahara' to the fullest, you need to first read her earlier book viz. 'Slow Journey South'. While 'Sahara' is the actual description of the almost impossible feat that Paula achieved, its impact can be absorbed in its real sense only if one understands the hardships that Paula took to fulfil her dream.

As the name suggests, 'Sahara' is Paula's description about her walk through the extensive, arduous desert. However, it cannot be classified merely as a travelogue. For, this book goes much beyond just describing the geographical features of a desert trail. It takes the reader on a mystical journey of living with the silences of the 'Big Empty' as Paula calls the desert. It unravels riveting nuggets about the various tribes/cultures that Paula encounters during her journey. It elucidates about the bitter-sweet experiences that Paula faces as a single, white woman in a world full of traditional chauvinists. It describes her fierce grit and determination in singlehandedly taking on tricky situation in places where she doesn't know the culture, language or people. In short, 'Sahara' is a vivid description of Paula's journey – not just from one terrestrial point to another – but also from being a normal person from a comfortable background to evolving into a more worldly-wise, mature woman. One who learns what it is to live happily in abject poverty; to live beyond veils; to live in a world full of uncertainty; to live without material comforts that people in the advanced countries take for granted. It is this metamorphosis that forms the underlying defining point of 'Sahara'. Yes, the book is also a description of the actual walk; which is also done in a picturesque

way, such that one feels as if we ourselves are walking alongside Paula. Such is the in-depth involvement of Paula in her walk and its subsequent description, that it comes across just as powerfully in her writing. The shades of the sand, the forceful whistling of the wind, the varied moods of Paula's camels, the exciting chaos of the bazaars in Morocco, Tomboctou etc, all stand out as a 'live canvas' in front of the reader.

Paula's walk is also punctuated with her personal battles with the various people in her life. She and her husband Gary start drifting apart from the beginning of this walk. Something that they had started as a 'joint dream' becomes the wedge driving them apart rapidly as the walk starts. At one point, Gary decides to leave the project; leaving Paula distraught but even more determined to complete the same. She is also up against her father's constant negativity about the exercise as well as her mother's rapidly spreading cancer. Alarmingly depleting finances, unexpected costs in forms of bribes and random charges, little luck with publishing of her articles about the walk, unwnated encounters of the sexual nature and the varied experiences with guides, cause quite a lot of distress to Paula, who also battles with severe Urinary Tract Infection all through the walk. Military outfits, bandits and landmines are some of the other hurdles that she comes up against this journey, even as she continues in immense pain due to the infection spreading upto her kidneys.

The guides that she meets through her journey unravel the face of the society at those locations. For instance, while Madani from Morocco is the helpful, easygoing, shy guy; Harraba of Nouhadibou comes

across as a lazy, chauvinistic and cunning man who joins her with the intention of simply making easy money. He also breaks a lot of Paula's equipment and scares her camels. At Mauritania, she finds Khabuss who is a no-nonsense military man with excellent knowledge of the topography; but then arrives Mohammed, who defecates in front of her, expects her to cook and serve him food and eventually also drags her into legal trouble. The walk also exposes Paula to women and families of various cultures. While the Saharawi tribal women are self confident, independent and equally revered by their men; those in Mauritania are rude, lazy and money-minded to the extent that they feel no compunction in robbing Paula of her luggage in front of her!

Beginning her walk from London and crossing 5000 kms through England, France, Portugal, Spain and Morocco, Paula had aimed to cross the Sahara desert from west to east in its entirety. However, political and visa related problems force her to give up the walk in Niger. Having walked 7000 kms through the Sahara, she has just 3800 kms more to reach Cairo where her desert safari will finish in the real sense. She stills beholds the dream to complete her walk. If one wonders 'why, despite all the aforementioned difficulties?', an extract written by Paula in book gives the most befitting explanation. It says: "The immediacy of the prickles and the stark beauty of the terrain have made me think endlessly about simplicity, and the daily struggle with small things. This walk has been such a metaphor for life: just when I thought I was on top of everything, had a good guide, understood how to make my camels and camp work and was in beautiful country,

the prickly shrubs came along to test me every second. I've written in my diary more than once in sheer frustration: will this walk ever give me a break? But I know that life will always test me, no matter how ideal the circumstances." She continues later in the book, "I dread coming out of it (the silence of the desert), the return to the mundane, the tight faces of society, the petty boundaries. I dread leaving the clean, stark wilderness, leaving behind the glimpse of my true essence and drawing on the 'material' layers once again. And no matter how I crave it, I dread having to talk when I am used to the silence. When I'm out here in the deep desert, I feel so strong that I'm afraid of nothing. When I walk in that subconscious place, I know myself; the seas within are calm. There is no self-concern. It is a precious epiphany."


The best way to savour this epiphany is to read 'Sahara' – an enriched piece of writing about something as stark and barren as a desert could ever be!

**- RESHMA S. KULKARNI**

१०वी आवृत्ती

# सांगे वडिलांची कीर्ती

वपु काळे



२री आवृत्ती

# सेलिब्रेशन

स्वाती चांदोरकर




निसर्गाने दिलेला आनंद आणि निसर्गानेच दिलेलं संकट, नक्की महत्त्वाचं काय? खरं तर काहीच नाही. 'निसर्ग' एकमेव महत्त्वाचा.

या निसर्गाच्या साक्षीने पृथ्वीवर अखंड न संपणारं नाटक चालू आहे. ह्या नाटकाच्या रंगभूमीवर वावरणारा प्रत्येकजण कलाकार आहे. ह्या कलाकारांच्या वेगवेगळ्या भूमिका म्हणजे माणसांच्या वृत्ति आणि प्रवृत्ति. प्रत्येक कलाकार प्रत्येक वृत्तीची भूमिका निभावतो.

त्या वृत्तींच्याच ह्या गोष्टी. त्या कुणा एखाद्या व्यक्तीवर नाहीत. वृत्ती परिचयाच्या असतात, म्हणून गोष्टी आपल्याशा वाटतात. ह्या रंगभूमीवर प्रत्येक कलाकार निसर्गाने दिलेल्या संकटातून बाहेर पडून आनंदाच्या शोधात दिवस-रात्र फिरत असतो. आनंद नाही गवसला तर नैराश्य आणि गवसलाच तर त्या तेवढ्या काळापुरतं 'सेलिब्रेशन.'




## गोष्ट अजब मैत्री

एक छोटं गाव होतं. गावाभोवती मोठ्ठं जंगल होतं. गावसुद्धा हिरव्यागार झाडीत लपलं होतं. छोटी छोटी कौलारू घरं मान उंच करून पाहत होती. घराभोवती सुबकशा बागा होत्या. वळणावळणाने जाणारे रस्ते होते. सुपीक शेतात कष्ट करून माणसं धान्य पिकवत होती. मजेत गाणी गात गात हसतखेळत राहत होती. गावात एक तलाव होता. अशा ह्या स्वच्छ तलावाचं नाव 'निर्मल'. आणि गावाचं नाव 'निर्मलपूर'. सारं गाव ह्या तलावाचं पाणी भरायचं. दिवसा तलावावर माणसांची गजबज असायची, तर रात्री गाव झोपलेलं असताना जंगलातल्या प्राण्यांची वर्दळ असायची.

अशा ह्या सुखी समाधानी शांत गावात एक दिवस मोठंच संकट आलं.

सूर्यास्ताच्या वेळी त्या 'निर्मळ' तलावाकाठी लोक मजेत फिरत होते. मुलं खेळत होती. गप्पा मारत वृद्ध तळ्याकाठी बसले होते. एकदम आरडाओरडा झाला. ''आग, आग.'' म्हणत लोक दिसेल त्या दिशेने पळू लागले. शेजारच्या जंगलात मोठा वणवा लागला होता. त्यात सोसाट्याचा वारा.

घरेदारे पेटू लागली. 'अग्नीदेवता रागावली' म्हणत माणसे पळत सुटली. सामानसुमान, कपडालत्ता तिथेच सोडून निघाली.

आग पसरतच होती. माणसे भयाने थरथरत होती.

अन्नपाण्यासाठी त्यांनी गाव आपलं सोडलं. सुंदर, देखणं गाव असं ओसाड पडलं. कितीतरी दिवस आग धुमसत होती.

हळूहळू आग शांत होत गेली. आणि बिळांमधून उंदीर डोकावू लागले. किलकिल्या डोळ्यांनी त्यांनी अंदाज घेतला. गावात एकही माणूस नव्हता. गावात नुसती शांतता नि शांतताच होती. उंदीर धीट झाले. त्यांनी आपला

वावर सुरू केला.

घरेदारे उघडीच होती. आगीतून वाचलेलं उरलंसुरलं अन्न धान्य पाहून उंदीर खूष झाले.

'चला रे चला, सारे मिळून या.  मिळेल त्या पदार्थावर ताव मारूया' ची, ची, चू, चू करत उंदरांनी धावपळ सुरू केली. रस्त्यावर उंदीर, बाजारात उंदीर पाहू तिथे उंदीरच उंदीर.

थोड्याच दिवसात त्या गावात उंदरांचे राज्य सुरू झाले. आता 'निर्मलपूर' झाले उंदरांचे 'उंदीरपूर'. कोपऱ्या कोपऱ्यात, भांड्यांखाली, दुकानांच्या गोदामात उंदरांना भरपूर खाद्य मिळाले. हळूहळू उंदीर गलेलठ्ठ झाले.

उघड्यावाघड्या हॉटेलातल्या शेवगाठी खायच्या. कोणालाच आता कुणाची भीती नव्हती. सगळे मजेत चालले होते.

एके दिवशी सकाळी बॉम्बसारखे आवाज आले. 'थाड् थाड्, धाब् धाब्' आवाजांनी उंदीर सगळे भेदरून गेले. 'भूकंप झाला, भूकंप झाला' म्हणत बिळात शिरले. कोणी इकडून तिकडे गेले, कोणी सरसर झाडावर चढले. छपरावरती बसून इकडेतिकडे पाहू लागले.

'अरे बापरे, आले रे आले. अक्राळविक्राळ सोंडवाले.'

एक पिटुकला उंदीर झाडावरून घसरत आला. 'हत्ती आले, हत्ती आले' गर्जना करत त्याने सगळ्यांना वर्दी दिली. बाजारात धावपळ सुरू झाली. एकाची शेपटी दुसऱ्याच्या पायात, दुसऱ्याचे पाय तिसऱ्याच्या पायात. हत्ती दाणदाण करत आले. कित्येक उंदीर त्यांच्या पायाखाली तुडवले गेले. 'कसे आपले जीव वाचवावे? कसे हत्तींना चुकवावे? जंगल सोडून हत्ती आज गावात कसे आले?' सगळे उंदीर बुचकळ्यात पडले. जीव धरून लपून बसले.

हत्ती मोठ्या तोऱ्यात आले. तळ्यावर पाणी पिऊन गेले. इथे तिथे दडलेले, घाबरलेले उंदीर एकत्र आले. 'प्रधानजींकडे जाऊया आणि ह्या प्रश्नाचा निकाल लावूया. हे हत्ती आता रोज पाण्यावर येणार. शेकडो उंदरांचा जीव घेणार. हळूहळू उंदरांचा नाश होईल आणि हत्तींचे इथे राज्य  येईल.'

सगळे प्रधानजींकडे गेले. 'प्रधानजी, विचार करा. हे हत्तींचं संकट दूर करा.' सगळे एकसुरात म्हणाले. प्रधानजी विचारात पडले. 'हत्ती आता रोजच येणार. कारण राज्यात दुष्काळ पडला. पाऊस फार कमी पडला. नदीनाले

आटून गेले. पाण्याच्या शोधात प्राणी वणवण फिरू लागले. 'निर्मलपूर' गावातला तलाव मात्र आटला नव्हता. जमिनीखालच्या झऱ्यातून त्याला पाण्याचा पुरवठा होता. हत्तींना त्याचा सुगावा लागला आणि हत्तींचा मोर्चा गावाकडे वळला.

हे संकट मोठंच होतं. स्वत: कोंडून घेऊन उंदीर किती दिवस बिळात बसणार? उंदरांचा तर मागमूस राहणार नाही.

प्रधानजी शहाणे होते. त्यांनी विचार केला. 'आपण पिटुकले. हत्तींशी कसे लढणार? आपली ह्यांच्यापुढे काय डाळ शिजणार? युक्तीनंच संकटाला तोंड दिलं पाहिजे. हत्तींचा राजा होता 'शक्ती'. त्याच्याशी जाऊन बोलावं. विनवणी करावी. छोट्यांनी मोठ्यांशी नम्रतेनं वागावं. अन् मोठ्यांनी छोट्यांना अभय द्यावं. पक्का निश्चय करून प्रधानजी निघाले. हत्तींच्या येण्याजाण्याच्या वाटेवर कडेला उभे राहिले. हत्ती डुलतडुलत आले. एकेक करून पाण्यात शिरले. प्रधानजी तलावाच्या काठावर गेले. शक्ती हत्ती पोहत होता. मजेत सोंडेने पाणी उडवत होता.

''राजेसाहेब, राजेसाहेब बोलाल का माझ्याशी? ऐकाल का माझं?''

कोणाचा आवाज? कोण करतंय चीं चीं? शक्ती हत्तीने मान फिरवली. एक धिटुकला उंदीर करत होता 'चीं चीं'. मग शक्ती गुरगुरला, ''काय रे, काय गडबड लावली आहे?''

प्रधानजीने नमस्कार केला. आपलं म्हणणं हत्तीराजापुढे मांडलं. ''महाराज, आम्ही पिटुकले. तुमच्याशी आम्ही कसे लढणार? आम्ही तुम्हाला त्रास देणार नाही. पण महाराज, आमचे प्राण वाचवा.''

शक्ती राजा म्हणाला, ''जंगलात आता पाणी नाही. हत्ती पाण्यावाचून तडफडायला लागले. तुमच्या तलावावर भरपूर पाणी आहे, हे समजलं म्हणून मी हत्तींना घेऊन इकडे आलो. माझा काय इलाज? तुम्ही तुमचे प्राण वाचवा.' असे म्हणून शक्ती परत डुंबू लागला.



''महाराज, माझं एक ऐकता का? मी तुम्हाला एक

मार्ग सांगतो. पाण्याकडे यायची एक दुसरी वाट आहे. त्या रस्त्याने आलात तर तुम्हाला आमच्या गावातून यावं लागणार नाही, तुम्हाला थोडा लांबचा पल्ला पडेल, आणि आमचेही प्राण वाचतील.'' प्रधानजी अगदी अजीजीने म्हणाले.

''आम्ही काय म्हणून लांबच्या रस्त्याने येऊ आणि तुमचे प्राण वाचवू? तुम्ही एवढेसे अंगठ्याएवढे. तुमचा आम्हाला काय उपयोग? तुम्हाला वाचवण्यासाठी आम्ही का त्रास घ्यावा?'' शक्ती त्रासून म्हणाला.

''महाराज, असं नका म्हणू. आम्ही लहान असू पण आमची बुद्ध महान आहे. तुम्हाला माहीत आहे ना? आमच्या एका पूर्वजाने पारध्याच्या जाळ्यात अडकलेल्या सिंहाला सोडवलं होतं. युक्तीने आम्ही मोठा पराक्रम करू शकतो, कोणत्याही संकटात तुम्ही आम्हाला हाक मारा. आम्ही हजर होऊ. शक्ती, युक्तीची मैत्री झाली ना तर, कोणत्याही संकटातून पार पडता येत महाराज.''

धिटुकल्या उंदराचं बोलणं ऐकून शक्तीराजाला हसू आलं. 'केव्हातरी एकदा एका उंदराने सिंहाचं जाळं तोडलं होतं, त्याचा ह्यांना केवढा अभिमान!'

''बरं, ठीक ठीक. सांग आम्हाला दुसरा रस्ता. येऊन आम्ही त्या रस्त्याने. मग तर तुमचे जीव वाचतील ना?'' शक्तीने प्रधानजीचे म्हणणे कबूल केले.

दुसऱ्या दिवसापासून हत्ती दुसऱ्या वाटेने जाऊ लागले. हर्षाने उंदीर नाचू लागले. हत्तीराजाचे आभार मानून परत गावात फिरू लागले.

ह्यानंतर वर्ष उलटलं. हत्ती त्या वाटेवर रुळून गेले. वरखाली न बघता बिनधास्त पाण्याकडे येऊ लागले. अशावेळी एक संकट लपूनछपून येतं. राजाचे सैनिक जंगलात येत. हत्तींची वाट न्याहाळून जात.

एक दिवस त्यांनी त्या वाटेवर खड्डे खणले. सगळे खड्डे पाला-पाचोळ्यांनी झाकून ठेवले. हत्ती आपल्याच मस्तीत होते. खेळत खेळत येत होते. 'पालापाचोळ्यावर पाय द्यावा, त्याचा चुर्रचुर्र आवाज ऐकावा' एक हत्ती म्हणाला. दुसऱ्या हत्तीने पाय ठेवला. धपकन् तो खड्ड्यात पडला आणि एकापाठोपाठ एक हत्ती खड्ड्यात पडू लागले.

हाहा:कार उडाला. हत्तींचा चिलचिलाट हवेत मिसळला. बाहेर यायची धडपड करत हत्ती परत खड्ड्यात अडकले. वेदनांनी तळमळू लागले. एवढे

मोठे शरीर बाहेर कसे येणार? कोण बाहेर काढणार? बलाढ्य हत्तींना चक्क रडू येऊ लागले. शक्ती राजाला दु:ख झाले. हत्तींची सुटका करण्यासाठी तो इकडेतिकडे पाहू लागला. सोंड उंचावून त्याने मोठा चित्कार केला.



''महाराज, उंदरांच्या गावात जातो. त्यांना सगळी कथा सांगतो.'' रंगा हत्ती राजाला म्हणाला. शक्तीला उंदरांचे शब्द आठवले. ''पण इथे उंदीर काय करणार?'' शक्ती निराश होऊन म्हणाला. त्यापेक्षा दुसऱ्या जंगलात जाऊया. इतर हत्तींना बोलावून आणूया. सगळे मिळून बळाने खड्ड्यातल्या हत्तींना बाहेर काढतील. असे ठरवून काही हत्ती दुसऱ्या जंगलात निघाले.

दुसऱ्या दिवशी सैनिक आले. त्यांनी हत्तींना झाडांशी बांधून टाकले. 'गाड्या घेऊन येऊ आणि हत्तींना घेऊन जाऊ' असे ठरवून निघून गेले. इकडे रंगा हत्ती उंदरांकडे गेला. प्रधानजींना सारं सांगून म्हणाला, ''चला चला प्रधानजी, काही करून हत्तींचे प्राण वाचवा.''

प्रधानजींनी तत्परतेने उंदरांची फौज घेतली. लुटुपुटीचं सैन्य घेऊन प्रधानजी निघाले लढायला.

इकडे शक्ती हत्ती मान खाली घालून परत आला. दुसऱ्या जंगलातले हत्ती इकडे यायला तयार नव्हते. आपणही खड्ड्यात पडलो तर जीव गमावून बसू, अशी त्यांना भीती वाटत होती. प्रधानजींनी आज्ञा केली तशी सारी उंदरांची फौज जोरात कामाला लागली. आपल्या तीक्ष्ण, अणकुचीदार दातांनी पटापटा दोर कापू लागले. कचाकच आवाज येऊन एकेक दोर तुटू लागले. हत्ती मोकळे होऊ लागले. उंदीर काम करता करता, नाचत होते. हत्ती मोकळे होता होता.

शेवटी सगळे हत्ती दोरातून सुटले. उंदरांना पाठीवर बसवून ते आनंदात जंगलाकडे पळाले. छोटे उंदीर अगडबंब हत्तींचे मित्र झाले.

**‘मेहता पब्लिशिंग हाऊस’तर्फे प्रकाशित तसेच पॉला कॉन्स्टंट यांनी लिहलेल्या ‘स्लो जर्नी साऊथ’ आणि ‘सहारा’ या इंग्रजी पुस्तकांचा प्रकाशन सोहळा देशातील विविध शहरात मान्यवरांच्या उपस्थितीत झाला. त्या प्रकाशन कार्यक्रमांतील काही छायाचित्रे.**




◀ पुणे येथे झालेल्या प्रकाशन सोहळ्यानंतर लेखिका पॉला कॉन्स्टंट यांनी ‘मेहता पब्लिशिंग हाऊसला भेट दिली. त्यावेळी त्यांनी स्वाक्षरी केलेली पुस्तकाची प्रत खरेदी करण्यास आलेल्या वाचकांची झुंबड उडाली होती.

▶ पुणे येथे पॉला कॉन्स्टंट यांच्यासह गोबी वाळवंट पार केलेल्या पहिल्या भारतीय महिला सुचेता कडेटाणकर, ब्लॉग लेखिका अनुराधा गोयल, ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’चे सुनील मेहता यांच्याहस्ते पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.







◀ मुंबई येथील वेलिंगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमध्ये झालेल्या प्रकाशन सोहळ्यात एव्हरेस्टवीर रूपेश खोपडे यांची प्रमुख उपस्थिती होती.


▶ जयपूर येथे झालेल्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी वाळवंटातील सहलींचे आयोजक अनिकेत बिस्सा, पर्यटनविषयक लेखिका धर्मेंद्र कंवर, गायक रविंद्र उपाध्याय, कमल किशोर आदी उपस्थित होते.





RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PCW/086/2015-2017/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 April, 2015 Posting Date : 11 April, 2015




# आमची नवीन पुस्तके




BOOK POST
Printed Matter

**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.